

# पर्व
## प्रगतीचे परिवर्तनाचे

सुवर्णगाथा ५०
कायदेमंडळातील पाच दशके

# पर्व
## प्रगतीचे परिवर्तनाचे

पद्मभूषण देशपांडे

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**पर्व : प्रगतीचे, परिवर्तनाचे**
पद्मभूषण देशपांडे

प्रथम आवृत्ती : ११ ऑक्टोबर २०१६

© यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

प्रकाशक
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२ – २२०४५४६०/२२८५२३४५
संकेतस्थळ : http://ycpmumbai.com
फेसबुक : http://facebook.com/ycp100/

मुखपृष्ठ : प्रदीप म्हापसेकर

मांडणी : अनिरुद्ध गद्रे

अक्षरजुळणी : अतुल खैरनार/ राजेंद्र शिरसाठ

मुद्रण : मीडिया आर अँड डी

**खाजगी वितरणासाठी**

# भूमिका

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ही संस्था गेली तीन दशके सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहे. अनेक क्षेत्रांत वेगवेगळे उपक्रम राबविताना नव्या पिढीची जडण-घडण सम्यकपणे घडावी, असा आम्हा सर्वांचाच प्रयत्न असतो. प्रागतिक आणि परिवर्तनवादी विचारांची विधायक दृष्टी असलेली क्रियाशील तरुणाई या प्रक्रियेतून पुढे येईल, अशी आशा आहे. त्यादृष्टीने शालेय व महाविद्यालयीन युवा वाचकांसाठी **'पर्व - प्रगतीचे, परिवर्तनाचे'** ही पुस्तिका प्रकाशित करीत आहोत व त्याला एका राज्यव्यापी उपक्रमाची जोड देत आहोत. या पुस्तिकेचा संदर्भ असलेले विषय घेऊन माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा जिल्हा स्तरावर व राज्य स्तरावर आयोजित केली आहे. या निबंध व वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून या पुस्तिकेचे व इतर अनुषंगिक साहित्याचे वाचन व मनन विद्यार्थी करतील आणि या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे.

आदरणीय पवारसाहेबांच्या कायदे मंडळातील कारकिर्दीला अविरत पाच दशकांचा कालावधी एकाही दिवसाच्या खंडाविना पूर्ण होत आहे, ही आपल्या सर्वांनाच आनंदाची व अभिमानाची बाब आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या या कारकिर्दीतील काही महत्त्वाची धोरणे व निर्णय यांचा या पुस्तिकेत अतिशय मोजक्या शब्दांत परिचय करून दिला आहे. अतिशय कमी वेळेत या पुस्तिकेच्या संपादनाची जबाबदारी ज्येष्ठ पत्रकार पद्मभूषण देशपांडे यांनी पार पाडली, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

या पुस्तिकेसोबतच ज्यांना अधिक माहिती मिळविण्याची इच्छा असेल त्यांच्यासाठी आदरणीय पवारसाहेबांबद्दल असलेल्या छापील साहित्याची व इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळांची व विविध लिंकची माहिती देत आहोत. या माध्यमाशी अधिक जवळीक असलेल्या नव्या पिढीला ती अधिक सोयीची होईल, असे वाटते.

■ **सुप्रिया सुळे**

कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# प्रस्तावना

‘साधारण ६०-६२ वर्षांपूर्वी शरद पवार नावाच्या एका शाळकरी मुलाने गोवा मुक्ती संग्रामाला समर्थन देण्यासाठी आपल्या शाळेतल्या मुलांचा मोर्चा काढला. त्यानंतर आजपासून ५५ वर्षांपूर्वी याच महाविद्यालयीन तरुणाने पुण्यातल्या महाविद्यालयातल्या निवडणुकांमध्ये भाग घ्यायला सुरुवात केली. त्या काळच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न जाणण्याची समज आणि संघटनकौशल्य यांच्या जोरावर त्या निवडणुकांमध्ये यशही मिळवलं. स्वातंत्र्यानंतरचा तो काळ पुण्यात विविध वैचारिक प्रवाह मानणाऱ्या चळवळींचा काळ होता. त्या सर्व विचारप्रवाहांना समजाऊन घेऊन या तरुणाने पंचवीशीच्या आधीच आपली राजकीय आणि वैचारिक भूमिका नक्की केली. अवघ्या सत्तावीसाव्या वर्षी जनमताचा कौल घेऊन विधानसभेत प्रवेश केला आणि तेव्हापासून आजतागायत ‘श्री. शरद पवार’ हे नाव देशातल्या कोणत्या ना कोणत्या कायदेमंडळाच्या सदनाचं सदस्य म्हणून विनाखंड कायम आहे. साध्या आमदारापासून ते मुख्यमंत्रीपद, लोकसभेतील विरोधी पक्षनेते पदापासून संरक्षण खात्यासह विविध खात्यांची जबाबदारी आणि त्यात चमकदार कामगिरी ही या ५० वर्षांची पुण्याई आहे. राजकारण आणि राजकारण्यांविषयी मनात गैरसमज बाळगणाऱ्या उच्चभ्रू, मध्यमवर्गीय आणि तरुणांनी ही पन्नास वर्षांची वाटचाल एकदा समजून घ्यायला हवी आणि मग आपलं मत नोंदवायला हवं. जगातील सर्वात मोठी लोकशाही ज्या देशात नांदते त्या देशातील जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाचं हे कर्तव्य आहे.

श्री. शरद पवार या राजकारण्याचं योगदान समाजासमोर ठेवणं त्यासाठी आवश्यक आहे. गेली ५० वर्षं श्री. पवार देशाच्या कायदेमंडळाचे सलग सदस्य आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेपासून ते राज्यसभेपर्यंत त्यांनी कायदेमंडळाच्या राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील चारही सदनांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये भाग घेताना एक जबाबदार धोरणकर्ता आणि देशाचा पालक म्हणून आपल्यावर असलेली जबाबदारी अत्यंत जागरूकपणे पार पाडली आहे. केवळ ‘राजकारणी’ न

राहता त्यापलिकडे जाऊन 'धोरणकर्ता' म्हणून त्यांनी बजावलेली भूमिका समाजासमोर एकत्रितपणे यायला हवी ती त्यासाठीच.

श्री. पवार यांनी त्यांच्या ५० वर्षांच्या विधिमंडळ आणि संसदेतील दीर्घ कारकीर्दीमध्ये बजावलेल्या महत्त्वाच्या भूमिका आणि घेतलेल्या निर्णयांचं थोडक्यात संकलन या पुस्तिकेमध्ये केलं आहे. ते परिपूर्ण नाही. वाचकाला अधिक तपशीलात जाऊन हे निर्णय आणि त्यामागची भूमिका समजून घेण्याची जिज्ञासा व्हावी, एवढाच याचा उद्देश आहे. सार्वजनिक जीवनाला पूर्णवेळ दिलेल्या, प्रत्येक मिनिट कारणी लावण्यासाठी अत्यंत शिस्तीने दिनक्रम पार पाडणाऱ्या श्री. पवार यांच्यासारख्या नेत्याने या पुस्तिकेत समाविष्ट केल्या आहेत, त्यापेक्षा कितीतरी अधिक विधायक, अर्थपूर्ण गोष्टी केल्या आहेत. त्याचं अधिक सखोल आणि सविस्तर संकलन होण्याची गरज आहे. श्री. पवार यांचा अनेक क्षेत्रांमध्ये असलेला चतुरस्त्र संचार, विविध विषयांमध्ये त्यांना असलेली रुची, कार्यकर्ता म्हणून नवनवे विषय आणि क्षेत्र समजाऊन घेण्याची त्यांची वृत्ती, प्रचंड जनसंपर्क आणि स्नेही जनपरिवार यामुळे या गोष्टींचं संकलन एकहाती आणि दहा-पंधरा दिवसांत होणं शक्य नाही. या निमित्ताने त्याची सुरुवात झाली हे महत्त्वाचं. या पुस्तिकेचं यश असेल तर तेवढंच.

नव्या पिढीमध्ये राजकारण आणि राजकारणी या दोन्हींविषयी सकारात्मक दृष्टिकोन रुजवणं. देशातील लोकशाही व्यवस्था सुदृढ आणि परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. येत्या काळात देशाचं अस्तित्वच त्यावर अवलंबून असणार आहे. श्री. पवार यांच्यासारख्या नेत्याने देशकारणाला दिलेलं योगदान, समाज आणि देशाविषयी त्यांनी केलेलं चिंतन, त्यातून घेतलेले निर्णय, प्रागतिक विचारांनी काळापुढे राहण्याची साधलेली किमया त्यासाठी नव्या पिढीपुढे 'संस्कार'रूपाने जाणं आवश्यक आहे. ही पुस्तिका त्यासाठी थोडी उपयोगी ठरेल, ही अपेक्षा.

■ **पद्मभूषण देशपांडे**

# अनुक्रमणिका


१. संघटनकौशल्य आणि संस्था उभारणी / ९
२. कृषिखात्याचा पायलट / १२
३. कर्मचाऱ्यांचा तारणहार / १४
४. मनपरिवर्तनातून नामविस्तार / १७
५. सीमाप्रश्नावर तोडगा / १९
६. जागतिक आर्थिक केंद्राची उभारणी / २१
७. 'पेट्रोकेमिकल'ची पायाभरणी / २४
८. उद्योगसारथी / २६
९. कष्टकऱ्यांचा पाठीराखा / २८
१०. प्रकल्पग्रस्तांना दिलासा / ३०
११. मंडल आयोगाची अंमलबजावणी / ३२
१२. तत्त्वनिष्ठ, प्रामाणिकपणाला घर / ३४
१३. देशहितासाठी मध्यस्थी / ३६
१४. शिक्षण / ३८
१५. ज्ञानगंगा घरोघरी / ४०
१६. खेळाच्या मैदानात / ४२
१७. लोककलांचा चाहता / ४५
१८. जाणकार साहित्य रसिक / ४८
१९. नाटक-सिनेमासाठी भूमिका / ५०
२०. पालावर उजाडले... / ५२
२१. क्रांतिकारक फळबाग योजना / ५४
२२. निघाली कोकणची रेल्वे... / ५७
२३. त्यांनी रचिला पाया, पण... / ५९
२४. गाऊ त्यांची आरती... / ६१
२५. प्रादेशिक असमतोलावर उपाय / ६३
२६. जागतिकीकरणाचे वारे आधी राज्यात / ६६
२७. एन्रॉन / ६८

२८. सुरक्षा आणि संरक्षण / ७१
२९. दोन हात भूकंपाशी... / ७४
३०. अकराऐवजी बारा! / ७६
३१. स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा / ७८
३२. 'अयोध्ये'चा तोडगा / ८०
३३. ...आणि त्या सापडल्या / ८३
३४. संवेदनशीलतेचं दर्शन / ८५
३५. नवं हिल स्टेशन / ८७
३६. दुसऱ्या हरितक्रांतीचे शिल्पकार / ८९
३७. सबल शिवारातून सफल परराष्ट्रसंबंध / ९२
३८. कर्जाच्या फासातून बळीराजाची सुटका / ९५
३९. सुवर्णसंधी गमावली / ९७
४०. विकासप्रक्रियेला गती अन्नप्रक्रियेने / ९९
४१. सहकारात सुधारणा / १०१
४२. क्रिकेटच्या मैदानात / १०३
४३. आत्मविश्वासाचं पॅकेज / १०६
४४. 'देवभूमी'ला नवसंजीवनी / १०८
४५. औषधनीती / १११
४६. दुधाचा महापूर / ११३
४७. मासोळी लकाकली / ११५
४८. अंडी आणि कोंबडी / ११७
४९. बालकामगारांची मुक्तता / ११९
५०. नव्या युगाची आस / १२२
५१. रचिला पाया संशोधनाचा / १२४
५२. प्रशासनाची एकमुखी पसंती / १२६
५३. कमतरता असेल तर ती आमच्यात;
व्यवस्थेत किंवा कायदेमंडळात नाही! / १३०
५४. सामाजिक अभिसरणाचे उत्तम व्यासपीठ / १३५
५५. मा. श्री. शरद पवार यांची कारकीर्द / १४०

# संघटनकौशल्य आणि संस्था उभारणी

# १

प्रश्न सोडवण्यासाठी किंवा सामूहिकरित्या उत्तर शोधण्यासाठी संघटना बांधणी आणि दीर्घकाळ वाटचालीसाठी संस्था उभारणी हे श्री. शरद पवार यांच्या सार्वजनिक जीवनाचं सुरुवातीपासून सूत्र राहिलं आहे. आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीलाच त्यांनी बारामती तालुक्यातील दुष्काळाच्या प्रश्नावर उपाययोजना करायला सुरुवात केली. त्याकाळी तिथे 'युनेस्को' या आंतरराष्ट्रीय संस्थेच्यावतीने 'फूड फॉर हंगर' ही योजना राबवली जात होती. दुष्काळात अडचणीत सापडलेल्या लोकांना जगण्यासाठी धान्य आणि पाम ऑईल मोफत दिलं जात असे. श्री. पवार यांनी फुक्कट दिल्या जाणाऱ्या या गोष्टी थांबवून त्याऐवजी 'कामाला दाम म्हणून धान्य आणि अन्य' असं त्याचं रूपांतर करायला लावलं. जलसंधारणाची आणि बंधाऱ्यांची कामं काढून तिथल्या रोजगाराची मजुरी म्हणून धान्य आणि तेल द्यायला सुरुवात केली. त्या अभिनव अशा 'रोजगार हमी'च्या उत्पादक कामातून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाल्यामुळे नंतरच्या पूर्ण प्रवासात त्यांचा तो दृष्टिकोन कायम राहिला.

शेतीचे प्रश्न आणि शेतीचा विकास हा सुरुवातीपासूनच त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे आपले थोरले बंधू कृषीतज्ज्ञ अप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनासह १९७१ मध्येच त्यांनी 'बारामती कृषी प्रतिष्ठान'ची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी शेतीसाठीच्या पाण्याचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, जोडधंदे उभे करण्यासाठी नवे प्रयोग केले. शेतीसाठी आधुनिक तंत्र आणि शास्त्रीय पद्धती वापरण्यासाठी शेतकऱ्यांना सतत नवी दिशा दाखवली. 'घर तेथे संकरित गाय' आणि त्यानंतर 'गाव तिथे सहकारी दूध सोसायटी' या सूत्राने त्यांनी बारामती तालुक्यात दुग्ध व्यवसाय उभा केला. आज या दुधाच्या उपउत्पादनांनी आंतरराष्ट्रीय बाजारात प्रवेश केला आहे. १९७४-७५ मध्ये सुरू केलेली 'बारामती ग्रेप वाईन इंडस्ट्री' हा तशाच प्रयत्नांचा एक भाग.

विद्यार्थ्यांच्या, विशेषतः विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी आणि आपल्या कल्पनेतील शैक्षणिक प्रयोग राबवण्यासाठी त्यांनी स्थापन केलेल्या 'विद्या प्रतिष्ठान'चा वटवृक्ष आज महाराष्ट्रातल्या असंख्य गरजूंसाठी उपयोगी ठरतो आहे. माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान या शिक्षणाच्या दोन्ही आधुनिक शाखांमध्ये

अद्ययावत अभ्यासक्रम तिथे शिकवले जातात. स्वावलंबी शिक्षणाचा धडा देणारी 'कर्मवीर मेस', बालपणीच्या संस्कारांसाठी 'जीवन समृद्धी', मुलींचं शैक्षणिक संकुल, विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठांबरोबरचे करार आदींमुळे 'विद्या प्रतिष्ठान' ही शैक्षणिक संस्था महाराष्ट्रात वेगळी ठरली आहे.

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या निधनानंतर त्यांचे विचार व कार्य यांना वाहिलेली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ही संस्था स्थापन करण्यात आली. वसंतदादा पाटील यांच्या निधनानंतर श्री. पवार यांनी अध्यक्षपदाची धुरा आजतागायत सांभाळली आहे. अद्ययावत इमारतीच्या उभारणीसह १४ विविध विभाग व १२ विभागीय केंद्रांमार्फत प्रतिष्ठानचे कार्य सुरू आहे. देवराष्ट्रे येथील जन्मस्थळ, कराडचे स्मृतीस्थळ व कागदपत्रांचे जतन, दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या चरित्रपटाची निर्मिती यांसह महत्त्वाच्या विषयांवर माहितीपट, ग्रंथप्रकाशने, चर्चासत्र, परिषदा, व्याख्यानमाला तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरांवर मौलिक योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शेती, पाणी, सहकार, शिक्षण, युवा, महिला, दिव्यांग (अपंग), ज्येष्ठ नागरिक, पर्यावरण, दुष्काळ निवारण आदि क्षेत्रांध्ये संस्था अतिशय उपयुक्त कार्य करीत आहेत.

सातारा येथील 'भारतीय भटके-विमुक्त विकास संशोधन संस्था' आणि दिल्लीमध्ये 'सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रो बेस्ड इंडस्ट्रीज' (सीटा) या दोन्ही संस्थांच्या उभारणीसाठी त्यांनी पुढाकार घेतला. 'सीटा'तर्फे 'शरद कृषि' हे कृषी विषयाला वाहिलेलं मासिक नियमित प्रकाशित होतं.

महाराष्ट्रातील ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागातील शिक्षण प्रसारासाठी प्रसिद्ध असलेल्या 'रयत शिक्षण संस्थे'चे श्री. पवार १९८९ मध्ये अध्यक्ष झाले. याच संस्थेच्या प्रवरानगर आणि बारामती येथील शाळांचे ते विद्यार्थी होते. श्री. पवार या संस्थेचे अध्यक्ष झाल्यानंतर संस्थेच्या शाळा, महाविद्यालये आणि आश्रमशाळांमध्ये मोठी भर पडली. विद्यार्थ्यांच्या संगणक साक्षरतेसाठी श्री. पवार सुरुवातीपासून आग्रही होते. त्यासाठी त्यांनी १८ कोटी रुपयांचा स्वतंत्र निधी उभा केला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी रुजावी आणि संशोधक जन्मावेत यासाठी त्यांनी 'रयत विज्ञान परिषदे'ची स्थापना केली. 'कर्मवीर विद्या प्रबोधिनी'च्या माध्यमातून संस्थेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाते. शिक्षकांच्या निवडीसाठी अत्यंत पारदर्शक पद्धती विकसित करण्यात आली असून शिक्षकांच्या गुणवत्तेसाठी विशेष लक्ष दिले जाते. संस्थेची

चार ठिकाणी क्रीडा अकादमी सुरू झाली असून ४२ महाविद्यालयांपैकी १४ महाविद्यालयांना 'नॅक'चा 'अ' दर्जा मिळाला आहे.

फेब्रुवारी १९९३ पासून श्री. पवार 'नेहरू सेंटर' या देशपातळीवर प्रसिद्ध असलेल्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. दर तीन वर्षांनी या संस्थेच्या अध्यक्षाची निवड होत असली तरी गेली २३ वर्षं संस्थेच्या सदस्यांनी श्री. पवार यांच्या नेतृत्वावर एकमुखी विश्वास दर्शवला आहे. संस्थेच्या अध्यक्षपदी आल्यानंतर श्री. पवार यांनी 'नेहरू तारांगणा'च्या आधुनिकतेला प्राधान्य दिले. तारांगणासाठी वापरला जाणारा संगणकीकृत प्रोजेक्टर संच आशिया खंडात सर्वप्रथम इथे वापरला गेला. देशाच्या उभारणीमध्ये असलेले पंडित नेहरूंचे योगदान ग्रंथित करणारा प्रकल्प 'नेहरू सेंटर'ने राबवला. २००५ मध्ये शास्त्रज्ञ आईनस्टाइनचे शताब्दी वर्ष 'नेहरू सेंटर'ने साजरे केले. देशाची संरक्षणनीती, अर्थनीती याबाबतचे तज्ज्ञांचे ग्रंथ सेंटरच्या वतीने प्रकाशित करण्यात आले. 'नेहरू सेंटर'ने राजस्थान फेस्टीव्हल आयोजित केला होता. संस्थेच्या सर्व बैठकांना श्री. पवार आवर्जून उपस्थित असतात.

साखर कारखानदारीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट'चे श्री. पवार मार्च १९८९ पासून अध्यक्ष आहेत. मुळात 'डेक्कन शुगर इन्स्टिट्यूट' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेचे नवे नामकरण श्री. पवार यांनीच केले. सहकारी साखर कारखानदारीला आवश्यक संशोधन, नवतंत्रज्ञानाचे मार्गदर्शन, उपउत्पादनांच्या साखळीमध्ये वाढ, ऊसाच्या सुधारित जाती, शेतकऱ्यांसाठी उत्तम बियाणे यांसारख्या संस्थेच्या सर्व उपक्रमांना श्री. पवार यांच्या नेतृत्वाखाली गती आली आणि संस्था आर्थिकदृष्ट्या संपन्न झाली. कोणतीही संस्था आपल्या उद्दिष्टांसाठी समर्थ आणि स्वतंत्रपणे कार्य करू शकेल अशी त्या संस्थेची मजबूत आर्थिक स्थिती असावी यावर श्री. पवार यांचा कटाक्ष असतो. महाराष्ट्रातील संस्थाजीवन संपन्न होण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

# कृषिखात्याचा पायलट

# २

देश शेतीप्रधान असला तरी शेती उत्पादनाबाबत आपण स्वयंपूर्ण कधीच नव्हतो. जे देशाचं तेच राज्याचं. स्वातंत्र्योत्तर काळात अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करण्याचं स्वप्न पाहिलं जाऊ लागलं. महाराष्ट्रात दुष्काळामुळे सतत अन्नधान्याची टंचाई जाणवत असे. रेशन दुकानाबाहेर लोकांच्या रांगा लागलेल्या असत. तिथे पुरेसं धान्य उपलब्ध नसे. टंचाईच्या प्रश्नावर समाजात नेहमी अस्वस्थता, असंतोष असे. अन्नधान्याच्या बाबतीत जनतेच्या गरजा पूर्ण करायच्या, तर त्यासाठी अन्नधान्याचं पुरेसं उत्पादन होणं गरजेचं होतं. तेवढ्या उत्पादनवाढीसाठी शेतीतील सुधारणा वेगानं होणं गरजेचं होतं. शेतकऱ्याला अन्न पिकवण्यासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा मिळायला हव्या होत्या. थोडक्यात, विशेष लक्ष देऊन कृषिक्षेत्राची पुन:उभारणी करणं आवश्यक होतं. महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा अवधी द्यावा, असं आवाहन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी त्यावेळी केलं होतं.

श्री. नाईक यांनी त्या दिशेनं प्रयत्नही सुरू केले होते. पण, त्याच दरम्यान मुख्यमंत्री बदलले गेले. श्री.शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. पंतप्रधान इंदिरा गांधी दौऱ्यावर आल्या असताना त्यांनी चव्हाण यांना कृषिखात्यासाठी राज्यात सक्षम व्यक्ती नेमण्याची सूचना केली होती. ही जबाबदारी शरद पवार यांच्यावर आली आणि त्यांनी ती आनंदानं घेतली. राज्य अन्नधान्याच्या बाबतीत दोन वर्षांत स्वयंपूर्ण करण्याची नाईक यांची घोषणा प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार श्री. पवार यांनी केला. हा निर्धार पूर्ण करायचा तर मंत्रालयात बैठका घेऊन अधिकाऱ्यांना आदेश देण्यापेक्षा प्रत्यक्ष शेतकऱ्यांमध्ये जाऊन त्यांच्यात आत्मविश्वास जागवण्याची, त्यांना प्रोत्साहित करण्याची गरज होती.

श्री. पवार यांनी आपला आठवड्याचा कार्यक्रम त्याच पद्धतीने आखला. मंत्रिमंडळ बैठकीचा बुधवारचा दिवस वगळता आठवड्यातले

बाकीचे दिवस ते महाराष्ट्रात विविध भागांमध्ये फिरत असत. गावोगाव जाऊन शेतकऱ्यांच्या बैठका घेत असत. सरकारनं केलेला निर्धार, त्यासाठीचं नियोजन, शेतकऱ्यांना देऊ केलेली मदत आणि त्याचा शेतकऱ्यांनी घ्यायचा लाभ याविषयी सतत चर्चा करत असत. चांगली शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन पाहणी करत असत. आपण शेतीमध्ये चांगलं काही केलं तर थेट मंत्री येऊन त्याची पाहणी करतो, सरकार बांधावर येऊन आपलं  कौतुक करतं, ही भावना शेतकऱ्यांच्या मनात रुजवण्यात ते त्यातून यशस्वी झाले होते. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्राला दोन वर्षांत स्वयंपूर्ण करण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार करत होते.

शेतकऱ्यांना चांगल्या पद्धतीचं बियाणं उपलब्ध व्हावं, खतवाटप वेळेवर आणि योग्य पद्धतीने व्हावं, शेतकऱ्याला आवश्यक अर्थपुरवठा सुलभपणे व्हावा यासाठी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष त्यांच्या भागात जाऊन मार्गदर्शन होत होतं. या कामासाठी प्रयोग म्हणून सुरुवातीला महाराष्ट्रातले १९ जिल्हे निवडले गेले होते. हा प्रयोग 'पथदर्शी प्रकल्प' (पायलट प्रोजेक्ट) म्हणून त्याकाळी नावाजला गेला. किंबहुना कृषिविभागामध्ये पथदर्शी प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) हा शब्दच तेव्हापासून रूढ झाला.

श्री. पवार यांनी घेतलेले कष्ट, केलेलं नियोजन, त्याला प्रशासनाची मिळालेली साथ आणि शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद याला अपेक्षेपेक्षा चांगलं यश मिळालं. दोन वर्षांत राज्याची स्थिती सुधारली. राज्याच्या गरजेपोटी बाहेरून धान्य आणण्याची गरज संपली.

# कर्मचाऱ्यांचा तारणहार

# ३

राज्य सरकार कुठल्याही पक्षाचं असो, त्यांचे खरे कारभारी असतात ते राज्य सरकारी कर्मचारी. महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यापर्यंत त्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून पोहोचलेले प्रशासन बऱ्याचदा राज्य सरकारबद्दलचं जनमानस तयार करत असतं. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची ही ताकद ओळखली ती खरी शरद पवार यांनीच. 'प्रशासनाचा मित्र' म्हणून त्यांची जी ख्याती झाली, ती त्यामुळेच. प्रशासन वश असल्यामुळे त्यांनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणीही प्रभावीपणे झाली.

महाराष्ट्रातल्या राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या वाटचालीतला सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. राज्य सरकारी कर्मचारी समन्वय समितीने घडवलेला ५४ दिवसांचा संप. १४ डिसेंबर १९७७ रोजी या संपाला सुरुवात झाली आणि तो सलग ५४ दिवस चालला. सरकारी कर्मचाऱ्यांचे मित्र कोण आणि लांबचे कोण याचा निर्णय याच संपाने केला. त्याआधी १९ एप्रिल १९७५ लाही राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी एकजुटीने बेमुदत संप सुरू केला होता. अत्यावश्यक सेवांना संपाच्या पहिल्या २४ तासांतच त्यातून वगळलं होतं तरी अन्य कर्मचाऱ्यांनी आपला संप सुरूच ठेवला होता. तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मध्यवर्ती संघटनेच्या नेत्यांबरोबर त्यावेळी पुण्यात वाटाघाटी केल्या होत्या. पण, लगेचच आणीबाणी जाहीर झाल्याने चव्हाण यांनी वाटाघाटीत मान्य केलेल्या मागण्याही सरकारने पूर्ण केल्या नाहीत.

आणीबाणी संपल्यानंतर आणीबाणीच्या काळातील अन्याय दूर करण्यासाठी कर्मचाऱ्यांचं आंदोलन पुनः नव्या जोमाने सुरू झालं. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याबरोबर मे १९७७ मध्ये चर्चा झाली. आणीबाणीच्या काळातील प्रतिकूल निर्णय रद्द करण्यात आले. पण आर्थिक आणि सेवाविषयक मागण्यांवर चर्चा होऊनही त्याची कार्यवाही झाली नाहीच. कर्मचाऱ्यांनी वसंतदादांची त्यानंतर अनेकदा भेट घेतली. पण मार्ग निघाला नाही. त्यामुळे, ७ डिसेंबर १९७७ ला सरकारी-निमसरकारी

कर्मचारी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समन्वय समितीने एक दिवसाचा लाक्षणिक संप केला. विधानसभेत त्याच दिवशी वसंतदादांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारच्या दराने महागाई भत्ता आणि केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घोषित केला. निर्णय घोषित झाला तरी नंतर त्याची अंमलबजावणी मात्र झाली नाही. इतर मागण्याही तशाच राहिल्या. त्यामुळे, समन्वय समितीने १४ डिसेंबर १९७७ पासून बेमुदत संप सुरु केला. १० लाखांपेक्षाही अधिक कर्मचारी सहभागी झालेला हा संप तब्बल ५४ दिवस चालला.

सरकारची सुरुवातीची भूमिका कर्मचाऱ्यांबरोबर कुठलीही बोलणी न करता संप मोडून काढायचीच होती. पण, फेब्रुवारी १९७८ मध्ये होऊ घातलेल्या निवडणुकांमुळे संपाची गणितं बदलली. संप मागे घेतला गेला. संपाबाबत सरकारने घेतलेल्या ताठर भूमिकेचा परिणाम म्हणून सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या मतांवर काही प्रमाणात विपरित परिणाम मात्र झाला. एप्रिल १९७८ मध्ये नव्या सरकारने महागाई भत्ता समिती नियुक्त केली. पण, समितीला फक्त राज्य सरकारी कर्मचाऱ्यांपुरताच विचार करण्याची मर्यादा घातल्याने समन्वय समितीने त्याच महिन्यात पुन्हा एकदा आंदोलनाचं हत्यार उपसलं. सरकारने त्याला प्रतिसाद देण्यापूर्वीच राज्यात सत्तांतर झालं. श्री. पवार यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही दलाचं सरकार जुलै १९७८ मध्ये अधिकारारूढ झालं.

राज्यात खूप मोठ्या संख्येने असलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना श्री. पवार यांनी न्याय दिला. ९ ऑगस्ट १९७८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या महागाई भत्त्यातील ११ टक्क्यांची तफावत ३ टप्प्यात दूर करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यामुळे, १ मार्च १९७९ पासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राच्या कर्मचाऱ्यांइतकाच महागाई भत्ता मिळू लागला. ५४ दिवसांच्या संप काळात उचल म्हणून दिलेली पगाराची रक्कम सरकारने दर महिन्याला वसुल करण्याऐवजी कर्मचाऱ्यांनी रोज १ तास जादा काम व चौथ्या शनिवारीही कामावर येऊन भरुन देण्याला श्री. पवार यांनी मान्यता दिली. नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांनाही महागाई भत्त्याचा हाच दर लागू करण्यात आला तर आणीबाणीच्या काळात ५० ते ५५ वर्षे वयोगटांतील ज्यांना सक्तीने सेवानिवृत्त केलं होतं, त्यांना पुन्हा कामावर

घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. भोळे आयोगाच्या शिफारशीतील त्रुटी दूर करण्याची कर्मचाऱ्यांची मागणीही श्री. पवार यांनी मान्य केली. त्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी खास विभाग सुरू केला गेला. श्री. पवार यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर कर्मचाऱ्यांसाठी घेतलेल्या या निर्णयांमुळे त्यांचे आणि राज्यातील कर्मचाऱ्यांचे संबंध कायमच स्नेहाचे राहिले.

श्री. पवार १९९३ मध्ये महाराष्ट्राचे पुन्हा मुख्यमंत्री झाले आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या त्यानंतरच्या मागण्याही त्यांनी मंजूर केल्या. ११ ऑगस्ट १९९४ रोजी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी लाक्षणिक संप करुन मंत्रालयावर विराट मोर्चा नेला होता. त्याची दखल घेऊन श्री. पवार यांनी २२ सप्टेंबर १९९४ रोजी कर्मचारी संघटनेबरोबर वाटाघाटी केल्या आणि कर्मचाऱ्यांच्या बहुतेक सगळ्या मागण्या मान्य झाल्या. या वाटाघाटीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रामध्ये काम करणाऱ्या महिला परिचारिकेच्या मदतनीसांच्या वेतनामध्ये झालेली वाढ मुद्दाम नमूद करण्यासारखी आहे. या महिलांना दरमहा ५० रुपये, ८० रुपये आणि १४० रुपये यापद्धतीने वेतन दिलं जात होतं. ही परिस्थिती समोर आल्यानंतर मुख्यमंत्री पवार स्वतःच आश्चर्यचकीत झाले. 'महाराष्ट्रासारख्या राज्यात असं वेतन देणं म्हणजे राज्याला कमीपणा आणणारं आहे,' अशी प्रतिक्रिया त्यांच्या तोंडून बाहेर पडली. हे वेतन त्यांनी ३०० रुपये, नंतर ५०० रुपये नंतर ८०० रुपये आणि मग १,२०० रुपये असे वाढवलं. त्या वेतनात त्यानंतर आजपर्यंत एका पैशाचीही वाढ झालेली नाही!

# मनपरिवर्तनातून नामविस्तार ४

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश आपल्या पाठिराख्यांना दिला. शिक्षणापासून हजारो वर्षं वंचित ठेवलेल्या दलित समाजाला शिक्षणाचा लाभ देण्यासाठी बाबासाहेबांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. या संस्थेच्या वतीने औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची सुरुवातही केली. बाबासाहेबांच्या या कार्याचा सन्मान आणि स्मृती म्हणून मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव द्यावं अशी मागणी बरीच वर्ष होत होती. विद्यापीठाच्या सिनेटनं तसा ठरावही केला होता. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचं सरकार तेव्हा राज्यात होतं. विद्यापीठाच्या सिनेटच्या या ठरावाच्या अनुषंगाने ठरावाबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चाही झाली होती. संपूर्ण मंत्रिमंडळ ठरावाला अनुकूल होतं, पण घाईघाईनं निर्णय घेऊ नये असा काहींचा सूर होता. त्यामुळे, ठराव करण्याचा विचार ऐनवेळी बाजूला ठेवला गेला.

१९७७ साली महाराष्ट्रात शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही आघाडीचं सरकार सत्तेवर आलं. या सरकारने आपल्या १२ कलमी 'दिशादर्शक कार्यक्रमा'त मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर करण्याचं कलम समाविष्ट केलं होतं. जनतेला दिलेला प्रत्येक शब्द म्हणजे बांधिलकी आहे आणि ती पूर्ण करण्याची आपली जबाबदारी आहे, या जाणिवेने काम करणाऱ्या मुख्यमंत्री शरद पवार यांनी या कार्यक्रमाचा भाग म्हणून विद्यापीठाचं नामांतर करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राच्या पुरोगामी; विशेषत: मराठवाड्याच्या संतविचारांनी प्रेरीत असलेल्या भूमीमध्ये या ठरावाची अंमलबजावणी सहजपणे होईल, असा त्यांचा विश्वास होता. पण घडलं भलतंच. ज्या पक्षाच्या नेत्यांनी मुंबईमध्ये ठरावाला पाठिंबा दिला; नव्हे त्यासाठी आग्रह धरला, त्यांनी मराठवाड्यात जाऊन वेगळीच भूमिका घेतली.

अखेर २७ जुलै, १९७७ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत नामांतराचा ठराव झाला. मराठवाड्यातल्या दलित वस्त्यांमध्ये दिवाळी साजरी होऊ लागली.

त्याचवेळी त्याविरोधात आंदोलनही सुरू झालं. त्याने अल्पावधीत हिंसाचाराचं स्वरूप धारण केलं. समाजात तणाव निर्माण होऊ नये आणि परिस्थिती अधिक चिघळू नये, या हेतूने अखेर नामांतराचा निर्णय स्थगित करावा लागला. स्थगितीची घोषणा झाली आणि हिंसाचार थांबला; अस्वस्थता मात्र कायम राहिली.

हिंसक आंदोलनाने व्यथित झालेल्या श्री. पवार यांनी त्यावेळी विधानसभेत उपस्थित झालेल्या चर्चेला उत्तर देताना म्हटलं होतं, ''या हिंसाचारात ज्यांचं नुकसान झालं त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी सरकार घेईलच. पण, या निमित्ताने राज्यामध्ये, काही विभागांत समाजामध्ये जी दरी निर्माण झाली आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. समाजात निर्माण झालेल्या या समस्येचा वेगळ्या दृष्टिकोनातून उपाययोजना करावी लागेल. नामांतराचा प्रश्नही माझ्यादृष्टीने आता काही काळ पुढे ढकलण्याची बाब झाली आहे.'' हिंसाचाराच्या प्रतिक्रियेमुळे हा प्रश्न बाजूला ठेवला गेला; तो तब्बल दशकभर.

१९८८ मध्ये श्री. पवार पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९७७ साली केलेला नामांतराचा ठराव ते विसरले नव्हते. या ठरावाशी असलेली त्यांची बांधिलकी पक्की होती. यावेळी ठरावाची अंमलबजावणी सर्वसहमतीने करण्याचा निर्धार त्यांनी मनोमन केल. व्यापक सहमतीसाठी पुन्हा प्रयत्न सुरू केले. विद्यार्थी संघटना आणि त्यांच्या नेत्यांशी प्रदीर्घ चर्चा केल्या. त्यांच्या मनातील शंका दूर केल्या. सर्व सरपंचांना व्यक्तिगत पत्रं लिहिली, गावागावातील पोलीस पाटलांशी चर्चा केल्या. समाजपरिवर्तनासाठी व्यापक मनपरिवर्तन घडवलं. त्यातून नामांतराऐवजी नामविस्ताराचा मध्यममार्ग पुढे आला आणि मराठवाड्याची अस्मिता जपण्यासाठी 'मराठवाडा' हा शब्द ठेऊन नामविस्तार झाला. १४ जानेवारी १९९४ रोजी, मकर संक्रांतीच्या दिवशी महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेचं संक्रमण घडलं. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार प्रत्यक्षात आला. त्यावेळी मराठवाड्यामध्ये कृषिविद्यापीठ वगळता हे एकच विद्यापीठ होतं. श्री. शरद पवार यांनी नांदेड, हिंगोली या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापण्याचा निर्णय घेतला. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील नेते स्वामी रामानंदतीर्थ यांच्या नांवे नांदेडला नवं विद्यापीठ स्थापन झालं.

सामाजिक सुधारणेबाबतची निष्ठा पक्की असेल तर परिणामांची पर्वा न करता राजकारणालाही कसं वळण देता येतं, याचं अगदी अलिकडचं हे प्रत्यक्ष उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहे.

# सीमाप्रश्नावर तोडगा

# ५

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून बेळगावचा सीमाप्रश्न भिजत पडला आहे. सुरुवातीच्या काळात या प्रश्नावर अनेक आंदोलनं झाली. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांत या आंदोलनांनी अनेकदा हिंसक वळण घेतलं. कर्नाटकत त्या दरम्यान पोलिसी बळाचा यथेच्छ वापर करण्यात आला. कर्नाटकातल्या मराठी माणसांच्या किमान दोन पिढ्या महाराष्ट्रात येण्यासाठी तीव्र प्रयत्न करत होत्या. कर्नाटकातल्या मराठी माणसानं अगदी कालपरवापर्यंत सर्व स्थानिक स्वराज्यसंस्था, विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या एकीच बळ दाखवलं आणि महाराष्ट्रात जाण्याची आपली उच्छा प्रदर्शित केली. लोकशाही मार्गाने सर्वप्रकारे प्रयत्न करूनही कर्नाटकातल्या सीमाभागात अडकलेल्या मराठीजनांना अद्यापपर्यंत न्याय मिळालेला नाही.

राजकीय पातळीवर दोन्ही बाजूंनी या प्रश्नासाठी अत्यंत आक्रमक भूमिका मांडल्या गेल्या. भौगोलिक सलगता, एकभाषिक राज्य हे सगळे निकष महाराष्ट्राच्या बाजूने मांडूनही त्याला ना कर्नाटकाने दाद दिली, ना दिल्लीने. शरद पवार यांच्यासह अनेकांनी सीमाप्रश्नासाठीच्या या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. महाराष्ट्राच्या विधिमंडळात सर्व पक्षांच्या सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला मुख्यमंत्री म्हणून ते अनेकदा सामोरे गेले. पुरोगामी लोकशाही दलाचं सरकार राज्यात आणि जनता पक्षाचं सरकार केंद्रात असताना तसंच चंद्रशेखर पंतप्रधान असतानाही त्यांनी केंद्राच्या मध्यस्थीने हा प्रश्न सुटावा म्हणून प्रयत्न केले. दोन्ही राज्यांच्या परस्पर सहमतीने प्रश्न सुटत नसेल तर सीमाभागामध्ये जनमताचा कौल घेऊन प्रश्न सोडवावा, असा पर्यायही त्यांनी सुचवला होता. जनमताचा कौल घेण्याचं काम निवडणुक आयोगाकडे सोपवावं आणि दोन्ही राज्यांनी तो कौल मान्य करावा, इथपर्यंत त्यांनी सीमाप्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला होता. गोवा महाराष्ट्रात विलीन करण्याबाबत घेतल्या गेलेल्या जनमताचा कौल महाराष्ट्राने स्वीकारला, याची जाणीवही त्यांनी देशाला करुन दिली होती. मात्र, केंद्र आणि कर्नाटकातलं सरकार लोकशाही मार्गाने प्रश्न

सोडवण्यासाठी उत्सुक नाही हे लक्षात आल्यानंतर शेवटी त्यांनी न्यायालयाच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्याला तयारी दाखवली. सध्या हा प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे.

महाराष्ट्रात पुरोगामी लोकशाही दलाचं सरकार असताना मुख्यमंत्री शरद पवार यांनी वाटाघाटीद्वारे सीमाप्रश्नात समेट घडवण्याचा प्रयत्न केला. कर्नाटकात त्यावेळी रामकृष्ण हेगडे यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचं सरकार सत्तेवर होतं. बेळगावपासून साधारण १२–१५ किलोमीटरवर महाराष्ट्राच्या हद्दीत चंदगड तालुक्यामध्ये जुळं बेळगाव वसवण्याचा प्रस्ताव होता. या नव्या बेळगावच्या औद्योगिक आणि निवासी भागाची उभारणी नव्यानं केली जाणार होती. बेळगावमध्ये आधीपासूनच कृषिआधारित उद्योग विकसित झाले आहेत. ते सारे उद्योजक मूलतः मराठी आहेत. त्या उद्योजकांना जागा आणि स्वस्त वीज मिळाली असती तर त्यांच्या उद्योगांचा आणखी विकास झाला असता. भोवती नागरी लोकसंख्या आपोआपच वाढत गेली असती. आता कर्नाटकात अडकलेल्या बेळगावातल्या ज्यांना तिथून बाहेर पडायचं आहे, महाराष्ट्रात यायचं आहे, त्यांची सोय करता आली असती. कर्नाटक सरकारचा प्रश्नच नव्हता; महाराष्ट्र सरकारची नवं शहर बनवण्याची जबाबदारी घेण्याची तयारी होती. हा प्रस्ताव बेळगावमधल्या मराठीजनांनाही मान्य झाला होता. पण, महाराष्ट्र एकीकरण समितीतल्या काहींनी त्यात खोडा घातला. त्यामुळे, तो बारगळला.

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील सीमाप्रश्न सुटण्याची चिन्हं आज दिसत नाहीत. प्रश्न तसाच भिजत पडला आहे. कर्नाटकातील मराठी लोकांमधील उदासीनता वाढत चालली आहे. प्रश्नातील धग हळुहळू कमी होते आहे. या स्थितीपेक्षा श्री. पवार यांनी पुढाकार घेऊन तयार केलेला प्रस्ताव स्वीकारला असता तर तिथल्या मराठी माणसाची पिढ्यान् पिढ्यांची घुसमट टळली असती.

# जागतिक आर्थिक केंद्राची उभारणी

# ६

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. आशिया खंडातील सर्वात मोठं आर्थिक केंद्र. जगातील निवडक संपन्न आर्थिक राजधान्यांपैकी एक. ब्रिटिशांच्या काळापासून असलेला मुंबईचा हा लौकिक मुख्यतः दक्षिण मुंबईच्या जीवावर होता. मुंबईतून होणारा व्यापार, समुद्रमार्गे होणारी वाहतूक बहुतांश दक्षिण मुंबईतूनच होत असे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील बँकांची, वित्तसंस्थांची मुंबईतील मुख्यालयं किंवा भारतीय बँकांची, वित्तसंस्थांची, मोठ्या उद्योगसमूहांची मुख्यालयं याच भागात होती. स्वातंत्र्योत्तर काळात मुंबईचा लौकिक जसजसा वाढत गेला आणि जागतिक व्यापारात, आर्थिक व्यवहारात मुंबईचं महत्त्व जसजसं वाढत चाललं तसतशी अधिकाधिक कार्यालयं, आस्थापना मुंबईत येऊ लागल्या. दक्षिण मुंबई त्यासाठी अपुरी पडू लागली. जुन्या पायाभूत सुविधा नव्या काळात कालबाह्य ठरू लागल्या. तरीही मुंबईची कार्यसंस्कृती आणि भारताची आर्थिक क्षेत्रात सुरू असलेली घोडदौड यामुळे मुंबईत येऊ इच्छिणाऱ्या व्यापारी आस्थापनांची संख्या वाढती होती.

मुंबई आणि पर्यायानं देशाच्या प्रगतीची गती कायम ठेवायची तर मुंबईमध्ये चांगल्या सुविधा असलेलं नवं 'आर्थिक केंद्र' उभं करण्याची गरज होती. मुंबईचा वाढता पसारा लक्षात घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होतीच. १९७७ मध्ये याच प्राधिकरणावर 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स' या आर्थिक केंद्राची उभारणी करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. या 'आर्थिक केंद्रा'तील व्यवहारातून प्राधिकरणाला जो निधी उपलब्ध होईल, तो निधी प्राधिकरणाने मुंबईच्या विस्तारीत क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी किंवा असलेल्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी वापरावा, अशी कल्पना आहे.

नवं 'आर्थिक केंद्र' उभारण्यासाठी मुंबईच्या मध्यभागी मिठी नदीच्या किनारी 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स'साठी ३७० हेक्टर जमीन निश्चित करण्यात

आली. ४२ टक्के जमीन व्यापारी संकुलांसाठी तर १४ टक्के जमीन निवासी संकुलांसाठी वापरावी, असं धोरण ठरवण्यात आलं. हा विभाग पूर्णतः आर्थिक केंद्र म्हणूनच विकसित करायचा, असं निश्चित केलं असल्याने त्यासाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधा लक्षात घेऊनच या भागाची निवड करण्यात आली होती. सांताक्रुझचा आंतर्देशीय आणि सहारचा आंतरराष्ट्रीय विमानतळ या व्यापारी केंद्रापासून अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेची स्थानकं त्याच्या दोन्ही दिशांना आहेत. बाहेरगावहून येणाऱ्या रेल्वेगाड्यांचं पश्चिम रेल्वेवरचं वांद्रे टर्मिनस आणि मध्य रेल्वेचं लोकमान्य टिळक टर्मिनस ही दोन्ही टर्मिनस 'वांद्रे-कुर्ला संकुला'पासून फार दूर नाहीत. शिवाय पश्चिम द्रुतगती मार्ग 'वांद्रे-कुर्ला संकुला'ला लागूनच जात असून तिथून पूर्व द्रूतगती मार्गावर जाण्यासाठी आवश्यक जोडमार्गाची व्यवस्थाही उपलब्ध आहे.

'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स' मूलतः खाजण जमिनीवर उभा आहे. जेव्हा याची उभारणी सुरू झाली, त्यावेळी रस्त्यांची पुरेशी सुविधा नव्हती. जागतिक पातळीवर आणि भारतातही मुंबईला व्यापारी केंद्र म्हणून बघताना दक्षिण मुंबईकडे बघण्याची सवय लागली होती. त्यामुळे, या नव्या आर्थिक केंद्राकडे अर्थविनिमय करणाऱ्या आणि व्यापारी आस्थापनांना आकर्षित करण्यासाठी सरकारला खूप कष्ट करावे लागले. १९७८ साली मुख्यमंत्री झालेल्या श्री. पवार यांनी आपल्या प्राधान्यक्रमाच्या विषयांमध्ये 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स'चा विकास अधिक महत्त्वाचा मुद्दा मानला होता. श्री. पवार यांनी व्यापारी आणि उद्योग जगताशी असलेल्या संबंधांचा त्यासाठी उपयोग करून घेतला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बँकांना आपली मुख्यालयं उभारण्यासाठी विविध सवलती देऊन या कॉम्प्लेक्समध्ये आग्रहपूर्वक आणलं. अनेक उद्योगक्षेत्रांना त्यांच्या एकत्रित व्यवसायासाठी याच पद्धतीने आकर्षित केलं. श्री. पवार यांना महाराष्ट्राचं नेतृत्व करण्याची संधी दीर्घकाळ सलग न मिळाल्यामुळे या महत्त्वाच्या आर्थिक केंद्राचा विकास सुरुवातीच्या काळात फारच मंदगतीनं झाला. आज तिथे दिसणारं चित्रं अनेक वर्षांपूर्वीच दिसायला हवं होतं, असं नियोजनकर्त्यांचं म्हणणं आहे.

'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स'ला आज मुंबईच्या एकूण पसाऱ्यामध्ये अतिशय महत्त्वाचं स्थान आहे किंबहुना आज मुंबईचं हृदय म्हणूनच त्याकडे पाहिलं जातं. नव्यानं झालेला सी-लिंक, तसंच आर्थिक उदारीकरणाच्या धोरणानंतर देशात आलेले आर्थिक प्रगतीचे वारे या

ठिकाणाची किंमत कितीतरी पटींनी वाढवणारे ठरले आहेत. 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स'मध्ये आजघडीला भूखंडाचा भाव २५ ते ३२ हजार रुपये प्रती चौरस फूट असा आहे. पूर्वी मुंबईतील सर्व महत्त्वाच्या जाहीरसभा शिवाजी पार्कला होत असत. पण न्यायालयाच्या निर्णयामुळे आता शिवाजी पार्क हे केवळ क्रीडांगण झाल्याने अशा सभा 'वांद्रे-कुर्ला संकुलात'च होतात. 'वांद्रे-कुर्ला संकुला'मध्ये ज्या 'ओपन स्पेस' आहेत, तिथे आता आंतरराष्ट्रीय स्तरांवरचे संगीताचे कार्यक्रम, मनोरंजनक्षेत्रातील प्रतिष्ठेचे पुरस्कार, धार्मिक आणि राजकीय मेळावे-सभा होत असतात. आतापर्यंत तिथे तीन 'इंटरनॅशनल स्कूल' सुरू झाली असून मुंबई क्रिकेट असोसिएशनची इनडोअर क्रिकेट ॲकेडमी आणि सुसज्ज मैदान आकाराला आलं आहे.

साधारण ४० वर्षांपूर्वी उभारणी सुरू झालेलं 'वांद्रे-कुर्ला संकुल' आज मुंबईच्या संपन्नतेतील मानाचा तुरा मानला जातो. उशीरा का होईना , पण आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्राचं रूप त्याला आता आलं आहे.

# 'पेट्रोकेमिकल'ची पायाभरणी

# ७

८०च्या दशकाच्या उत्तरार्धात मुंबईजवळ समुद्रात नैसर्गिक वायू आणि तेलाचे साठे सापडले. राज्याच्या आर्थिक भरभराटीसाठी या दोन्ही गोष्टींचा चांगला उपयोग होऊ शकतो हे त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या शरद पवार यांनी ओळखलं होतं. या साठ्यांचा उपयोग राज्यातील गुंतवणूक वाढवण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी कसा करून घेता येईल, यासाठी डॉ. होमी सेठना यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समितीची नियुक्ती केली गेली. या समितीने तेल आणि नैसर्गिक वायूवर आधारीत कारखानदारी रायगड जिल्ह्यामध्ये उभी केली जावी, अशी शिफारस केली. एकूण तीन टप्प्यांमध्ये ही कारखानदारी उभी राहावी आणि ती कुलाबा (आताचा रायगड), ठाणे आणि रत्नागिरी या तीन जिल्ह्यांमध्ये उभी राहिली तर त्याचा महाराष्ट्राला फायदा होईल, असा विचारही या समितीने मांडला. नैसर्गिक वायूपासून प्राथमिक स्वरूपाचा कच्चा माल आणि त्यापासून प्रत्यक्ष ग्राहकोपयोगी वस्तूंची निर्मिती, असं या कारखानदारीचं स्वरूप होतं.

नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलावर प्रक्रिया करणारे प्रकल्प नेमके कुठे करावेत, यावरून त्यावेळी बराच वाद झाला होता. केंद्र सरकारची समिती त्यासाठी आली होती. त्यांनी महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेलगतच्या जागा त्यासाठी सुचवल्या होत्या. विशेषतः तारापूर परिसरातील जागेची निवड करावी, असा केंद्राचा आग्रह होता. मुख्यमंत्री म्हणून श्री. पवार यांनी त्यावेळी ठाम भूमिका घेतली. नैसर्गिक वायू आणि तेलाचे साठे महाराष्ट्रालगतच्या समुद्रात सापडले असल्याने त्यावर आधारीत उद्योग महाराष्ट्रातच उभे राहावेत आणि त्यामध्ये राज्य सरकारचा वाटा असावा, असं त्यांचं म्हणणं होते. नैसर्गिक वायू किंवा तेलाचे साठे ही राष्ट्रीय संपत्ती असल्याने त्याबाबत कोणत्याही एका राज्याला हक्क सांगता येणार नाही, अशी भूमिका शेजारच्या काही राज्यांनी घेतली होती. शरद पवार यांनी मात्र विधानसभेत बोलताना ''गुजरात राज्यामध्ये तेलाचे साठे सापडले तेव्हा गुजरात हे महाराष्ट्राजवळचे राज्य आहे म्हणून त्यावर

आधारीत उद्योग महाराष्ट्रात व्हावेत, अशी भूमिका आम्ही घेतली नाही. देशाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने असे उद्योग जिथे उभारणं फायद्याचं आहे, तिथेच ते उभारावेत अशी आमची भूमिका आहे. अंकलेश्वरला सापडलेल्या तेलसाठ्यांनी गुजरातमध्ये उद्योगांची उभारणी झाली. आमच्या सरकारची भूमिका संकुचित आहे असं कोणी म्हणत असेल तर ते अन्याय करणारं आहे. निर्णयास विलंब लावल्याने देशाची संपत्ती वापराविना वाया जात असेल तर ते योग्य नाही.'' असं ठणकावलं होतं. नैसर्गिक वायू ही वेळच्या वेळी उपयोगात आणण्याची गोष्ट असते. त्यामुळे हा साठा सापडल्यानंतरची पहिली १५ वर्षं सर्वाधिक महत्त्वाची होती. नैसर्गिक वायू आणि तेलावर आधारीत उद्योगांची उभारणी आणि त्यातून कमीतकमी वेळात उत्पादन सुरू होणं सर्वाधिक महत्त्वाचं होतं. वेळेबरोबरची ही शर्यत जिंकायची तर योग्य आणि त्वरित धोरणात्मक निर्णयांची गरज होती. मुख्यमंत्री असलेल्या श्री. पवार यांच्यामुळे ही गरज पूर्ण झाली.

साधारण १२०० कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक असलेल्या या उद्योगासाठी राज्य सरकारने ६४० कोटी रुपयांच्या गुंतवणुकींची तयारी दाखवली. त्यासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याची योजना आखली. या महामंडळामध्ये तज्ज्ञ व्यक्ती आणि अधिकाऱ्यांना नियुक्त करून पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्सच्या उभारणीला गती देण्यासाठी श्री. पवार यांची धडपड कामी आली. कुलाबा आणि त्यालगतच्या कोकण किनारपट्टीत त्यावेळी रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नव्हत्या. उपयोगात न आणल्यामुळे नैसर्गिक वायू जाळून टाकावा लागत होता. कोकणातली गुंतवणूक आणि तिथे रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नैसर्गिक वायू आणि तेल यावर आधारीत उद्योगांची उभारणी त्याच भागात होणं महत्त्वाचं होतं. उद्योगक्षेत्रातील हितसंबंधीयांच्या प्रयत्नांना न जुमानता श्री. पवार यांच्यामुळेच हे उद्योग रायगड जिल्ह्यामध्ये उभे राहीले. त्याचा फायदा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला, इथल्या रोजगारनिर्मितीला झाला.

# उद्योगसारथी ८

औद्योगिकदृष्ट्या देशातल्या सर्वाधिक प्रगत राज्याचं एकहाती नेतृत्व करायचं तर नेत्याच्या विचारामध्ये प्रगत औद्योगिक समाजाचं चित्र असावं लागतं. औद्योगिक विकास; विशेषत: जागतिक संदर्भात होणाऱ्या बदलांचा अंदाज घेत राज्यातील औद्योगिक विकासाची दिशा ठरवण्याची जाण नेतृत्वाच्या अंगी असावी लागते. देशातले सर्व राजकारणी शरद पवार यांना यासाठी पैकीच्या पैकी मार्क देतातच, पण, रतन टाटा यांच्यासारख्या दिग्गज उद्योगपतीनेही एका समारंभात त्यासाठी जाहीरपणे श्री. पवार यांची मुक्त कंठाने प्रशंसा केली होती.

१९८८ मध्ये श्री. पवार दुसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले, तेव्हा देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनामध्ये महाराष्ट्राचा वाटा २५ टक्के होता. देशातील एकूण रोजगाराच्या संधींपैकी महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्राने आपला वाटा १६ टक्क्यांपर्यंत नेला होता. १९९० पर्यंत, श्री. पवार यांच्या नेतृत्वाखालील पुढच्या अवघ्या दोन वर्षांत ३२ हजार नवे लघुउद्योग आणि एक हजार मध्यम व मोठे उद्योग नोंदवले गेले होते. त्याकाळी मुंबई–ठाणे–पुणे याच 'सुवर्ण त्रिकोणा'मध्ये अडकलेला औद्योगिक विकास श्री. पवार यांनी त्याबाहेर राज्यात इतरत्र नेण्याचा जोरदार प्रयत्न केला होता. देशी आणि परदेशी उद्योजकांना उद्योग उभारणीला प्रोत्साहन म्हणून या त्रिकोणाबाहेर त्यांनी अनेक सवलती जाहीर केल्या. मुख्यमंत्री झाल्यानंतर १९८८ मध्येच त्यांनी अशा प्रोत्साहनात्मक योजनेचं एक पॅकेज जाहीर केलं होतं. उद्योगक्षेत्रात होणाऱ्या गुंतवणुकीतून राज्यात विकसित भागातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ नयेत आणि तरुणांचं ग्रामीण भागातून तिकडे स्थलांतर होऊ नये, अशी त्यामागची उच्छा होती. औद्योगिकदृष्ट्या मागास असलेल्या मराठवाडा आणि विदर्भात नवे उद्योग यावेत, असं धोरण त्यांनी तेव्हाच नक्की केलं होतं. राज्यातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत विदर्भात बुटीबोरीला याच उद्देशाने उभारली गेली.

मुंबई–ठाणे–पुणे यापलिकडे महाराष्ट्रात औद्योगिकीकरण व्हावं यासाठी विविध जिल्ह्यांतल्या १६५ ठिकाणांची निवड 'ग्रोथ सेंटर्स' म्हणून करण्यात आली होती. या 'ग्रोथ सेंटर्स'च्या वेगवान विकासाची काळजी घेण्यासाठी १९८८ मध्येच 'टास्क फोर्स'ची स्थापनाही करण्यात आली होती. नियोजित

१६५ पैकी ९४ ठिकाणांना १९९० मध्ये मान्यताही दिली गेली होती. समुद्रात मुंबईजवळ नैसर्गिक वायू सापडला होता. त्यामुळे, कोकणात रायगड जिल्ह्यात या वायूवर आधारित उद्योग उभे राहावे, असा आग्रह त्यांनी केंद्र सरकारकडे धरला होता. रायगड जिल्ह्यामध्ये नंतरच्या काळात तसे प्रकल्प उभे राहिलेही. तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाने महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक वायूवर आधारित कारखानदारी वाढवावी, सरकार आणि खासगी गुंतवणुकदारांच्या संयुक्त भागीदारीतून केंद्र सरकारने पेट्रोकेमिकल प्रकल्प उभारण्याची परवानगी द्यावी त्यासाठी श्री. पवार यांनी त्यावेळी प्रयत्न केले होते. या उद्योगक्षेत्राला आवश्यक असणारं कुशल मनुष्यबळ पुरविणारे विविध पातळ्यांवरचे शैक्षणिक अभ्यासक्रम असलेल्या शिक्षणसंस्था सुरू करण्याचा विचारही त्यांनी त्यावेळी मांडला होता.

नवे तांत्रिक शोध आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे पुढे आलेल्या उद्योगक्षेत्रांकडेही त्यांचा डोळा होता. 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ मटेरिअल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स' आणि 'इलेक्ट्रॉनिक रिसर्च अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर' स्थापन करण्याची तयारी श्री. पवार यांनी ९०च्या दशकातच केली होती.

पुणे जिल्हा कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद आणि नाशिक या सर्वांनाच मध्यवर्ती आहे. 'बजाज', 'टेल्को', 'फोर्स' आदी ऑटोमाबाईल कंपन्यांचं बस्तान पुण्यात बसलं होतं. त्यांचं उत्पादन तिथे सुरू होतं. साहजिकच, नव्या ऑटोमोबाईल कंपन्याही त्याच्याच आजुबाजूला आकर्षित होणार हे उघड होतं. झालंही तसंच. तळेगावला 'जनरल मोटर्स' ही कंपनी आली. 'फियाट'नं रांजणगावच्या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रकल्प सुरू केला. 'प्याजो' या तीनचाकी वाहन उत्पादक कंपनीने बारामती औद्योगिक वसाहतीतून आपलं उत्पादन सुरू केलं. 'स्कोडा'ने औरंगाबादमध्ये आपलं केंद्र केलं. 'महिंद्रा' नाशिकमध्ये वसली. ऑटोमाबाईल क्षेत्रातील या सगळ्या मोठ्या कंपन्या तिथे आल्यामुळे या कंपन्यांच्या उत्पादनांना लागणारे छोटे-छोटे सुटे भाग बनवणाऱ्या कंपन्यांचीही गरज निर्माण झाली. हे छोटे उद्योग साहजिकच पुणे-औरंगाबाद-नाशिक या त्रिकोणातील परिसरात सुरू झाले. त्यामुळे, आज केवळ पुणे जिल्ह्यात असलेल्या औद्योगिक वसाहतीतून ६० हजाराच्या आसपास तंत्रज्ञांना रोजगार उपलब्ध झाला आहे. अकुशल आणि अर्धकुशल कामगारांची संख्या यापेक्षा कितीतरी अधिक आहे. शिवाय, या सर्व कंपन्यांसाठी लागणाऱ्या अन्य सेवा पुरवणारे छोटे व्यावसायिक आणि पुरवठादार वेगळेच! पुण्याला आता भारताचं 'डेट्रॉईट' म्हणू लागलेत ते त्यामुळेच!

# कष्टकऱ्यांचा पाठीराखा

# १

कष्टकऱ्यांच्या न्याय्य हक्कांबद्दल आणि त्यांना दिलासा देणारे कायदे करण्याबद्दल शरद पवार कायदेमंडळात प्रवेश केल्यापासूनच अत्यंत आग्रही आहेत. जेव्हा सत्तेचं पद मिळालं तेव्हा प्रत्येक वेळी त्यांनी कष्टकऱ्यांच्या बाजूचे, त्यांना न्याय देतील असे कायदे होतील, याची जाणीवपूर्वक काळजी घेतली. कामगार–शेतकरी–असंघटित मजूर यांनी केलेल्या मागण्या श्री. पवार मंत्री किंवा मुख्यमंत्री असण्याच्या काळात जेवढ्या त्वरेनं मान्य झाल्या, तेवढ्या क्वचितच इतरवेळी झाल्या असतील. त्यामुळे सर्व कामगार संघटना, कर्मचारी संघटना श्री. पवार यांच्याविषयी आपला कृतज्ञताभाव वेळोवेळी प्रकट करत असतात.

माथाडी कामगार हा खरं तर भूमिहीन शेतमजूर किंवा अल्पभूधारक कोरडवाहू शेतकरीच. ओझं वाहण्याचं अत्यंत कष्टाचं काम करणाऱ्या माथाडी कामगाराला कधीकधी गरजेपोटी आपल्या आरोग्याच्या, आरोग्य सुरक्षिततेच्या गोष्टींकडे कानाडोळा करून पोटासाठी कष्ट उपसत राहावे लागतात. हा माथाडी कामगार जिथे जिथे संघटित झाला आणि मागण्या करू लागला, तिथे तिथे श्री. पवार यांनी त्याला सहानुभूतीपूर्वक मदत केली. दिवंगत यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई, नरेंद्र तिडके यांची परंपरा कायम ठेवत श्री. पवार यांनीही महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनला कायम सहकार्य केलं. माथाडी कायदा, १९६९ अन्वये माथाडी मंडळाची स्थापना आणि त्या मंडळाची सक्षमता श्री. पवार यांच्यामुळेच झाली. त्यांनी संघटनेचे संस्थापक दिवंगत अण्णासाहेब पाटील यांना त्यासाठी मोलाची मदत केली.

मुंबईसारख्या महागड्या शहरामध्ये, जिथे जागेच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत, तिथे माथाडी कामगाराची स्वत:ची घरं होणं ही अशक्यप्राय गोष्ट होती. शरद पवार यांनी १९८८–८९ मध्ये संघटनेला माथाडी कामगारांच्या घरांसाठी वडाळा आणि चेंबूर भागात १ रुपया दराने

४२ एकर जमीन देण्याचा निर्णय घेतला. काही वादांमुळे २००६ मध्ये त्यातील १८ एकर जमीनच माथाडींच्या पदरात पडली असली तरी १९९३ ते ९५ दरम्यान त्यांनी नवी मुंबईत कोपरखैरणे येथे सिडकोकडून ५ हजार घरं बांधून ती कामगारांना उपलब्ध करून दिली. केंद्र सरकारने माथाडी कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधी व अन्य रकमेसाठी माथाडी मंडळावर २४८ कोटी रुपयांचा आयकर आकारला होता. केंद्र सरकारने कृषिमंत्री असताना श्री. पवार यांनी प्रयत्न करून केंद्रीय अर्थमंत्रालयाकडून हा आयकर माफ करून घेतला.

श्री. पवार यांनी माथाडी नेतृत्वाला विधीमंडळात काम करण्याची संधीही उपलब्ध करून दिली. माथाडी कामगारांचे नेते शशिकांत शिंदे यांना १९९९ पासून जावळी मतदारसंघातून उमेदवारी दिली. कॅबिनेट मंत्रीपदही दिलं. दिवंगत अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र आणि माथाडी कामगारांचे नेते नरेंद्र पाटील यांनाही २०१२ पासून विधानपरिषदेच्या माध्यमातून काम करण्याची संधी दिली.

# प्रकल्पग्रस्तांना दिलासा

# १०

मुंबईवरील लोकसंख्येचा भार कमी करावा, मुंबईतील कंपन्या, कारखाने, घाऊक बाजार महानगराबाहेर नेऊन मुंबईवरील अतिरिक्त ताण कमी करावा या हेतूने १९७० मध्ये मुंबईजवळ एक नवीन शहर, 'जुळी मुंबई' वसवण्याचा निर्णय घेण्यात आला. हे शहर वसवण्यासाठी राज्य सरकारने 'सिडको'ची स्थापना केली. सिडकोने जमीन संपादित करावी आणि त्यावर अत्याधुनिक, सुनियोजित शहर जन्माला घालावं, अशी मूळ कल्पना होती. त्यानुसार सिडकोने मुंबईत प्रवेश करताना आता असलेल्या खाडीपुलाच्या पलिकडे हजारो एकर जमीन खरेदी केली. एकूण ९५ गावांतील शेतकऱ्यांकडून संपादित केलेल्या या जमिनीवर सिडकोने घरबांधणीसाठी भूखंड तयार करून प्रारंभही केला. मात्र एवढ्या प्रचंड जमिनीवर घरबांधणी करणं आणि शहर वसवणं 'सिडको'च्या ताकदीबाहेर आहे हे लक्षात आल्यानंतर सिडकोने घरबांधणीसाठीचे भूखंड खाजगी बिल्डरना द्यायला सुरुवात केली. घरबांधणी आणि विक्रीतून बिल्डर मोठा नफा कमावताहेत, हे लक्षात आल्यानंतर ज्यांच्या जमिनी गेल्या, ते प्रकल्पग्रस्त जागृत झाले आणि त्यांनी १९८० पासून आंदोलनात्मक संघर्षाला सुरुवात केली. 'सिडको'नं एकरी १० ते १२ हजार रुपये नुकसानभरपाई देऊन शेतकऱ्यांकडून जमिनी संपादित केल्या होत्या. जी जमीन खूपच सुपीक आणि उपजाऊ आहे, त्या जमिनीला सर्वाधिक एकरी १५ हजार रुपये भाव दिला होता. त्याच जमिनीचा विकास करून, घरं बांधून बिल्डर कित्येक पट नफा कमावत होते. आमच्या जमिनी काढून घेतल्या, त्या त्यांची घरं भरण्यासाठी का? असा भूमीपुत्रांचा सवाल होता.

१९८४ मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या त्या आंदोलनानं उग्र रूप धारण केलं. उरणजवळ जासईला प्रकल्पग्रस्तांचा एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. हिंसक वळण लागलं. आंदोलन आटोक्यात आणण्यासाठी पोलीसांनी केलेल्या कारवाईत पाचजण ठार तर अडतीसजण गंभीर जखमी झाले. प्रकल्पग्रस्तांच्या भावना त्यामुळे

आणखी भडकल्या. दिवंगत दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाला श्री. शरद पवार यांची सहानुभूती होती. काही काळातच श्री. पवार मुख्यमंत्री झाले. प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांना त्यांनी पूर्वी पाठिंबा दिला असल्याकारणाने मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने त्यांनी बोलणी सुरू केली. साडेबारा टक्के भूखंड विकसित करून प्रकल्पग्रस्तांना परत करण्याचा तोडगा त्या बोलण्यातच पुढे आला आणि मान्यही झाला. सुमारे ५० हजार प्रकल्पग्रस्तांना या निर्णयाचा लाभ झाला.

विकसित भूखंडाचा उपयोग शेतकरी आपल्या व्यावसायिक फायद्यासाठी करू शकतो. मिळालेल्या अशा विकसित भूखंडावर अनेक प्रकल्पग्रस्तांनी स्वतःहून घरबांधणी केली. अनेकांनी आपल्या वाट्याचा विकसित भूखंड भागीदारीने बिल्डरला दिला. केवळ नुकसानभरपाई न मिळता प्रकल्पग्रस्तांना या माध्यमातून घसघशीत लाभ झाला. त्यामुळे पुढे विविध ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांनी याच पद्धतीने मागण्या करून अधिक फायदा मिळवला. सरकारनेही अनेक ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांच्या नुकसानभरपाईसाठी हेच सूत्र अवलंबलं. १९९९ मध्ये झालेल्या पुनर्वसन कायद्यासाठीही या सूत्राचा आधार घेण्यात आला आहे.



❖ युवा कुस्तीगीरांसमवेत श्री. शरद पवार




❖ भारताचे माजी राष्ट्रपती (दिवंगत) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासमवेत श्री. शरद पवार



❖ जागतिक बँकेचे अध्यक्ष डॉ. रॉबर्ट मॅक्मार यांच्यासमवेत श्री. शरद पवार



❖ गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्यासमवेत श्री. शरद पवार



❖ एका प्रसन्न क्षणी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्यासमवेत श्री. शरद पवार



❖ अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांची श्री. शरद पवार यांच्या निवासस्थानी भेट



❖ चीनमध्ये सैनिकांकडून मानवंदना स्वीकारताना श्री. शरद पवार




❖ बांगला देशच्या पंतप्रधान शेख हसिना वाजेद यांच्यासमवेत
शेतीविषयक प्रश्नांची चर्चा करताना श्री. शरद पवार




❖ इंटेल या अमेरिकन कंपनीचे अध्यक्ष क्रेग बॅरेट आणि त्यांच्या पत्नी बार्बरा यांच्यासमवेत संगणक शिक्षण प्रसाराबाबत चर्चा करताना श्री. शरद पवार



❖ चीनचे संरक्षणमंत्री क्वीग जेवाई यांच्यासमवेत बिजींगमध्ये श्री. शरद पवार



❖ बारामती विधानसभेच्या पहिल्या निवडणुकीच्या मतमोजणीवेळी सहकाऱ्यांसमवेत श्री. शरद पवार




❖ दिवंगत वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात पहिल्यांदा राज्यमंत्री म्हणून शपथ घेताना श्री. शरद पवार



❖ अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्यासमवेत श्री. शरद पवार



❖ एका इफ्तार पार्टीवेळी श्री. शरद पवार



❖ पॅलेस्टिनी लिबरल फ्रंटचे नेते यासर अराफत यांच्यासमवेत श्री. शरद पवार
सोबत महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष शंकरराव जगताप



❖ ज्येष्ठ साहित्यिक पु.ल. देशपांडे यांच्यासमवेत श्री. शरद पवार

# मंडल आयोगाची अंमलबजावणी

# ११

१९९० हे वर्ष भारतीय राजकारणाला कलाटणी देणारं वर्ष मानलं जातं. महत्त्वाचं एक कारण मंडल आयोग. १९८० साली केंद्र सरकारला सादर झालेल्या मंडल आयोगाच्या शिफारशी ७ ऑगस्ट १९९० रोजी तेव्हाचे पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी स्वीकारल्या. देशातल्या ३ हजार ७४३ (त्यात महाराष्ट्रातील २७२) जातींना मंडल आयोगाने विविध सवलतींची शिफारस केली. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्वरूपाचे ११ निकष लाऊन मंडल आयोगाने शिफारशी केल्या असल्या तरी त्याचा मुख्य उद्देश सामाजिक मागासलेपण निश्चित करणं हाच होता.

मंडल आयोगाच्या या शिफारशींविरोधात देशभर आंदोलन पेटवण्यात आले. त्या प्रतिक्रियेने केंद्र सरकार दोन पावलं मागे गेलं. शैक्षणिक क्षेत्रातील सवलती केंद्र सरकारने स्थगित केल्या. महाराष्ट्रात मात्र तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी शैक्षणिक सवलतींसह मंडल आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी केली. मंडल आयोगाची अंमलबजावणी करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं. सामाजिक न्यायाचा भाग म्हणून मागास जातींना नोकरीमध्ये आरक्षण द्यायलाच हवं, पण शिक्षणामध्ये तशा सवलती दिल्या नाहीत तर नोकरीतील आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी तरी मागास तरुण सक्षम कसे होणार? असा प्रश्न उपस्थित करून श्री. पवार यांनी त्यावेळी यासंदर्भातील प्रश्न निकाली काढले होते. शिक्षणावर केली जाणारी मोठी आर्थिक तरतूद पाहता राज्याची शिक्षणक्षेत्रातील प्रगती नेत्रदीपक नव्हती. देशात राज्याचा दुसरा किंवा तिसरा क्रमांक लागत होता. जोपर्यंत शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सर्वसमावेशकता येणार नाही आणि मागास विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती रोखली जाणार नाही तोपर्यंत राज्य शिक्षणक्षेत्रात प्रगती करणार नाही, ही वस्तुस्थिती श्री. पवार यांनी ओळखली आणि जनतेसमोर मांडली.

महाराष्ट्राला आरक्षणाची मोठी परंपरा आहे. महात्मा फुले यांनी १८८२ मध्ये इंग्रज सरकारकडे मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची मागणी

केली होती. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात देशात सर्वप्रथम ५० टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला होता. १९०२ साली घेतलेल्या या निर्णयाची परंपरा महाराष्ट्राला होती. मंडल आयोगाच्या शिफारशींचं समर्थन करताना श्री. पवार यांनी तर 'चातुर्वर्ण्य हेच या देशातील पहिले आरक्षण होतं', अशी मांडणी केली. या सर्व बाबींचा परिणाम म्हणून मंडल आयोगाच्या विरोधात देशात उसळलेल्या असंतोषाची धग महाराष्ट्राला लागली नाही. उलट, श्री. पवार यांच्यामुळे महाराष्ट्र हे अंमलबजावणीमध्ये देशातलं पहिलं क्रांतिकारक राज्य ठरलं.

अनुसूचित जाती-जमाती, भटके-विमुक्त आणि अन्य आरक्षणाला धक्का न लावता मुख्यमंत्री शरद पवार यांनी त्यावेळी इतर मागासवर्गीय जातींना २९ टक्के आरक्षणाचा लाभ दिला. सामाजिक निकषावरील आरक्षण ४९ टक्क्यांपेक्षा अधिक असू नये या सर्वोच्च न्यायालयाच्या अटीचं पालन करून त्यात जेवढं जास्तीत जास्त देता येईल तेवढं आरक्षण इतर मागासवर्गीय जातींना मिळालंच, शिवाय, भटक्या-विमुक्तांनाही ४ टक्के आरक्षणाचा अधिक लाभ झाला. त्यांचं पूर्वीचं ४ टक्के आरक्षण ८ टक्क्यांवर गेलं.

समाजातील ५२ टक्के लोकसंख्या असलेल्या जातीसमूहांना मंडल आयोगाच्या माध्यमातून शरद पवार यांनी विकासाचा आणि उद्धाराचा मार्गच खुला करून दिला, असं मानलं जातं.

# तत्त्वनिष्ठ, प्रामाणिकपणाला घर | १२

सचोटी, प्रामाणिकपणा आणि आपल्या जीवनात नैतिक मूल्यांचं आचरण करणारी माणसं आता राहिली नाहीत, असं आपल्याकडे सतत बोललं जातं. त्यातही अशी माणसं राजकारणात असतात. यावर विश्वास ठेवायला सहजासहजी कोणी तयार होत नाही.

गोष्ट आहे छोटीशीच. पण, आयुष्यभर सदाचरणाचा धडा मिळेल अशा आदर्श उदाहरणाची. श्री. मोरारजीभाई देसाई आपल्याला देशाचे माजी पंतप्रधान म्हणून माहीत आहेत. मोरारजीभाई मुंबईचे. दिल्लीत मंत्री म्हणून आणि पुढे पंतप्रधान म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली तेव्हा ते दिल्लीला गेले. तिथे त्यांना सरकारकडून घर मिळालं होतं. मुंबईत येत तेव्हा 'राजभवना'वर त्यांची सोय असे. पण पंतप्रधानपदावरून पायउतार झाल्यानंतर ते जेव्हा मुंबईला येत तेव्हा आपल्या मुलाच्या मरिन ड्राईव्ह वरील घरी थांबत असत. त्यांच्या मुलाला, कांतीभाईला ते घर काही कायदेशीर बाबींमुळे सोडावं लागणार होतं. त्यामुळे, देशाच्या माजी पंतप्रधानाची मुंबईत राहाण्याची अडचण होणार होती. प्रामाणिक स्वातंत्र्यसैनिक आणि माजी पंतप्रधान असणाऱ्या माणसावर ही वेळ येणं शरद पवार यांना योग्य वाटलं नाही. त्यांना राज्य सरकारच्यावतीनं घर उपलब्ध करून देणं शक्य होतं. पण, मोरारजीभाईंचा स्वभाव माहीत असल्याने त्यांच्यासमोर हा प्रस्ताव ठेवायचा कोणी, असा मोठा प्रश्न होता.

प्रशासनातील कोणी अधिकारी ही जबाबदारी घ्यायला तयार होईना; तेव्हा श्री. पवार यांनीच मोरारजीभाईंशी बोलायचं ठरवलं. विषय काढला तेव्हा सुरुवातीला मोरारजीभाईंनी त्यांना फटकारलंच. 'मुंबईमध्ये लोकांना घरांची एवढी अडचण असताना तुम्ही दिलेलं घर मी कसं स्वीकारणार? ते शक्य नाही', असं पहिल्या फटक्यातच सांगून टाकलं. मात्र, श्री. पवार यांनीही आपली बाजू लावून धरली. त्यांना आणखी थोडं समजाऊन सांगितल्यानंतर मोरारजीभाई अनिच्छेनेच घर स्वीकारायला तयार झाले. पण, तशी तयारी दाखवतानाही त्यांनी अट घातलीच. 'मी तुमचा प्रस्ताव

स्वीकारेन; पण माझ्या अटीवर. तुम्ही देऊ केलेलं घर फक्त माझ्यापुरतंच असेल. माझ्यानंतर ते घर माझ्या नातेवाईकांना मिळणार नाही. ते घर सरकारनं लगेच परत घेतलं पाहिजे.'

मोरारजीभाईंची ही अट स्वीकारण्याशिवाय श्री. पवार यांच्यापुढे पर्याय नव्हता. त्यांनी ती स्वीकारलीही. मोरारजीभाई त्या घरात राहिलेही. स्वातंत्र्यासाठी खस्ता खालेल्या, देशाच्या सर्वोच्च पदी राहूनही व्यक्तिगत जीवनात साधेपणा जोपासणाऱ्या, तत्त्वनिष्ठ नेत्यांची अशी काळजी घेतली गेली तरच समाजातील कृतज्ञता भाव वाढत जाईल.

# देशहितासाठी मध्यस्थी

# १३

भारताच्या इतिहासातलं एकोणीसशे ऐंशीचं दशक 'अशांत पंजाब'चं दशक म्हणून ओळखलं जातं. देशाच्या सीमेवर सातत्याने लढणाऱ्या शीख समुदायामध्ये जन्मलेल्या काही अतिरेकी गटांमुळे आणि त्यांच्या स्वतंत्र राष्ट्राच्या 'खलिस्तान' मागणीमुळे सारा देश त्या काळात स्तंभित आणि अस्वस्थ झाला होता. खलिस्तानचे पुरस्कर्ते जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांच्या सशस्त्र समर्थकांनी अमृतसरच्या पवित्र सुवर्णमंदिराचा घेतलेला ताबा हा त्या अस्वस्थ काळाचा परमोच्च बिंदू होता. पवित्र सुवर्णमंदिरातून खलिस्तानवाद्यांना बाहेर काढण्यासाठी ३ ते ८ जून १९८४ दरम्यान लष्कराकडून 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' कारवाई केली गेली. त्या कारवाईनं परिस्थिती आणखी चिघळली. त्याची दुर्दैवी परिणती ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच सुरक्षारक्षकांकडून गोळ्या घालून हत्या झाली, हा इतिहास आपल्याला माहिती असेल.

इंदिराजींच्या हत्येनंतर शीख समाज आणि पंजाब एकीकडे तर संपूर्ण देश दुसरीकडे अशी भावनिक फाळणी झाली होती. फुटीरतावादी खलिस्तान चळवळीला पाकिस्तानमधून मोठ्या प्रमाणावर फूस होती. 'सरबत खालसा', 'खलिस्तान कमांडो फोर्स', 'बब्बर खालसा' या त्या चळवळीतील दहशतवादी गटांना पाकिस्तानच्या 'आयएसआय' या गुप्तचर संघटनेची पूर्ण मदत होती. हेरगिरीसह शस्त्रपुरवठा, व्यूहरचना आदींमध्ये आयएसआयचा छुपा सहभाग होता. शेजारी देशांकडून चिथावल्या गेलेल्या अशा देशविघातक, फुटीरतावादी चळवळींशी आपल्या यंत्रणा तोपर्यंत पुरेशा परिचित नव्हत्या.

इंदिराजींनंतर पंतप्रधान झालेल्या राजीव गांधी यांना पंजाबमधील अस्वस्थता सतत डाचत होती. पंजाबमधील अकाली दलाचे नेते आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये बोलणी व्हावीत, पंजाबमध्ये पुन्हा सर्वसाधारण जीवन आणि शांतता प्रस्थापित व्हावी, ही राजीव गांधी यांची इच्छा होती.

त्यासाठी ते विविध पर्यायांची चाचपणी करत होते. तेव्हाच्या समाजवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांना मध्यस्थी करण्यासाठी तयार करण्याचा मार्ग त्यांना त्यात सर्वात विश्वासार्ह वाटत होता. गृहखात्याचे तेव्हाचे सचिव राम प्रधान यांनीही गांधी यांना श्री. पवार यांच्याच नावाची शिफारस केली होती. अखेर राजीव गांधींनी श्री. पवार यांना तशी विनंती केली. राष्ट्रासमोरची एका मोठ्या समस्येची उकल करण्यात आपला हातभार लागत असेल, तर ते काम करायलाच हवं, या भावनेने श्री. पवार यांनीही मध्यस्थाची भूमिका स्वीकारली आणि लगेचच त्या दृष्टीने प्रयत्नही सुरू केले.

अकाली दलाचे प्रमुख नेते प्रकाशसिंग बादल, हरचरणसिंग लोंगोवाल आणि सुरजीतसिंग बर्नाला यांना त्यावेळी पंजाबपासून दूर मध्यप्रदेशात पंचमढीमध्ये डांबून ठेवलं होतं. या नेत्यांशी संवाद साधायचा असेल तर त्यांना आधी दिल्लीजवळ कुठेतरी हलवायला हवं, अशी सूचना श्री. पवार यांनी पहिल्याच बैठकीत केली. राजीव गांधींनी ती तत्काळ मान्यही केली. सर्व नेत्यांना दिल्लीतील तिहार तुरुंगामध्ये हलवण्यात आलं. श्री. पवार यांनी नंतर तुरुंगात जाऊन तिन्ही नेत्यांशी वारंवार बोलणी केली. त्यांना सरकारबरोबर चर्चेसाठी तयार केलं. त्यानंतर पंतप्रधान राजीव गांधी आणि या नेत्यांमध्ये गुप्त बैठक झाली. १९८५ मध्ये त्यांची तुरुंगातून सुटकाही झाली. २४ जुलै १९८५ रोजी राजीव गांधी आणि लोंगोवाल यांच्यात करार झाला. १८ कलमांचा तो करार आता 'राजीव-लोंगोवाल करार' म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. या करारानंतरच पंजाबमधील वातावरण निवळायला सुरुवात झाली. खलिस्तानची मागणी मागे पडली, ती कायमचीच!

प्रत्यक्ष करार पंतप्रधान राजीव गांधी आणि अकाली दलाचे नेते हरचरणसिंग लोंगोवाल यांच्यात झाला असला तरी त्या करारासाठी परिस्थिती श्री. पवार यांनीच तयार केली होती. देशाचं विभाजन करू पाहणाऱ्या या नेत्यांचं मन वळवून, त्यांना मायभूमीशी असलेलं आपलं नातं टिकवण्यासाठी तयार करण्याचं कौशल्य श्री. पवार यांनी दाखवलं होतं. देशासमोरच्या अत्यंत गुंतागुंतीच्या, जहाल फुटीरतावादी आंदोलनाला शमवण्यामध्ये आणि देशामध्ये शांतता प्रस्थापित करण्यामध्ये श्री. पवार यांनी बजावलेली ही भूमिका इतिहासामध्ये कायमची नोंदवली गेली आहे.

# शिक्षण | १४

आधुनिक शिक्षण आणि महिलांना समान संधी हे श्री. शरद पवार यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय. आपल्या दीर्घ संसदीय कारकिर्दीमध्ये त्यांना शिक्षणमंत्री म्हणून काम करण्याची संधी अगदी कमी काळ मिळाली. पण, मुख्यमंत्री म्हणून काम करताना त्यांनी राज्यात शिक्षणप्रसार आणि आधुनिक शिक्षणाच्या व्यवस्था या दोन गोष्टींसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. राज्यातील शिक्षण व्यवस्थेसाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी आणि उभ्या केलेल्या रचनेवर आजही अनेक योजना सुरू आहेत.

१९९१ मध्ये श्री. पवार यांनी राज्यात ग्राम शिक्षण समित्यांची स्थापना केली. तालुका पातळीवर या समित्यांमध्ये लोकप्रतिनिधी, पालक आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश असे. सदस्यांपैकी ५० टक्के सदस्य महिला असल्या पाहिजेत, अशी काळजी समित्यांच्या स्थापनेवेळीच घेतली गेली होती. शाळांवर देखरेख, व्यवस्थापनात सुधार, मुख्याध्यापकांच्या रजा व अन्य अडचणी याच समितीच्या अखत्यारित ठेवण्यात आल्या होत्या. शिक्षण हक्क कायद्याने त्यानंतर १० वर्षांनी, म्हणजे २०१० मध्ये शिक्षण व्यवस्थापन समित्या आल्या. महाराष्ट्रात तशी रचना आधीच झाली होती.

वर्धा आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे 'राष्ट्रीय साक्षरता मिशन' अंतर्गत १०० टक्के साक्षर करण्यासाठी प्रायोगिक पातळीवर त्यांच्याच काळात निवडले गेले होते. १९९२ मध्ये तत्कालिन शालेय शिक्षण मंत्री सलीम झकेरिया यांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'टास्क फोर्स'ची निर्मिती करण्यात आली. १४ नोव्हेंबर १९९४ रोजी या समितीच्या शिफारसी अंमलात आणण्यास सुरुवात झाली. प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी १० शाळांमागे एका केंद्र शाळेची आणि केंद्रप्रमुखाची नियुक्ती या शिफारशींनुसारच करण्यात आली. जिल्हा परिषद आणि नगरपालिका शाळांना इतर खर्चासाठी अत्यंत अपुरी तरतूद

असे. त्यात सुधारणा करताना शाळेतील शिक्षकांच्या एकूण वेतनाच्या ४० टक्क्यांएवढी रक्कम किरकोळ खर्चासाठी थेट उपलब्ध करून देण्यास त्यानंतर सुरुवात झाली. ग्रामशिक्षण समित्या प्रभावी ठराव्यात यासाठी तालुका पातळीवर आमदार आणि जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण सल्लागार समित्या गठित करण्यात आल्या होत्या.

माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान म्हणून १२ टक्के रक्कम दिली जात होती. पण, शाळांच्या गरजा वेगवेगळ्या असल्याने अनुदानाच्या समान वाटपाने शाळांवर अन्याय होत होता. तो दूर करण्यासाठी श्री. पवार यांच्याच काळात शाळांसाठी विकसनशीलतेचा निर्देशांक ठरवण्यात आला. शाळा कुठल्या विभागात आहेत, त्यातील मुली आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांचं प्रमाण, शाळेचं वय आणि विद्यार्थी संख्या या निकषांच्या आधारे वेतनेतर अनुदान निश्चित केलं जाऊ लागलं.

१९९४ च्या अखेरीला महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेची स्थापना झाली. जागतिक बँकेच्या सहकार्याने या परिषदेमार्फत जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम राबवला गेला. सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान याच संस्थेमार्फत चालवले गेले. १९८९ मध्ये श्री. पवार यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या जागतिक मराठी अकादमीवर मराठीचा शासन व्यवहारात आणि लोक व्यवहारात उपयोग वाढावा यासाठी सूचना करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. कवी वसंत बापट यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशींनुसार नंतर 'राज्य मराठी विकास संस्था' स्थापन केली गेली.

श्री. पवार यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातच १९९० आणि १९९५ असे दोनदा प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मोठे बदल केले गेले. १९७७-७८ मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कामध्ये मोठी वाढ करण्यात आली होती. विद्यार्थी आणि पालकांमध्ये त्यावरून मोठा असंतोष होता. मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर श्री. पवार यांनी ही फी वाढ रद्द केलीच पण ज्या विद्यार्थ्यांकडून वाढीव दराने शैक्षणिक शुल्क घेतले गेले होते त्यांचे वाढीव शुल्क पुढील हप्त्यात वळते करून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या होत्या. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी फी माफीच्या योजना अधिक व्यापक करण्यासाठी तसेच दुर्बल घटकांची छाननी करून त्यात वाढ करण्यासाठी त्यांनी अभ्यासगटही नियुक्त केले होते.

# ज्ञानगंगा घरोघरी | १५

शिक्षणाचं महत्त्व समाजाला समजू लागलं तसतसं ज्यांचं काही अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सुटलं किंवा राहून गेलं त्यांना आयुष्याच्या पुढच्या टप्प्यावर शिक्षणाची गरज भासू लागली. काहींना उच्च शिक्षणाच्या वयात वेगवेगळ्या अडचणींमुळे पूर्णवेळ शिकणं शक्य नसतं. अशांना आपल्या अन्य जबाबदाऱ्या पार पाडता पाडता शिकण्याच्या संधी आवश्यक असतात. अध्यापनाच्या वेळा, ठिकाण आणि अध्यापक या सगळ्याच बाबतीत अशा विद्यार्थ्यांना लवचिकता हवी असते. अशा विद्यार्थ्यांच्या सोयींसाठी महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठाची गरज होती. जगभर स्वीकारल्या गेलेल्या या संकल्पनेला अनुसरून १९८९मध्ये शरद पवार मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात नाशिकला 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठा'ची स्थापना झाली.

विरोधी पक्षनेते असताना, १९८५ मध्ये शरद पवार यांना मुक्त विद्यापीठाच्या संकल्पनेबद्दल शिक्षण तज्ज्ञांकडून माहिती मिळाली. त्यांनी त्याचवेळेला ही कल्पना उचलून धरली आणि तत्कालीन सरकारला त्याची अंमलबजावणी करण्याविषयी सुचवलं. पण, प्रकरण पुढे सरकलं नाही. १९८८ मध्ये श्री. पवार महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. आपण सुचवलेल्या संकल्पनेला प्रत्यक्ष साकार करण्याची संधी त्यांना मिळाली. महाराष्ट्रात ग्रामीण भागात वेगवेगळ्या व्यवसायात किंवा रोजगारांत असलेल्या तरुण, महिला व्यक्तींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुक्त विद्यापीठाचा आराखडा तयार करण्यात आला. इंग्लंडमध्ये १९६९ मध्ये स्थापन केल्या गेलेल्या जगातल्या पहिल्या मुक्त विद्यापीठाला प्रत्यक्ष भेट देऊन श्री. पवार यांनी संकल्पना मूळातून समजून घेतली. त्याआधारे आपल्याकडील परिस्थिती पाहून आवश्यक त्या सुधारणा करूनच या विद्यापीठाची कार्यप्रणाली आणि कार्यक्षेत्र नक्की करण्यात आलं. मुक्त विद्यापीठाच्या निर्मितीत ज्यांनी सुरुवातीपासून

योगदान दिलं होतं, त्या शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले यांचीच विद्यापीठाचे पहिले उपकुलगुरू म्हणून नियुक्ती केली गेली.

महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाच्या कायद्यान्वये अस्तित्वात आलेल्या या विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता आहे. या विद्यापीठाची पदवी देशातील इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष मानली जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही या विद्यापीठाला मान्यता दिली असून आयोगाच्या निरनिराळ्या स्पर्धापरीक्षांसाठी या विद्यापीठाचे पदवीधर पात्र असतात.

# खेळाच्या मैदानात

# १६

शरद पवार यांची लहानपणी मैदानाशी जुळलेली नाळ नंतरही कायम राहिली. देशी खेळांबरोबरच क्रिकेटसारख्या विदेशी खेळाचं आंतरराष्ट्रीय पातळीवरचं नेतृत्व त्यांनी केलं. कुशल क्रीडासंघटक म्हणून आज जगभर त्यांची ओळख आहे.

कबड्डी, खो-खो आणि कुस्ती हे शरद पवार यांचे लहानपणीचे आवडते खेळ. या खेळांतील कौशल्य त्यांनी लहानपणीच आत्मसात केलं होतं. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनातही त्यांनी या खेळांमध्ये वेळोवेळी भाग घेतला. महाविद्यालयीन जीवनात शारीरिक शिक्षण प्रशिक्षक म्हणूनही भूमिका बजावली. राज्याच्या ग्रामीण भागात खेळांचा प्रसार व्हावा आणि त्यातून उत्कृष्ट खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी खेळांची तालुकानिहाय शिबिरं आणि प्रशिक्षणकेंद्रं सुरू करण्यात त्यांनी घेतलेला पुढाकार क्रीडासंघटक आवर्जून सांगत असतात.

कबड्डी, खो-खो आणि कुस्ती या तीनही खेळांच्या राज्यपातळीवरील संघटनांचं अध्यक्षपद शरद पवार यांनी भूषवलं आहे. संबंधित खेळाडूंच्या सराव आणि खुराकासाठी आवश्यक त्या तरतुदीही त्यांनी सरकारमार्फत करुन घेतल्या आहेत. राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष असताना लाल मातीबरोबरच गादीवरील आधुनिक तंत्राच्या कुस्तीला त्यांनी सुरुवात केली आणि भारतीय कुस्तीवीरांसाठी आंतरराष्ट्रीय मैदान उपलब्ध करून दिलं. राज्यातील सर्वश्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेला त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. अखिल भारतीय खो-खो संघटनेचे अध्यक्ष असताना त्यांनी खो-खोच्या राज्य आणि देशपातळीवरील स्पर्धांचं आयोजन केलं. खो-खो खेळणाऱ्या खेळाडू आणि संघामध्ये एकी निर्माण करण्यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले. खो-खोच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या अथक परिश्रमांबद्दल कृतज्ञता म्हणून श्री. पवार यांचा वाढदिवस देशभर 'खो-खो दिन' म्हणून साजरा केला जातो. खो-खो मधील वेग नव्या पिढीला आणि आधुनिक काळाला जास्त पसंत पडणारा असल्याने

त्यांनी 'प्रो लिग कबड्डी' प्रमाणेच 'प्रो लिग खो-खो' सुरु करण्याचा विचारही केला.

कबड्डीच्या खेळाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९७६ ते १९८४ या काळात ते 'अमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया'चे राष्ट्रीय अध्यक्ष होते. देशात जिथे जिथे कबड्डीचे राष्ट्रीय सामने आयोजित केले जात, तिथे तिथे ते आपल्या राजकीय संबंधांचा उपयोग करुन स्थानिक संयोजकांना मदत मिळवून देत. कबड्डीला भारताबाहेर नेण्याची सुरुवात १९७० मध्ये झाली. त्यावर्षी 'एशियन कबड्डी असोसिएशन' स्थापन केली गेली. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका या आशियाई देशात त्यांनी कबड्डीचे प्रदर्शनीय सामने आयोजित केले. १९८१ मध्ये कबड्डी संघाने जपानचा दौरा केला. जपानमधील टोगॅनो या शहरात श्री. हायानो हे महापौर होते. त्यांच्या संपर्कातून दोन पुरुष आणि दोन महिलांचे संघ कबड्डी खेळण्यासाठी जपानला पहिल्यांदा गेले. आजच्या 'प्रो लिग कबड्डी'ची सुरुवात तिथून आहे. १९९० मध्ये बिजिंगमध्ये झालेल्या एशियाड स्पर्धांमध्ये कबड्डीचा समावेश केला गेला तो त्यांच्याच प्रयत्नांमुळे. या स्पर्धेत भारताला कबड्डीचं सुवर्णपदकही मिळालं होतं. पुरुषांबरोबरच महिलांच्या कबड्डीलाही त्यांनी प्रोत्साहन दिलं.

सन २००४ मध्ये मुंबईत पहिली विश्वचषक कबड्डी स्पर्धा आयोजित केली गेली. ही स्पर्धा आयोजित करणाऱ्या 'साऊथ कॅनरा स्पोर्टस् क्लब'चे श्री. पवार मुख्य आश्रयदाते होते. २००७ मध्ये पनवेलला दुसरी विश्वचषक कबड्डी स्पर्धा आयोजित केली गेली. या दोन्ही स्पर्धांसाठी येणाऱ्या खेळाडूंना श्री. पवार यांच्या प्रयत्नांमुळे विमानभाड्यात ५० टक्के सूट मिळाली होती. २००४ मध्ये श्री. पवार यांना आंतरराष्ट्रीय कबड्डी असोसिएशनचं अध्यक्ष होण्याची विनंती करण्यात आली. पण, त्याचवर्षी त्यांनी केंद्र सरकारमध्ये कृषिमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली होती. देशाला अन्नधान्याच्यादृष्टीने स्वयंपूर्ण करण्याचा त्यांचा निर्धार होता. त्यासाठी वेळ देणं आवश्यक होतं. त्यामुळे, त्यांनी कबड्डीचं आंतरराष्ट्रीय अध्यक्षपद नम्रपणे नाकारलं.

मल्लखांब हे महाराष्ट्राचं वैभव. मल्लखांबाला स्वतंत्र क्रीडाप्रकार म्हणून मान्यता नव्हती. ती मिळावी, यासाठी श्री. पवार यांनी मल्लखांब खेळाडूंची सतत पाठराखण केली आणि त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळेल असं पाहिलं. मल्लखांबपटूंसाठी पुणे विद्यापीठात त्यांनी विशेष

पारितोषिक सुरू करवून घेतलं. महाराष्ट्रात 'क्रीडा व युवककल्याण संचालनालया'ची स्थापना ते मुख्यमंत्री असतानाच झाली. या संचालनालयाच्या कार्यालयाचा विस्तार जिल्हापातळीपर्यंत करून त्यांनी राज्यात क्रीडाक्षेत्राच्या प्रचाराला मोठी मदत केली. क्रीडापटूंना पुरस्कार आणि शिष्यवृत्ती देण्याला त्यांच्याच काळात सुरुवात झाली. राष्ट्रीय पातळीवर अर्जुन किंवा द्रोणाचार्य पुरस्कार मिळालेल्या खेळाडूंचा राज्य सरकारकडून विशेष गौरव करण्याची आणि त्यांना आर्थिक पुरस्कार देण्याची सुरुवात त्यांनीच केली. खेळाडूंना आपल्या खेळावर लक्ष केंद्रीत करता यावं, त्यांची आर्थिक काळजी मिटावी, यासाठी देश किंवा राज्य पातळीवर चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्याचा निर्णय श्री. पवार यांनी मुख्यमंत्री असताना केला.

१९९३ साली पुण्यामध्ये राष्ट्रीय क्रीडास्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं. या स्पर्धांच्या निमित्ताने सुसज्ज क्रीडानगरी उभारण्याचं स्वप्न श्री. पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून पाहिलं आणि अवघ्या ११ महिन्यांत त्याची उभारणीही केली. पुण्याजवळ २७० एकरांवर बालेवाडी इथे हे क्रीडासंकुल उभं आहे. 'श्री शिवछत्रपती क्रीडानगरी' या नावाने उभी राहिलेली ही क्रीडानगरी महाराष्ट्रातील एकमेव क्रीडानगरी आहे. देशी व आंतरराष्ट्रीय खेळप्रकारांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या ३० खेळांच्या स्पर्धा एकाच ठिकाणी एकाच वेळी होऊ शकतील, अशा पद्धतीने सर्व सुविधा असलेल्या या क्रीडानगरीची उभारणी करण्यात आली आहे. ही क्रीडानगरी उभारली जात असताना मुख्यमंत्री असूनही दर आठवड्याला सर्वसंबंधितांची आढावा आणि नियोजन बैठक, तर दर पंधरा दिवसांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देण्याचा परिपाठ त्यांनी ठेवला होता. त्यामुळे अगदी कमी वेळेत आणि खेळ व खेळाडूंच्या सुविधांचा विचार करूनच ही क्रीडानगरी उभारली गेली.

# लोककलांचा चाहता

# १७

लोककला आणि लोककलावंत हेच संस्कृतीचे अस्सल वाहक असतात. लोककलांच्या माध्यमातूनच आपली परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. लोककला आणि लोककलावंतांच्या या योगदानाबद्दल शरद पवार यांच्या मनामध्ये अपार जिव्हाळा आहे. समाजाच्या उपेक्षित घटकातील हे कलाकार उपेक्षेचं जीणं जगत आपली कला जिवंत ठेवण्याचं मोलाचं काम करत असतात. त्यामुळे, जेव्हा संधी मिळाली तेव्हा शरद पवार यांनी त्यांच्या कलांना प्रोत्साहन दिलं, आर्थिक बळ दिलं, समाजाकडून त्यांना प्रतिष्ठा मिळेल अशापद्धतीनं व्यासपीठ उपलब्ध करून दिलं.

आपला इतिहास मुख्यतः शाहिरी परंपरेतून सांगितला जातो. समाजातील पुरुषार्थ जागवण्याचं काम करणाऱ्या या कलावंतांच्या अखिल भारतीय शाहीर परिषदेची स्थापना १९८९ मध्ये झाली. शाहीर साबळे आणि त्यांचे सहकारी मुख्यमंत्री शरद पवार यांच्याकडे ही कल्पना घेऊन गेले तेव्हा श्री. पवार यांनी त्यांच्या कल्पनेचं स्वागत तर केलंच, शिवाय या परिषदेला दरवर्षी अनुदान मिळेल अशी कायमची व्यवस्था करून दिली. शाहीर परिषदेची राज्यपातळीवरील मोठमोठी अधिवेशनं त्यामुळेच होऊ शकली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोलाचं योगदान असलेल्या शाहीर अमर शेख यांच्या नांवे 'शाहीर अमर शेख पुरस्कार' सुरू करण्याच्या कल्पनेला त्यांनी उचलून धरलं. हा पहिला पुरस्कार शाहीर साबळे यांनाच जाहीर झाला.

कलावंत ऐन उमेदीत असतात, त्यावेळी त्यांच्यावर प्रसिद्धीचा झोत असतो. समाज त्यांच्या कलेचा आनंद घेतो, त्याचं कौतुकही करतो. परंतु तोच कलावंत थकला, पडद्यामागे गेला की, समाजाला त्याचा विसर पडतो. अशा काळात कलावंताचं जीणं आर्थिक विवंचनांनी अवघड होऊन बसतं. श्री. पवार यांनी अखिल भारतीय शाहीर परिषदेकडे अशा कलावंतांसाठी काही करण्याचा प्रस्ताव ठेवला आणि कलावंतांना

वृद्धापकाळात मानधन सुरू झालं. सर्वच कलाकारांना सरसकट समान मानधन मिळालं असतं तर त्यातून नको ते वाद उभे राहण्याची भीती होती. परिषदेनं त्यासाठी कलाकारांची तीन वर्गांमध्ये विभागणी केली. 'अ' विभागातील कलावंताला मासिक २०० रुपये, 'ब' विभागातील कलाकाराला १५० रुपये आणि 'क' विभागातील कलाकाराला १०० रुपये मानधनाचा प्रस्ताव ठेवला गेला. पण, श्री. पवार यांनी त्यात स्वत:हून वाढ केली आणि ती रक्कम सुरुवातीलाच अनुक्रमे ७००, ६०० आणि ५०० अशी केली. पुरुष कलावंताला साठीनंतर तर स्त्री कलावंतांला वयाच्या पन्नाशीनंतर हे मानधन मिळेल, अशी तरतूद मूळ प्रस्तावात होती. ही वयोमर्यादा १० वर्षांनी कमी करावी अशी परिषदेची विनंती होती. त्यांनी तीही तत्काळ मंजूर केली. हे मानधन म्हणजे अनेक कलाकारांच्या जगण्याचा महत्त्वाचा आधार आहे.

अशा कलावंताचे कार्यक्रम स्वत:हून आयोजित करण्यातही श्री. पवार वेळोवेळी पुढाकार घेतात. मुंबई, पुणे, बारामतीमधील विविध संस्थांच्यावतीने ते जाणीवपूर्वक दर्जेदार कार्यक्रम आयोजित करतात आणि कलावंतांना मदत करतात. लावणीसाठी आयुष्य वेचलेल्या लक्ष्मीबाई कोल्हापूरकर यांना कर्करोगानं ग्रासलं, तेव्हा त्यांच्या उपचारांची आणि नंतरच्या देखभालीची आर्थिक व्यवस्था श्री. पवार यांनी केली. आपल्या लावणीच्या अदाकारीने अनेकांची वाहवा मिळवणाऱ्या विठा भाऊ नारायणगांवकरांसारख्या ज्येष्ठ लोकनाट्य कलावंतांना त्यांनी मदतीचा हात दिला.

पुण्यामध्ये भटके-विमुक्त समाज आणि लोककलाकारांच्या वतीने १९९४ मध्ये श्री. पवार यांना मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रपतीपदक प्राप्त तमाशा कलावंत यमुनाबाई वाईकर यांनी श्री. पवार यांचा गौरव करताना त्यावेळी आपलं आयुष्य त्यांना मिळावं, अशी इच्छा त्यामुळेच व्यक्त केली. ती सदिच्छा ऐकून शरद पवार हळवे झाले. 'आशीर्वाद कोणीही देतो. पण, स्वत:चं आयुष्य कोण कुणाला देतो?' असा प्रश्न विचारून 'मी आयुष्यभर तुमच्याबरोबर आणि तुमच्या लोककलेबरोबर राहीन', अशी ग्वाही त्यांनी दिली होती. आपला शब्द त्यांनी पाळला. आजही लोककलावंतांना, त्यांच्या संस्थांना श्री. पवार यांचाच मोठा आधार वाटतो.

ज्येष्ठ नृत्यविशारद कनक रेळे यांना त्यांच्या 'नालंदा नृत्य

महाविद्यालया'ला मुंबई विद्यापीठाशी संलग्न करायचं होतं. अनेक हितसंबंधितांनी त्यात अडचणी निर्माण करून ठेवल्या होत्या. कनक रेळे यांच्यासारख्या कलाकाराचं महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न झालं, तर सामान्य कुटुंबातील मुला-मुलींना शास्त्रीय नृत्याचं शिक्षण घेणं सोपं गेलं असतं. श्री. पवार यांनी ही बाब ओळखली आणि त्यांना मुंबई विद्यापीठाची संलग्नता मिळवून दिली. नालंदा महाविद्यालय हे आज मुंबईतील शास्त्रीय नृत्यकला शिकवणारं अग्रणी महाविद्यालय आहे.

आधुनिक होताना मातीशी, पर्यायानं संस्कृतीशी नाळ कायम ठेवून राज्यकारभार पाहणाऱ्या शरद पवार यांच्याबद्दल समाजातील सर्व स्तरांत आदरभाव आहे, तो त्यांच्या अशा आस्थेमुळेच!

# जाणकार साहित्य रसिक | १८

'साहित्यिक-कलावंतांमध्ये रमणारा राजकारणी' अशी शरद पवार यांची खरी ओळख आहे. साहित्यिक आणि कलावंत राजकारण्यांपासून नेहमी दूर असतात किंवा राजकारणी व्यक्तींना या क्षेत्रात गती नाही, असाच सर्वसाधारण समज असतो. पण, त्याला अपवाद आहेत शरद पवार. श्री. पवार यांचं वाचन, नाटक-सिनेमा-नृत्य-चित्रप्रदर्शनामधील त्यांची उपस्थिती हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. या क्षेत्रात नवं काही घडत असेल, नव्या कल्पना आकाराला येत असतील तर त्याला मदत करण्याची, त्यात सक्रिय सहभाग घेण्याची त्यांची नेहमीच तयारी असते. त्यामुळे या क्षेत्रातील अनेक संस्थांचं पालकत्व आणि नेतृत्व त्यांच्याकडे आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटन सत्राचे किंवा ते शक्य नसेल तर समारोप सत्राचे ते गेली अनेक वर्षं सन्माननीय पाहुणे आहेत. अखिल भारतीय नाट्यसंमेलनातही त्यांची उपस्थिती सातत्यानं असते. १९८९ मध्ये जागतिक मराठी परिषदेच्या स्थापनेमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. ज्येष्ठ पत्रकार दिवंगत माधव गडकरी, बी. के. देसाई, माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि प्रख्यात शल्यविशारद डॉ. रवी बापट हे जागतिक मराठी परिषदेचे संस्थापक-संयोजक होते. या परिषदेचं पहिलं अधिवेशन मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली झालं. दुसरं संमेलन मॉरिशिसला 'महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व' म्हणून गौरवल्या गेलेल्या पु. ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालं. आजही या परिषदेची जागतिक संमेलनं सुरू आहेत. २००२ मध्ये श्री. पवार यांनी भाषांतर संमेलन आयोजित करण्यासाठीही असाच पुढाकार घेतला होता. त्यातून 'केल्याने भाषांतर' हे नियतकालिक सुरु झालं. ते अव्याहत सुरु असून त्याला गरज पडेल तेव्हा शरद पवार यांची आजही मदत असते. मराठी कवितांचा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यासाठी 'मॉडर्न मराठी पोएट्री' हा प्रकल्प १९९१ मध्ये सुरु करण्यात आला होता. कवी भगवान ठग

यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या या उपक्रमाला त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत उपलब्ध दिली होती.

मराठीतील ज्या साहित्यिकांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळेल, त्या साहित्यिकाचा राज्य सरकारच्यावतीने एक लाख रुपये देऊन सन्मान करण्याचा प्रारंभ श्री. पवार यांनीच सुरू केला. प्रादेशिक आणि जिल्हा साहित्य संमेलनातील त्यांचा वावर, ठिकठिकाणच्या कवी संमेलनाला उपस्थित राहण्याची त्यांची आवड सर्वश्रुत आहे. त्यांच्या भाषणामध्ये नव्या कवींच्या कवितांचे संदर्भही सहजपणे येत असतात. कवी ना. धों. महानोर, लक्ष्मण माने यासारख्या साहित्यिकांचा राज्यपालांमार्फत विधानपरिषदेमध्ये प्रवेश श्री. पवार यांच्यामुळेच झाला. वेगळी मांडणी करणाऱ्या किंवा पुरोगामी विचार मांडणाऱ्या पुस्तकांवर बंदीची मागणी महाराष्ट्रात अनेकदा झाली. परंतु, अशा साहित्यकृतींच्या समर्थनार्थ त्यांनी नेहमीच ठाम भूमिका घेतली.

गोव्यातील विश्वचरित्र संशोधन केंद्राच्यावतीने 'मराठी विश्वचरित्र कोशा'ची निर्मिती आणि प्रकाशनाचा प्रकल्प आखण्यात आला होता. सन २००० मध्ये विश्वचरित्र कोशाचा पहिला खंड प्रकाशित झाला. दिवंगत पु.ल. देशपांडे आणि मे.पुं. रेगे या दोघांचंही या प्रकल्पाला सुरूवातीला मार्गदर्शन होतं. डॉ.रघुनाथ माशेलकर या शास्त्रज्ञाने त्यानंतर ही जबाबदारी घेतली. विश्वचरित्र कोशाला गोवा सरकारने मदत केली. पण, ती पुरेशी नव्हती. ही माहिती मिळाल्यानंतर श्री. पवार यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रकल्पाला भरीव आर्थिक सहाय्य केलं. 'ग्रंथाली' या प्रकाशन संस्थेने मराठीतल्या पहिल्या 'संकल्पना कोशां'चं प्रकाशन करायचं ठरवलं तेव्हा त्यांनाही श्री. पवार यांनी स्वतःहून 'पवार चॅरिटेबल ट्रस्ट'च्या माध्यमातून मदत उपलब्ध करून दिली.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन क्रांतिकारक विचारवंतांचं साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी महात्मा फुले स्मृतिशताब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी निमित्ताने त्यांचं समग्र साहित्य राज्य सरकारच्यावतीने पुन:प्रकाशित करण्याचा निर्णय मुख्यमंत्री म्हणून श्री. पवार यांनी घेतला. त्यासाठी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना त्यांनी केली.

# नाटक–सिनेमासाठी भूमिका | १९

मराठी माणूस ओळखला जातो तो त्याच्या नाट्यवेडापायी. आपल्या व्यस्त राजकीय दिनक्रमातून शरद पवार नाटक पाहाण्यासाठी आवर्जून वेळ काढत असत. त्यांची कलेची जाण मूळात उत्तम असल्याने आणि विविध कलांचा रसास्वाद घेण्याची आवड असल्याने सगळ्याच कलाप्रकारांचा आनंद ते घेत आले. त्यामुळे नाटक असो की चित्रकला, शास्त्रीय संगीत असो की नृत्यकला–या सर्वच क्षेत्रातील दिग्गज कलाकारांशी आणि त्यांच्या कलाकृतींशी त्यांचा अतिशय जवळून संबंध आला. कलाक्षेत्र आणि कलावंतांविषयी आस्था असलेल्या राजकारणी व्यक्ती या मूळातच दुर्मिळ असल्याने महाराष्ट्रातील संपूर्ण साहित्य–कलाक्षेत्र शरद पवार यांच्याकडे आपला 'हक्काचा माणूस' म्हणूनच पहातं. शरद पवारांनीही त्यांची ही अपेक्षा कधी चुकीची ठरू दिली नाही, हे त्यांचं मोठेपण. अभिरूचीपूर्ण आणि दर्जेदार कलाकृतींना आणि कलाकारांना त्यांनी गरज पडेल तेव्हा मदतीचा हात दिला, प्रोत्साहन दिलं.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद ही मराठी नाट्यक्षेत्राची प्रातिनिधीक संघटना. या संघटनेला श्री. पवार यांनी अनेक अडचणींतून सोडवलं. कोणताही कलाप्रकार जिवंत रहायचा असेल तर ती कला सादर करणाऱ्यांचं संघटन असायला हवं. दर्जेदार कलाकृती निर्माण व्हाव्या, असं वाटत असेल तर कलाकार आणि संघटना आर्थिकदृष्ट्या परावलंबी असता कामा नयेत, हा श्री. पवार यांचा सतत आग्रह राहिला. नाट्यपरिषदेला मुंबईत स्वत:ची जागा नव्हती. ती असणं अत्यंत आवश्यक होतं. त्यामुळे, मुख्यमंत्री असताना त्यांनी अखिल भारतीय नाट्यपरिषदेला नाट्यसंकुल उभारण्यासाठी १९९३ मध्ये जागा उपलब्ध करून दिली. त्यात अनेक अडथळे होते. ते सगळे दूर करण्यासाठीही त्यांनी परिषदेला मदत केली. नाट्यसंकुलाच्या उभारणीसाठी परिषदेला सरकारकडून ४ कोटी रूपयांचं अर्थसहाय्य मिळवून दिलं. आज 'यशवंत नाट्यगृह' त्यामुळेच उभं आहे.

'घाशीराम कोतवाल' या मराठी नाटकाने महाराष्ट्रात इतिहास

घडवला. विजय तेंडुलकर यांनी लिहिलेलं हे नाटक मराठी संस्कृतीविषयी, विशेषत: पेशव्यांच्या कारकिर्दीविषयी गैरसमज निर्माण करणारं आहे, असा आरोप करून या नाटकाच्या प्रयोगाला प्रचंड विरोध झाला. श्री. पवार यांनी मात्र हे नाटक सुरू राहिलं पाहिजे, अशी भूमिका घेतली. त्यासाठी ते स्वत: नाटकाच्या बाजूने उभे राहिले. नाटकाच्या परदेश दौऱ्याला झालेला विरोध मोडून काढून त्यांनी नाटकाचा विदेशातील दौराही यशस्वी केला. श्री. सतीश आळेकर यांनी त्यांच्या आठवणीमध्ये या संदर्भात श्री. पवार यांच्या योगदानाविषयी कृतज्ञतापूर्वक भरभरून लिहिलं आहे.

मराठी नाट्यसृष्टीला नवसंजीवनी देण्यासाठी शरद पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून मोलाची कामगिरी बजावली. १९८९ मध्ये त्यांनी मराठी चित्रपटासाठी करपरतीची योजना सुरू केली. विशिष्ट चक्रात अडकलेल्या मराठी सिनेमाला प्रेक्षकांचा प्रतिसाद कमी होऊ लागल्याने त्याकाळी सिनेमातली गुंतवणूकही रोडावली होती. अतिशय संपन्न आणि वैभवशाली परंपरा असलेला 'मराठी सिनेमा' अडचणीत सापडला होता. करपरतीच्या या योजनेने नवनिर्माते चित्रपटनिर्मितीसाठी नव्या उत्साहाने मराठी सिनेमासृष्टीत उतरले. आज दिसणाऱ्या मराठी सिनेमाच्या सशक्तपणाची बीजे त्या योजनेत आहेत.

नाटक-सिनेमा आणि एकूणच कलाप्रकारांविषयी श्री. पवार यांची भूमिका कायमच उदारपणाची राहिली आहे. 'सिंहासन' या पहिल्या गंभीर मराठी सिनेमाला त्यांनी केलेली मदत जगजाहीर आहे. या सिनेमाच्या चित्रणासाठी मंत्रालय आणि राज्याचं 'सह्याद्री' हे अतिथीगृह श्री. पवार यांच्या याच भूमिकेमुळे उपलब्ध झालं. प्रशासनाचा विरोध आणि परंपरा बाजूला ठेऊन त्यांनी तो निर्णय घेतला होता. 'फिल्म क्लब' तसंच 'फिल्म फेस्टिवल'च्या आयोजनामध्ये त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असतो. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांपासून ते प्रादेशिक कलाकारांना गौरवण्यापर्यंत ते वेळोवेळी पुढाकार घेतात.

नाटक आणि सिनेक्षेत्रातील बहुतेक सगळ्या कलाकारांचे श्री. पवार यांच्याशी अत्यंत घनिष्ट संबंध आहेत. कला आणि कलाकारांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपण्यासाठी त्यांनी वेळोवेळी घेतलेली अनुकूल भूमिका देशभरातील कलाकार नेहमीच नावाजत असतात.

# पालावर उजाडले... | २०

ज्याला राहायला जागा नाही, हाताला काम नाही, शिक्षणाच्या कुठल्याही संधी नाहीत, गावकुसात थारा नाही आणि धर्मात ज्यांची मोजदाद नाही, अशा भटक्या-विमुक्त समाजाचा तारणहार म्हणून शरद पवार यांचा आवर्जून सन्मान केला जातो. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ज्याला स्थान नाही, असा हा मोठा समाज वर्षानुवर्षे विकासाच्या प्रवाहापासून दूर भटकत राहिला. इंग्रज राजवटीने त्यांच्यावर गुन्हेगारी जमातीचा शिक्का मारला. स्वातंत्र्यानंतर हा शिक्का पुसण्याची घोषणा झाली; पण त्यांच्या आयुष्यात मात्र कुठलाच गुणात्मक फरक झाला नाही. या वर्गाला स्थिरता देण्याच्या दृष्टीने, त्यांना विकासाच्या-प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी शरद पवार यांनी सुरुवातीपासून सातत्याने प्रयत्न केले.

१९८८ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी पुण्याजवळ मुळा-मुठा नदीच्या काठावर भटक्या-विमुक्त जमातींना घर बांधण्यासाठी १४० एकर जमीन उपलब्ध करून दिली. त्यानंतर पुण्यालगतच्याच मुंढवे परिसरात आणि वारजे-माळवाडी परिसरात आदर्श गाव उभारण्यासाठी आणखी सात एकर जमीन मोफत दिली. रोजगाराची सोय होण्याच्या दृष्टीने तिथल्या प्रत्येक कुटुंबाला एक म्हैस, एक गाय, दोन शेळ्या आणि नारळाची दहा झाडं द्यायचा ऐतिहासिक निर्णय घेतला. भटक्या-विमुक्तांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करून त्यांना स्थिर करण्याच्या दृष्टीने टाकलेलं पाऊल त्या जमातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं ठरलं. भटक्याचं जीणं जगणाऱ्या या माणसांच्या नावावर कोणतीही स्थावर मालमत्ता नसल्याने त्यांची पत निर्माण करण्यासाठी या समाजाच्या पतसंस्था सुरू करण्याचे प्रयत्न श्री. पवार यांनी केले आणि त्यांना शासनाकडून आवश्यक ती मदतही केली. या वर्गामध्ये शिक्षणाचं प्रमाण वाढावं म्हणून त्यांच्यासाठी वसतिगृह आणि आश्रमशाळाही सुरू केल्या.

मंडल आयोगाने आपल्या शिफारशींमध्ये भटक्या-विमुक्त

जमातींसाठी चार टक्के आरक्षणाची तरतूद केली होती. श्री. पवार यांनी मात्र मंडल आयोगाची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी करताना त्यापलिकडे जाऊन या समाजासाठी चारऐवजी आठ टक्के आरक्षणाची तरतूद केली. या जाती-जमातींचा आदिवासींमध्ये समावेश होण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. मुख्यमंत्री असताना १९८९ मध्ये त्यांनी त्यासाठी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे तशी मागणीही केली होती. नंतरचे पंतप्रधान नरसिंहराव यांनाही त्यांनी त्यासाठी साकडे घातले होते. देशातील विविध पक्षांच्या शंभर खासदारांचा पाठिंबा त्यांनी या मागणीमागे उभा केला होता.

शरद पवार देशाचे संरक्षणमंत्री असताना भटक्या-विमुक्त जाती-जमातींच्या आरक्षणामध्ये महाराष्ट्रात धनगर आणि वंजारी या पुढारलेल्या जातींचा समावेश केला गेला. त्याविरुद्ध भटक्या-विमुक्त जाती-जमातींची गंभीर तक्रार होती. ती दूर करण्यासाठी भटक्या-विमुक्तांसाठी असलेल्या आरक्षणाच्या वाटपामध्ये चार श्रेणी करून संपूर्ण समजाला न्याय मिळवून देण्याचं काम श्री. पवार यांनीच केलं. १९७४ मध्ये श्री. पवार यांना सोलापूरच्या महापौरांच्या निवडीसाठी काँग्रेस पक्षातून निरीक्षक म्हणून पाठवलं होतं. तिथे त्यांनी भीमराव जाधव गुरुजी या भटक्या विमुक्त समाजातील कार्यकर्त्याचा आग्रह धरून त्यांची महापौरपदी निवड होईल, असं पाहिलं. त्या संपूर्ण समाजाला प्रतिष्ठा देण्याच्या दृष्टीने ही फार मोठी घटना ठरली.

शिक्षण हाच कोणत्याही समाजाच्या उद्धाराचा मूलमंत्र असतो. भटक्या-विमुक्त समाजाला त्यांच्या सध्याच्या स्थितीतून बाहेर काढायचं असेल, तर नवी पिढी शिकली पाहिजे म्हणून शिक्षणाचं शून्य टक्के प्रमाण असलेल्या या समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी श्री. पवार यांनी कोल्हापूर, सातारा, इस्लामपूर, देवाची आळंदी अशा विविध ठिकाणी शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी जाणीवपूर्वक मदत केली. या मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय त्यांनी सर्व आर्थिक भार उचलून बारामतीच्या 'विद्या प्रतिष्ठान'मध्ये केली. पालावर जगणाऱ्या या समाजाला वेशीच्या आत आणण्यासाठी आणि स्थिरस्थावर करण्यासाठी केलेले हे प्रयत्न त्यांचे राजकीय गुरू यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेला अनुसरून एकमेवाद्वितीय असेच आहेत.

# क्रांतिकारक फळबाग योजना | २१

लहरी हवामान, अनियमित पर्जन्यमान, सिंचनव्यवस्थेला असलेल्या मर्यादा आणि शेतीवर अवलंबून असलेली मोठी लोकसंख्या... हे गुंतागुंतीचं गणित कसं सोडवायचं याची चिंता देशातील कृषितज्ज्ञांना, धोरणकर्त्यांना आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांना अनेक वर्षं भेडसावत होती. वेगवेगळ्या पर्यायांचा प्रयोग करून झाला, पण हमखास उत्तर काही सापडत नव्हतं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी १९९० मध्ये घेतलेल्या फलोत्पादन कार्यक्रमामुळे मात्र या प्रश्नाला हमखास उत्तर मिळालं. महाराष्ट्रामध्ये भरभरून यश मिळालेला हा प्रयोग नंतर राष्ट्रीय पातळीवरही 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियान' म्हणून स्वीकारला गेला. शेतकऱ्यांच्या मनोभूमिकेत आमूलाग्र परिवर्तन करून फलोत्पादनाच्या क्षेत्रात राज्याला आणि देशालाही आघाडीवर नेणाऱ्या या कार्यक्रमाचं श्रेय पूर्णत: शरद पवार यांचंच आहे. कृषिशास्त्रज्ञ त्यांना 'हायटेक हॉर्टिकल्चरचे जनक' म्हणतात.

पारंपरिक शेतीतील समस्या माहित असल्याने त्या दूर करण्यासाठी शेतीक्षेत्राला नवी जोड देण्याच्या गरजेतून महाराष्ट्रात फलोत्पादन योजना जाहीर झाली. या योजनेच्या अंमलबजावणीत कल्पनेपासून पूर्णत्त्वापर्यंत स्वत: शरद पवार सहभागी झाल्याने ती मूळ आराखड्यानुसार अंमलात आली आणि क्रांतिकारक ठरली. १९९०च्या दशकात दरवर्षी सरासरी एक लाख हेक्टर क्षेत्र फळबाग लागवडीखाली आलं. महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकरी दलित-आदिवासींकडे असलेली लाखो हेक्टर नापीक, पडिक जमीन या योजनेमुळे लागवडीखाली आली. सुरुवातीला केवळ फळबाग लागवडीने सुरू झालेल्या या योजनेचा विस्तार पुढे उत्तम दर्जाचं फलोत्पादन, साठवणूक व्यवस्था, वाहतूकयंत्रणा, पणनव्यवस्थेपासून निर्यातीपर्यंत- असा सर्वांगाने झाला. समाजाच्या आहाराच्या सवयीतही लक्षणीय बदल झाला.

या फलोत्पादन योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याचे सहा विभाग केले गेले होते. त्यात कोकण विभागाला सर्वाधिक महत्त्व दिलं गेलं होतं.

शेतीची संधी कमी असलेल्या या विभागामध्ये फलोत्पादनाची प्रचंड क्षमता होती. तिचा योग्य वापर होण्याच्या दृष्टीनेच हे प्राधान्य दिलं गेलं. कोकणातलं महत्त्वाचं फळपीक म्हणून आपल्याला आंबा माहीत आहे, त्याबरोबरच काजू, नारळ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ आणि अननस या पिकांनाही योजनेतून महत्त्व दिलं गेलं. खानदेशात केळ्याबरोबरच मोसंबी आणि लिंबू महत्त्वाचं ठरलं. नागपुरात संत्री तर नाशिक, अहमदनगर, सोलापूर, पुणे, सातारा आणि सांगली या उत्तर-मध्य विभागात द्राक्ष, डाळिंब, बोर आणि मोसंबी या फळपिकांना प्रोत्साहन देण्याचं धोरण घेतलं गेलं. मराठवाड्यात आंबा, द्राक्ष आणि मोसंबी ही महत्त्वाची फळपिकं गृहीत धरली होती. पडित क्षेत्र फळबागांखाली आणणं, अस्तित्वात असलेल्या फळबागांचं पुनरुज्जीवन करणं, गावठी झाडांचं सुधारीत फळझाडांमध्ये रूपांतर करणं आदी उपायांचा या योजनेत समावेश होता. शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीची फळरोपं उपलब्ध व्हावीत म्हणून फळरोपवाटिकांना प्रोत्साहन मिळेल, अशी व्यवस्था योजनेतच करण्यात आली होती.

लहरी हवामान आणि अनियमित पर्जन्यमानाला पारंपारिक पिकांपेक्षा फळबागा चांगल्या प्रकारे तोंड देतात, टिकाव धरतात. पण, त्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक तुलनेने जास्त असते आणि परतावा मिळण्याचा कालावधीही अधिक असतो. सामान्य शेतकऱ्याला 'कसं परवडणार? त्यासाठी १९९०-९१ मध्येच ही योजना रोजगार हमी योजनेशी जोडण्यात आली. रोजगार हमी योजनेतून आतापर्यंत याउतकं अन्य कोणतंही उत्पादक काम आतापर्यंत झालेलं नाही. रोजगारहमी योजना थेट शेतकऱ्याच्या बांधावरच गेल्याने आणि सर्व शेतकऱ्यांना त्यात कमीअधिक सवलती-अनुदान देऊन सहभागी करून घेतल्याने फळबागेसाठी आवश्यक भांडवल गुंतवणुकीचा प्रश्न आपोआप सोपा झाला. आर्थिक-सामाजिकदृष्ट्या मागास शेतकरीही फळबाग लागवडीसाठी उत्साहाने पुढे आला. १९९०-९१ पासून १९९६-९७ पर्यंत वेगवेगळे टप्पे आखून त्या त्या टप्प्यावर शेतकऱ्याला गुणवत्तेनुसार मदत उपलब्ध करून देण्याचं कालबद्ध नियोजन झाल्याने या योजनेत बहुतेक शेतकरी यशस्वी झाले. कोरडवाहू, पडिक, नापीक जमिनीला जणू संजीवनी मिळाली. उपेक्षित शेतकरी मुख्य प्रवाहात आला. शेतीसाठी तोपर्यंत उदासीन असलेल्या कोकणासारख्या प्रदेशात नवचैतन्य पसरलं. जिथे जिथे शेतकऱ्यांनी ही

योजना मनापासून स्वीकारली, त्या भागातील शेतकऱ्यांची मानसिकताच बदलून गेली. आंतरराष्ट्रीय किर्तीचे कृषिशास्त्रज्ञ डॉ. एम.एस.स्वामीनाथन त्यामुळेच श्री. पवार यांचा गौरव 'फलोत्पादन क्रांतीचे जनक' असा करतात.

या योजनेमुळे महाराष्ट्र हे फलोत्पादनाच्या क्षेत्रात देशात पहिल्या क्रमांकाचं राज्य ठरलं. केंद्रात कृषीमंत्री झाल्यानंतर त्यांनी म्हणूनच 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियाना'ची आखणी केली. आंतरराष्ट्रीय दर्जाचं तंत्रज्ञान, संगोपनपद्धती आणि शास्त्र त्यामुळे आपल्या देशातही आलं, रुजलं. इथला शेतकरीही आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी उत्सुक झाला. देशातल्या शेतीक्षेत्रातली भाषाच या अभियानाने बदलली.

फलोत्पादन क्षेत्रातील या क्रांतीमुळे आपल्याला आता अगदी खेड्यातही फळं विक्रीला ठेवलेली दिसतात. देशात कुठल्याही कोपऱ्यात पिकणारी फळं संपूर्ण देशात खेड्यापाड्यापर्यंत उपलब्ध होतात. फळांच्या प्रकारानुसार आज त्या त्या फलोत्पादकांच्या स्वतंत्र आणि सक्षम संघटना उभ्या राहिलेल्या दिसतात त्या या अभियानामुळेच. निर्यातीसाठीचं कौशल्य या संघटनांनी आत्मसात केलं तेही या अभियानातून आणि देशातला प्रगत शेतकरी डॉलरची भाषा बोलू लागला, तेही यामुळेच!

# निघाली कोकणची रेल्वे... | २२

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळ या चार राज्यांच्या ७४१ किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीला रेल्वेने जोडणारा 'कोकण रेल्वे प्रकल्प' हा देशातील लक्षणीय पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक. कोकण रेल्वेची मागणी अगदी जुनी. श्री. अर्जुन बळवंत वालावलकर या रेल्वेतल्याच अभियंत्याने १९५२ मध्ये कोकण रेल्वेचा कच्चा आराखडा मांडणारी पुस्तिका प्रकाशित केली होती. त्यानंतर प्रसिद्ध संसदपटू बॅ. नाथ पै आणि मधु दंडवते यांनी संसदेत कोकण रेल्वेची मागणी लावून धरली. पण, या मार्गाच्या मडगाव ते रोहा या टप्प्याच्या रेल्वेमार्गाचं सर्वेक्षण सुरू व्हायलाच १९८५ साल उजाडालं.

मुळात हा मार्ग लांबलचक आणि दुर्गम. डोंगराळ भागातून जाणाऱ्या या मार्गाच्या उभारणीसाठी येणारा खर्चही मोठा होता. त्यामुळे, प्रकल्पाची सुरुवात होत नव्हती. कोकण रेल्वेसाठी आग्रह धरणारे दंडवते आणि जॉर्ज फर्नांडिस हे दोघेही नेते जनता पक्षाच्या सरकारमध्ये मंत्री झाले आणि 'कोकण रेल्वेला' खऱ्या अर्थाने गती मिळाली. शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनामध्ये कोकण रेल्वेसंदर्भात एका बैठकीचं आयोजन केलं गेलं. तत्कालीन रेल्वेमंत्री फर्नांडिस या बैठकीला उपस्थित होते. कोकण रेल्वेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या स्थितीत केंद्र सरकार नाही, हे फर्नांडिस यांनी बैठकीत सुरुवातीलाच सांगून टाकलं होतं. त्यामुळे श्री. पवार यांनीच एक पाऊल पुढे टाकलं. 'खर्चाचा काही भार आम्ही उचलू', अशी तयारी त्यांनी दाखवली. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळ या लाभार्थी राज्यांनी केंद्र सरकारसह खर्चाचा काही भार उचलावा, अशी श्री. पवार यांची सूचना होती. केंद्र सरकारचे ५१ टक्के, महाराष्ट्र सरकारचे २२ टक्के, कर्नाटक सरकारचे १५ टक्के, गोवा आणि केरळ या राज्यांचे प्रत्येकी ६ टक्के या प्रमाणात निधी उपलब्ध केला जावा, असा प्रस्ताव त्यानुसार तयार केला गेला.

चारही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली गेली, तेव्हा

केरळच्या मुख्यमंत्र्यांनी आपला आर्थिक वाटा उचलायला असमर्थता दर्शवली. बऱ्याच अडथळ्यानंतर मार्गावर येण्याची चिन्हं असलेली कोकण रेल्वे या एका कारणाने पुन्हा मागे पडू नये, म्हणून श्री. पवार यांनीच त्या बैठकीत केरळची जबाबदारी उचलण्याची तयारी दाखवली. केरळचा जेवढा वाटा असेल, तेवढी रक्कम महाराष्ट्र सरकार कर्जाऊ स्वरूपात उचलेल, असा प्रस्ताव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून श्री. पवार यांनी ठेवल्यानंतर केंद्र सरकारने या प्रकल्पासाठी आपला निधी उपलब्ध करून दिला. प्रत्यक्षात या प्रकल्पाचं काम तीन वर्षं उशिरा संपलं. त्याच्या प्रस्तावित खर्चामध्ये २२२ टक्क्यांनी वाढ झाली. पण, 'कोकण रेल्वे कॉर्पोरेशन'ने कर्जरोख्यांद्वारे निधी उभा केला आणि देशातील अत्यंत अवघड मानला जाणारा हा रेल्वे मार्ग पूर्ण झाला. मे १९९८ मध्ये या संपूर्ण मार्गावर प्रवाशांना घेऊन कोकण रेल्वे धावली.

या रेल्वेमार्गाने केवळ चार राज्यं जोडली आणि प्रवाशांची सोय झाली असं नव्हे; तर व्यापार आणि उद्योगाच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला भूप्रदेश या जलद आणि सुरक्षित वाहतूकीनं जोडला गेला. मुंबई आणि मंगलोर ही देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरची दोन महत्त्वाची बंदरं या रेल्वेमार्गानं जमिनीवरून जोडली गेली. रस्तेवाहतुकीच्या तुलनेत या दोन शहरातील अंतर १,१२७ किलोमीटरने; म्हणजे तब्बल २९ तासांनी कमी झालं. महाराष्ट्रात कोकणच्या विकासाला या रेल्वेमार्गाने चालना मिळाली. एका बाजूला कोकण रेल्वे आणि दुसऱ्या बाजूला फळबाग योजना – कोकणची मानसिकता बदलायला या दोन गोष्टी खऱ्या अर्थाने साहाय्यभूत ठरल्या.

# त्यांनी रचिला पाया, पण... | २३

प्रत्येक समाजसमूहाच्या मानसिकतेत काही वैशिष्ट्यं आढळत असतात. ही वैशिष्ट्यं त्या समाजाच्या परंपरांशी, विकासाच्या टप्प्याशी, भोवतालच्या पर्यावरणाशी जोडलेली असतात. मराठी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण मानसिकता, सांस्कृतिकता घडवण्यामध्ये संत परंपरेचा मोठा वाटा मानला जातो. संतांच्या शिकवणुकीचा आणि सामाजिक समतेच्या विचारांचा पगडा मराठी मनावर आजही कायम आहे. मराठी समाज आणि महाराष्ट्र त्यामुळेच देशात इतरांपेक्षा अधिक प्रागतिक, सहिष्णू आणि आध्यात्मिक म्हणून ओळखला जातो. मराठी समाजाला विविध जातींतून आलेल्या संतांची मोठी परंपरा आहे. हे संत वेगवगेळ्या सामाजिक पार्श्वभूमीतून आले असले तरी त्यांची सामाजिक शिकवण आणि उदारमतवादी दृष्टीकोन मात्र सारखाच आहे. गंमत म्हणजे, महाराष्ट्राला असलेल्या या समृद्ध परंपरेचा अभ्यास करण्याची सोय महाराष्ट्रातच नव्हती. मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी संतपीठाची घोषणा करून ही उणीव दूर केली.

संतांच्या शिकवणुकीचा आणि त्यांच्या भक्ती-अध्यात्म परंपरेचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये संतपीठाची स्थापना व्हावी, ही मागणी तशी जुनीच होती. संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक, विधानसभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्षतेखाली १९८० च्या सुमाराला सरकारला याबाबतच्या शिफारशी करण्यासाठी एका समितीची नियुक्ती केली गेली. डॉ. यु.म. पठाण, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. राम शेवाळकर, डॉ. दादामहाराज मनमाडकर, डॉ. सरोजिनी बाबर आदी मान्यवरांचा या समितीत समावेश होता. जगातील विविध धर्म आणि त्यांचं तत्त्वज्ञान, जगभरातील संतांचं जीवन आणि कार्य, महाराष्ट्रातील संतांचं तत्त्वज्ञान यांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी अशा संतपीठाची उभारणी व्हावी, अशी शिफारस या समितीने केली. डॉ. पठाण यांनी या शिफारशीचा पाठपुरावा केला. अखेर श्री ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी सोहळ्याच्या सांगतेनिमित्त

पैठणला आयोजित केलेल्या समारंभात बोलताना श्री. पवार यांनी 'संतपीठा'ची आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची घोषणा केली. पैठणला ज्ञानेश्वर उद्यानाशेजारची सुमारे १७ एकर जागाही त्यासाठी उपलब्ध करून दिली.

या विद्यापीठाची उद्दिष्ट आणि रचना इतर विद्यापीठांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. भक्तिसंप्रदाय, समाजमानसशास्त्र, इतिहास आणि परंपरा यांच्या अभ्यासासाठी प्रत्यक्षात येणारं हे शिक्षापीठ वारकरी संतपरंपरेचं दीक्षापीठ व्हावं, अशी कल्पना होती. प्रवचन, भजन, कीर्तन आदी प्रबोधनाच्या पारंपरिक माध्यमांचा अभ्यास आणि वारसा पुढे नेण्यासाठी आवश्यक कीर्तनकार, प्रवचनकार घडावेत हीही त्यामागील कल्पना होती. या संतपीठात प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च अशा श्रेणीनुसार शिक्षण दिलं जावं, पुस्तकी शिक्षणाच्या पलिकडे नैतिक मूल्यशिक्षणावर आणि समाजाभिमुखतेवर त्यात भर असावा, अशी योजना करण्यात आली होती. मात्र, दुर्दैवानं सर्व भौतिक सोयीसुविधा उभ्या राहूनही संतपीठ प्रत्यक्षात मात्र कार्यान्वित होऊ शकलं नाही. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर पसरलेल्या वारकरी संप्रदायाच्या या अभ्यासपीठासाठी श्री. पवार यांनी पुढाकार घेतला, आवश्यक ते सरकारी पाठबळही दिलं. पण, त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीनंतर प्रत्यक्षात काहीच घडलं नाही.

संतपीठाच्या उभारणीबरोबरच देहू, आळंदी आणि पंढरपूर या तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचा निर्णयही श्री. पवार यांनी घेतला होता. देहू, आळंदी आणि पंढरपूर या तिन्ही तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वारकरी आणि भाविक येत असतात. त्यांची दिंडी आणि तीर्थक्षेत्रीचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने विकासयोजना तयार करण्यात आली होती. सन १९९० मध्ये, पहिल्याच वर्षी त्यासाठी १ कोटी ७५ लाख रुपये उपलब्ध करून देण्यात आले होते. भुयारी गटारं, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, एस.टी. बसस्थानक, घाट बांधणी, पूरनियंत्रण, स्नानगृह-स्वच्छतागृह, अंतर्गत रस्ते आदी बाबींचा त्यात समावेश होता. देहू इथे सरकारने धर्मशाळा बांधावी; पण त्या धर्मशाळेचं व्यवस्थापन देहू ग्रामपंचायतीने करावं, असा निर्णयही श्री.पवार यांनी त्यावेळी घेतला होता.

# गाऊ त्यांची आरती... | २४

महाराष्ट्राची सामाजिक घडण 'शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांनी झाली, असं आपण म्हणतो. या तीनही युगपुरुषांनी आपापल्या काळामध्ये क्रांतीकारक विचार मांडले आणि प्रचंड सामाजिक विचारमंथन घडवून आणलं. महाराष्ट्राची आजची प्रागतिक, उदारमतवादी प्रतिमा या विचारवंतांमुळेच तयार झाली. देशापेक्षा महाराष्ट्र पुरोगामी मानला जातो, तो या तिघांच्या वैचारिक योगदानामुळेच. महाराष्ट्राच्या या तिन्ही महापुरुषांची प्रेरणा आता अन्य राज्यातील दलित, कष्टकरी समाज घेतो आहे. त्या त्या राज्यामध्येही त्यातून प्रागतिक बदल घडत आहेत.

महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांचंही विपुल लेखन उपलब्ध आहे. डॉ. आंबेडकर यांचं बरंचसं लिखाण इंग्रजीमध्ये; तर महात्मा फुले यांचं लिखाण अप्रकाशित राहिलं होतं. राजर्षि शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये अंमलात आणलेल्या क्रांतीकारक निर्णयांबाबतची माहिती उपलब्ध असली तरी तिचं संकलन झालेलं नव्हतं. त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार, त्यांचा सामाजिक दृष्टीकोन ग्रंथित होणं गरजेचं होतं. तिन्ही महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी या अडचणी दूर करण्याचं शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना ठरवलं. त्यासाठी समित्या स्थापन केल्या आणि संकलित साहित्य प्रकाशितही केलं.

पुरोगामी लोकशाही दलाच्या सरकारचे मुख्यमंत्री म्हणून काम करत असताना श्री. पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधन प्रकाशन समितीची स्थापना केली. १९९० मध्ये महात्मा फुले स्मृती शताब्दी आणि १९९१ मध्ये डॉ.आंबेडकर यांची जन्मशताब्दी साजरी केली गेली. या दोन्ही शताब्दी वर्षांच्या निमित्ताने दोघांचंही साहित्य संकलित स्वरुपात प्रकाशित करुन जनसामान्यांना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यासाठी शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समित्यांची स्थापनाही करण्यात आली. महात्मा फुले यांचं समग्र साहित्य सुरुवातीला

ग्रंथरुपात मराठीत एकत्रित प्रसिद्ध करण्यात आलं. त्यानंतर ते खंड स्वरुपात हिंदी आणि इंग्रजीतही प्रसिद्ध केलं गेलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे १५ खंड आतापर्यंत प्रकाशित झाले आहेत. बॅ. पी.जी. पाटील यांनी लिहिलेलं कर्मवीर भाऊराव पाटील यांचं चरित्र प्रकाशित करून ते जिज्ञासूंपर्यंत पोहोचवण्यातही श्री. पवार यांनीच पुढाकार घेतला होता.

राज्यात लोकशाही आघाडीचं सरकार असताना 'राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती' स्थापन करण्यात आली. या समितीने राजर्षि शाहू यांच्याविषयीच्या साहित्याचं संकलन केलं. ते प्रकाशितही केलं. त्याला वाचकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. या तिन्ही प्रकाशन प्रकल्पांच्या प्रकाशनांना आजही वाचकांकडून उदंड मागणी आहे.

# प्रादेशिक असमतोलावर उपाय

# २५

विकासाच्या असमतोलाचा प्रश्न संपूर्ण जगाला भेडसावतो आहे. आपल्या देशामध्ये तर तो फारच तीव्र आहे. महाराष्ट्रातही या मुद्यावरून अधूनमधून असंतोष खदखदत असतो. विदर्भाने 'स्वतंत्र विदर्भा'ची मागणी पूर्वीच केली आहे. मराठवाडा आणि कोकणातूनही हल्ली महाराष्ट्रातून स्वतंत्र होण्यासंदर्भात अधूनमधून क्षीण सूर निघत असतो. 'स्वतंत्र विदर्भा'च्या मागणीमागे विदर्भातील किती लोक आहेत, हा प्रश्न आजही खुद्द विदर्भातच विचारला जातो. त्या मागणीमध्ये गेली काही वर्षं सातत्य आहे, हे मात्र खरं.

महाराष्ट्राच्या स्थापनेपासूनच राज्यातील विकासाच्या प्रादेशिक असमतोलाच्या चर्चेला सुरुवात झाली आहे. १९८३ मध्ये ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक असमतोलाचा अभ्यांस करण्यासाठी सत्यशोधन समितीची स्थापना करण्यात आली. १९८४ मध्ये या समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला. तो सरकारनं पूर्ण स्वीकारला नाही, पण १९८५-८६ पासून महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विशेष तरतूद सुरू झाली. दांडेकर समितीचा अहवाल येऊन बराच काळ उलटून गेला म्हणून १९९२ मध्ये बी.ए. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील मागास भागाची निश्चिती करण्यासाठी राज्य नियोजन मंडळाने नव्या समितीची नियुक्ती केली. या समितीला १२ मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे मागासपण निश्चित करायला सांगण्यात आलं होतं. या समितीने एकूण १७ जिल्हे मागास ठरवले. त्यात मराठवाड्याच्या ६, विदर्भाच्या ८ आणि उर्वरित महाराष्ट्रातील ३ जिल्ह्यांचा समावेश होता. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये आम्हाला पुरेसा वाटा मिळत नाही, विकास योजनेमध्येही आमच्या वाट्याला न्याय येत नाही, अशी तक्रार विदर्भ आणि मराठवाडा अशा दोन्हीही विभागांतून सातत्याने होत राहिली. त्यामुळे, त्यावर उपाय म्हणून विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागासाठी

स्वतंत्र वैधानिक विकास मंडळं नेमण्याची कल्पना पुढे आली. १९९१ मध्ये मुख्यमंत्री शरद पवार यांनी वैधानिक विकास मंडळांची मागणी घेऊन दिल्लीचा दरवाजा ठोठावला. सुरुवातीला पंतप्रधान चंद्रशेखर यांच्याकडे आणि नंतर पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांच्याकडे श्री. पवार महाराष्ट्रातील खासदारांची सर्वपक्षीय शिष्टमंडळं घेऊन गेले होते.

वैधानिक विकास मंडळांमुळे महाराष्ट्राच्या भावनिक ऐक्याला तडा जाईल, तसंच या मंडळांमुळे लोकप्रतिनिधींच्या हक्कांवर राज्यपालांचं आक्रमण होईल, अशा दोन कारणांसाठी वैधानिक विकास मंडळांच्या स्थापनेला काही काळ विरोध झाला. परंतु प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी त्यापेक्षा विश्वासार्ह मार्ग त्यावेळी कोणाच्याच दृष्टीपथात नसल्याने, तसंच मागास भागातील राजकीय नेतृत्वाने मंडळांची मागणी लावून धरल्याने श्री. पवार यांनी वैधानिक विकास मंडळांच्या स्थापनेसाठी प्रयत्न केले.

सुरुवातीला विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्र अशी चार मंडळं स्थापन करण्याचा विचार होता. केंद्र सरकारकडे त्यादृष्टीने शिष्टाईही केली गेली. पण, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करायचं असेल तर त्यासाठी काही घटनात्मक दुरुस्त्या कराव्या लागल्या असत्या. त्या प्रक्रियेत बराच वेळ गेला असता. तो टाळण्यासाठी अखेर विदर्भ, मराठवाडा आणि कोकणासह उर्वरित महाराष्ट्र अशी तीन मंडळं स्थापन करण्याचा निर्णय श्री. पवार मुख्यमंत्री असतानाच घेतला गेला. ९ मार्च १९९४ रोजी राष्ट्रपतींच्या अध्यादेशाने राज्यघटनेतील कलम ३७१(२) अनुसार महाराष्ट्रात तीन वैधानिक विकास मंडळं अस्तित्वात आली. या मंडळांसाठी शासननियुक्त कार्यकारी मंडळ असलं तरी या मंडळांसाठी उपलब्ध झालेल्या निधीचा प्राधान्यक्रम ठरवण्याची जबाबदारी मा. राज्यपालांकडे देण्यात आली आहे.

वैधानिक विकास मंडळांच्या नियुक्तीनंतर मागास प्रदेशांवर अन्याय होत असल्याची तक्रार कमी झाली. तरीही मागास भागाचा अनुशेष काही क्षेत्रांत कायम राहात असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींकडून होत असतेच. दांडेकर समितीच्या अहवालापासून पुढील १० वर्षांतील बदलांचा अभ्यास करण्यासाठी १९९५ मध्ये राज्यपाल डॉ. पी.सी. अलेक्झांडर यांनी 'निर्देशांक आणि अनुशेष समिती' नियुक्त केली. १९९७ मध्ये केंद्र सरकारनेही इ.ए.एस. सर्मा यांच्या अध्यक्षतेखाली देशातील १०० सर्वाधिक

गरीब जिल्हे निश्चित करण्यासाठी समिती नेमली. त्या समितीने मराठवाड्यातील सर्व जिल्हे आणि गडचिरोली, बुलडाणा व यवतमाळ या विदर्भातील तीन जिल्ह्यांसह महाराष्ट्रातील ११ जिल्हे सर्वाधिक मागास ठरवले. २००९ मध्ये एम.एच. सूर्यनारायण यांनी प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांतील प्रदेशनिहाय आर्थिक स्थितीबाबतच्या शोधनिबंधात मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिक या चार जिल्ह्यांची आर्थिक स्थिती राज्यातील उर्वरित ३१ जिल्ह्यांच्या स्थितीसमान आहे, असा निष्कर्ष काढला आहे.

प्रादेशिक असमतोलाच्या समस्येवर आतापर्यंत वैधानिक विकास मंडळं हाच उपाय केला गेला आहे. हा असमतोल दूर व्हावा यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दरवर्षी प्रयत्न केले जात आहेत. बऱ्याच क्षेत्रांतला अनुशेष त्यामुळे संपत आला आहे.



❖ माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांच्यासमवेत श्री. शरद पवार




❖ पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमात श्री. शरद पवार



❖ पुसा येथील
कृषीसंशोधन परिषदेत
हिलरी क्लिंटन
यांच्यासह
केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार



❖ संत मदर तेरेसा
यांचा आशिर्वाद घेताना
श्री. शरद पवार



❖ गीत रामायणाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात गायक आणि संगीतकार सुधीर फडके यांच्याशी बोलताना श्री. शरद पवार. सोबत ज्येष्ठ गायक पंडित भीमसेन जोशी आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी



❖ अमेरिकेचे संरक्षण सचिव डिक चेनी यांच्यासमवेत वॉशिंग्टन डी. सी. येथे श्री. शरद पवार



❖ रायगड जिल्ह्यातल्या नागोठणे येथे महापुरामुळे नुकसान झालेल्या स्थितीची पाहणी करताना श्री. शरद पवार



❖ ''बॉम्बे'' हाय मध्ये झालेल्या नौदलाच्या सरावात सहभाग घेताना श्री. शरद पवार




❖ केंद्रीय कृषीमंत्री म्हणून
फूड अॅण्ड अॅग्रीकल्चरल ऑर्गनायझेशनच्या जिनिव्हा येथील वार्षिक परिषदेला संबोधित करताना श्री. शरद पवार




❖ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार




❖ हर्षभरित शेतकऱ्यांशी हस्तांदोलन करताना श्री. शरद पवार




❖ भारतीय कृषीसंशोधन संस्थेच्या स्थापनादिनी प्रमुख पाहुणे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्यासमवेत श्री. शरद पवार



❖ बैलगाडी हाकताना श्री. शरद पवार



❖ पंडित भीमसेन जोशी यांचा सन्मान करताना श्री. शरद पवार



❖ ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांच्यासवमेत श्री. शरद पवार




❖ भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि श्री. शरद पवार यांच्यात हास्यविनोद



❖ विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघाबरोबर श्री. शरद पवार

# जागतिकीकरणाचे वारे आधी राज्यात | २६

देशात आर्थिक उदारीकरणाच्या पर्वाला सुरुवात होण्यापूर्वी त्यासंबंधी जे विचारमंथन विविध पातळ्यांवर सुरू होतं त्यामध्ये आर्थिक उदारीकरणाचं स्वागत आणि जागतिकीकरण स्वीकारण्यातली अपरिहार्यता मांडणाऱ्या अगदी थोड्या नेत्यांमध्ये श्री. शरद पवार अग्रभागी होते. या पर्वाला ज्यांच्या काळात सुरुवात झाली, त्या दिवंगत पंतप्रधान नरसिंहराव यांनी आणि ज्यांच्यावर उदारीकरणाची प्रक्रिया यशस्वी करण्याची जबाबदारी होती, त्या तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनीही श्री.पवार यांच्या भूमिकेबद्दल आणि भविष्यवेधी दृष्टिकोनाबद्दल अनेकदा जाहीरपणे गौरवोद्‌गार काढले आहेत. श्री. पवार नव्या युगाचे केवळ समर्थक राहिले नाहीत तर त्यांनी आपल्यापरीने या धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवातही केली होती.

१९९० मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना श्री. पवार यांनी राज्याच्या विविध विकास योजनांमध्ये खाजगी गुंतवणुकीची मदत कशी घेता येईल याचा विचार सुरु केला होता. जनमानस तयार करण्याच्यादृष्टिने आपल्या प्रत्येक भाषणात ते सरकार आणि खाजगी गुंतवणुकदार यांच्यातील सहकार्यातून विकासाची प्रक्रिया कशी गतीमान करता येईल, याबाबत प्रबोधन करू लागले होते. देशामध्ये आर्थिक उदारीकरणाचं धोरण जेव्हा अधिकृतरित्या स्वीकारलं गेलं आणि त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली तेव्हा त्याचे फायदे महाराष्ट्र सर्वात आधी घेऊ शकला ते त्यामुळे. हे धोरण स्वीकारण्याची महाराष्ट्राची मानसिक तयारी श्री. पवार यांनी आधीच करुन घेतली होती.

१९९० मध्ये राज्यात विजेची टंचाई नव्हती. पण, मूळात विजेला मागणीच कमी असल्यामुळे टंचाई नाही, असं म्हटलं जात होतं. जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरणाच्या नव्या पर्वात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक होणार, उद्योगधंदे वाढणार, सेवाक्षेत्राचा विस्तार होणार, त्यावेळी त्या वाढत्या गरजेसाठी महाराष्ट्रामध्ये विजेची उपलब्धता

पुरेशी असली पाहिजे, यादृष्टीने श्री. पवार यांनी १९९० मध्येच तयारी सुरु केली होती. विज उत्पादनाला दीर्घकालीन नियोजन आणि मोठ्या भांडवल गुंतवणुकीची गरज असते. खाजगी गुंतवणुकदारांना हे क्षेत्र खुलं केलं तर महाराष्ट्रात अपेक्षित वीजनिर्मिती लवकर होईल, या विचारांनी त्यांनी त्याचकाळात यासंबंधी तयारी सुरु केली होती. मंत्रिमंडळामध्ये तसा निर्णयही केला होता. वीजनिर्मितीसाठी महाराष्ट्रात दोन मोठ्या प्रकल्पामध्ये १ हजार ९०० कोटी रुपयांची खाजगी गुंतवणूक प्रस्तावित केली होती. मुख्य सचिव के.बी. श्रीनिवासन् यांच्या नेतृत्त्वाखालील उच्चस्तरीय समितीने उरणजवळ वायुआधारीत वीजनिर्मितीसाठी आणि खापरखेडा येथे औष्णिक वीजनिर्मितीसाठी निविदाही काढायचं ठरलं होतं. राज्य वीज मंडळाने २५ मेगावॅट क्षमतेच्या आणखी सात वीजनिर्मिती प्रकल्पांचा आराखडा तयार केला होता. सहकारी साखर कारखान्यांना को-जनरेशनसाठी प्रोत्साहन देण्याचं धोरणही तेव्हाच घेण्यात आलं होतं.

चांगले रस्ते असल्याशिवाय विकासाच्या प्रक्रियेला गती येणार नाही, हे ओळखून राज्यामध्ये महामार्गांचं जाळं उभारावं लागेल, हेही श्री. पवार यांनी तेव्हाच ओळखलं होतं. खाजगी गुंतवणुकीच्या माध्यमातून 'द्रूतगती महामार्ग' (Express Highway) उभारण्याचा विचार त्यांनी बोलून दाखवला होता. मुंबई-पुणे राज्य महामार्गाची त्यावेळची क्षमता दिवसाला ३५ हजार वाहनांच्या वाहतुकीची होती. परंतु, १९९० मध्येच त्या महामार्गावर प्रतिदिन ६५ हजार वाहनांचा ताण पडत होता. केंद्र सरकारच्या परवानगीने या मार्गात सुधारणा करुन त्याला द्रूतगती महामार्ग बनवण्यासाठी खाजगी गुंतवणुकीतून विकास करण्याची योजनाही त्यांनी त्याचवेळी केली होती. प्रत्यक्षात त्यानंतर ५ वर्षांनी या मार्गाच्या उभारणीला सुरुवात झाली.

# एन्रॉन | २७

महाराष्ट्र हे देशात औद्योगिकदृष्ट्या सर्वात प्रगत राज्य. आता नागरीकरणाचा वेगही देशात सर्वाधिक महाराष्ट्राचाच आहे. वाढतं नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि बदलती आधुनिक जीवनशैली यामुळे राज्यातील विजेची मागणी दिवसेंदिवस वाढते आहे. शेतीत सिंचनाच्या नवनव्या सोयी आणि तंत्रज्ञान येते आहे. सिंचनाखालील क्षेत्रातही वाढ होत आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्र वीजेच्या वापरातही आघाडीवर आहे.

विकास कधी एका रात्रीत होत नाही. विकासाची एक प्रक्रिया असते. ती प्रक्रिया समजून घेऊन दूरदृष्टीनं योग्यवेळी काही निर्णय घ्यावे लागतात. विशेषत: पायाभूत सुविधांच्या संबंधातील निर्णय योग्यवेळी घेतले गेले नाहीत तर विकासाच्या प्रक्रियेला मोठी खीळ बसते. महाराष्ट्रामध्ये १९८८ ते ९० दरम्यान महाराष्ट्रामध्ये वीज पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे, असं मानलं जात होतं. खरं तर, त्यावेळी विजेच्या वितरणासाठी सक्षम जाळ्याचा अभाव होता. त्यामुळे, विजेचा वापरच मर्यादित होता. त्याचा परिणाम म्हणून वीज पुरेशी आहे असं मानलं जात होतं. राज्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर उद्योगामध्ये आणि सिंचनक्षेत्रामध्ये वाढ होणं आवश्यक असतं. या वाढीसाठी वीज, रस्ते, पाण्यासारख्या सुविधांची पुरेशी व्यवस्था असावी लागते. ही व्यवस्था नियोजनपूर्वक करावी लागते. तहान लागली की, विहीर खणायला सुरुवात करून तहान भागवता येत नाही. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी या सर्व बाबींचा आणि महाराष्ट्राच्या भविष्याचा विचार केला होता. त्यात विजेच्या संभाव्य मागणीचा विचार होता.

१९९० च्या दशकात एक मेगावॅट वीजनिर्मितीचा गुंतवणूकखर्च साधारण चार कोटी रुपये होता. ५०० मेगावॅट वीजनिर्मितीसाठी त्यानुसार दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक लागली असती. एवढी गुंतवणूक करण्याइतकी राज्याची परिस्थिती आर्थिकदृष्ट्या सक्षम नव्हती. त्यामुळे,

विकासाची गरज म्हणून वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी अन्य गुंतवणूक पर्यायांचा विचार करायचा, की राज्याची विकासाची गती रोखायची, असा प्रश्न होता. राज्याची विजेची भविष्यातील गरज भागवायची तर खाजगी गुंतवणुकीचा पर्याय उपलब्ध होता. त्यापूर्वी राज्यात हा पर्याय वापरलाही गेला होता. ब्रिटिशांनी टाटा वीज कंपनीला परवानगी दिली होती. बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय (आताची रिलायन्स एनर्जी) ही खाजगी कंपनी राज्यात कार्यरत होती. शिवाय, १९९८ मध्ये डहाणूला ऊर्जानिर्मितीच्या खाजगी प्रकल्पाला परवानगी देण्यात आली होती. खाजगी गुंवतणुकीच्या माध्यमातून राज्याची विजेची गरज भागवणं यापद्धतीने सहज शक्य होतं.

अमेरिकेतल्या एन्रॉन कंपनीनं राज्यात वीज क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्याची उत्सुकता दाखवली होती. वाढत्या पर्यावरण जागरुकतेचा विचार करता वीजनिर्मिती कोणत्या माध्यमातून करायची हा निर्णयही घ्यावा लागणार होता. कोळशापासून केल्या जाणाऱ्या वीजनिर्मितीतून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होतं, हे आता सर्वमान्य आहे. क्लीन एनर्जीच्या पर्यायांपैकी जलविद्युत प्रकल्पासाठी निसर्गाच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेची गरज असते. वायुआधारीत वीजनिर्मिती करण्यासाठी वायूची गरज असते. असा वायू (गॅस) अनेक देशांमध्ये स्वस्तात उपलब्ध असते. त्यावेळी ओमान आणि अन्य काही देशांनी एक रुपया युनिट या दराने गॅस पुरवण्याची तयारी दाखवली होती. महाराष्ट्राच्या मोठ्या समुद्रकिनाऱ्याचा विचार करता असा गॅस स्वस्तात आणून समुद्रकिनाऱ्यावर वीजनिर्मिती प्रकल्प उभा करणं शक्य होतं. श्री. पवार यांनी या सर्व बाबींचा साकल्याने विचार केला आणि संबंधित कंपन्यांबरोबर अत्यंत किफायती करार करून रत्नागिरी जिल्ह्यातील अंजनवेलला वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्याची तयारी केली. अमेरिकेतल्या 'जीई' आणि युरोपातील 'बॅक्टेल' या दोन कंपन्यांनी त्यासाठी दाभोळ वीज कंपनीमध्ये भागीदारीही केली होती.

पण, दुर्दैवाने राजकीय टीका सुरू झाली. 'परकीय कंपनी' म्हणून या कंपनीविरुद्ध राळ उठवण्यात आली. देशाची सुरक्षा धोक्यात येत असल्याचा अपप्रचार केला गेला. ज्यांनी हे आरोप केले, ते शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष १९९५ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात सत्तेवर आले. त्यांनी एन्रॉन प्रकल्पच रद्द केला. प्रकल्पात ज्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी भाग घेतला होता त्यांच्या दृष्टीने हा निर्णय म्हणजे जबरदस्त धक्का होता. अमेरिका आणि युरोपमधील सरकारांनी या निर्णयाची गंभीर

दखल घेतली. त्या देशातील अन्य कंपन्या भारतात गुंतवणूक करण्याबाबत साशंक झाल्या. भारतामध्ये, विशेषत: महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक करू उच्छिणाऱ्या कंपन्यांनी आपले निर्णय स्थगित केले. महाराष्ट्रातील परकीय गुंतवणुकीचा ओघ या एका निर्णयाने कमी झाला. औद्योगिक क्षेत्रातील निर्णय राजकीय कारणांसाठी बदलू लागले तर त्याचा किती विपरीत परिणाम होतो याचा धडा आर्थिक उदारीकरणाच्या युगात देशाला मिळाला.

एन्रॉन प्रकल्प अचानक रद्द केल्यामुळे संबंधित कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. तिथला निर्णय विरोधात गेला तर प्रचंड नुकसानभरपाई आणि दंडाला तोंड द्यावं लागेल हे लक्षात आल्यानंतर शिवसेना–भाजप युती सरकारनेच एन्रॉनचा करार पुन्हा अंमलात आणण्याचा निर्णय घेतला. तेरा दिवसांच्या वाजपेयी सरकारला त्यासाठी केंद्र सरकारची हमी देण्याचा निर्णय घ्यावा लागला. पण, मध्ये दीड वर्षाचा काळ गेल्याने वैतागलेल्या गॅस पुरवठा कंपन्यांनी आपला गॅसचा दर युनिटमागे ४–५ रुपयापर्यंत वाढवला. साहजिकच त्यातून निर्माण झालेल्या महागड्या वीजेची खरेदी करणं राज्यसरकारला परवडेनासं झालं. सरकारची अवघड स्थिती पाहून कंपनीने प्रकल्पच गुंडाळला.

महाराष्ट्राची विजेची गरज वाढत होती आणि 'एन्रॉन' निमित्ताने झालेली गुंतवणूक मात्र अडकून पडली होती. अशा परिस्थितीत २००४ मध्ये केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांचं सरकार स्थापन झाल्यानंतर केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'एन्रॉन'साठी समिती नियुक्त केली गेली. या समितीने केंद्राने एन्रॉन प्रकल्प खरेदी करावा, अशी शिफारस केली. ७० टक्के केंद्र सरकार आणि ३० टक्के महाराष्ट्र सरकारचा वाटा ठरवून 'रत्नागिरी पॉवर कंपनी' ही केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त मालकीची कंपनी स्थापन करण्यात आली. त्यातून सध्या वीजनिर्मितीचे प्रयत्न रडतखडत सुरू असले तरी मूळ प्रकल्पातून राज्याला जो लाभ मिळणार होता, त्याला मात्र महाराष्ट्र कायमचा मुकला. देशात विजेच्या निर्मितीच्या बाबतीत 'स्वयंपूर्ण राज्य' अशी महाराष्ट्राची नोंद आजही नाही. विकासाच्या निर्णयात राजकारण करण्याचा प्रयत्न केला तर किती नुकसान होतं याचं पुढच्या पिढ्यांसाठी हे उत्तम उदाहरण आहे.

# सुरक्षा आणि संरक्षण

# २८

आपल्या देशानं आतापर्यंत ३१ संरक्षणमंत्री पाहिले. त्यातील शरद पवार यांचा पावणेदोन वर्षांचा कालखंड तिन्ही सैन्यदलांच्या दृष्टीने संस्मरणीय आहे. २६ जून १९९१ रोजी पंतप्रधान नरसिंह राव यांनी देशासमोरील बिकट परिस्थितीचा विचार करून शरद पवार यांना केंद्र सरकारमध्ये जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली. त्यावेळी देशात अयोध्या प्रश्नानं, आसाममधील उल्फा चळवळीने चांगलाच पेट घेतला होता. शेजारच्या राष्ट्रांच्या कुरबुरींमध्येही वाढ होत होती. तरीही केंद्रामध्ये प्रथमच मंत्रिपदाची जबाबदारी घ्यायची, तर ती आपलं राजकीय प्रेरणास्थान असलेल्या दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या पावलावर पाऊल ठेवूनच घ्यायची, या विचारानं श्री. पवार यांनी संरक्षणमंत्रीपदाचा स्वीकार केला. संरक्षणमंत्रीपदाच्या माध्यमातून देशाच्या संरक्षणविषयक गरजांच्या पूर्ततेचा धडाका लावत असतानाच मुंबईत पेटलेल्या जातीय दंगली आटोक्यात आणण्यासाठी त्यांना पुन्हा महाराष्ट्रात येऊन मुख्यमंत्रीपद स्वीकारावं लागलं. त्यापूर्वी केवळ पावणेदोन वर्षांच्या कार्यकाळात शरद पवारांनी आपल्या क्षमतेची प्रचिती देशाला आली.

दिवंगत चव्हाण यांनी संरक्षणमंत्री म्हणून घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास केल्यानंतर श्री. पवार यांनी काळाची गरज ओळखून सेनादलाचं मनोबल वाढवण्यावर आणि आधुनिकीकरणावर भर देण्याचं ठरवलं. त्यावेळी भारताचा संरक्षणखर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या तीन टक्क्यांपेक्षाही कमी होता. भारतीय उपखंडात निर्माण होत असलेली अस्थिर परिस्थिती आणि पाकिस्तान व चीन यांचा वाढता संरक्षणखर्च विचारात घेऊन भारताच्या संरक्षणखर्चामध्ये मोठी वाढ करण्याची गरज होती. त्याबाबतचा निर्णय श्री. पवार यांनी घेतलाच, पण तो सरकारमधील सर्व घटकांना पटवूनही दिला. सैन्यासाठी लागणारी शस्त्रं आणि दारूगोळा तयार करणारे कारखाने पूर्ण क्षमतेने आणि पूर्णवेळ चालवण्याचा धोरणात्मक निर्णयही त्यांनी घेतला. त्यामुळे देशाला आवश्यक ती संरक्षणसामग्री उपलब्ध झाली, शिवाय जादा उत्पादनाच्या निर्यातीने

देशाला अब्जावधी रुपयांच्या परकीय चलनाचाही लाभ झाला.

सेवानिवृत्त होणाऱ्या सैन्यदलातील सैनिकांना त्याकाळी अपुरं निवृत्तवेतन मिळत असे. सेवेतील सैनिक आणि अधिकाऱ्यांना चौथा वेतन आयोग लागू झाल्याने पूर्वी निवृत्त झालेल्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या आणि नव्यानं निवृत्त होत असलेल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनात फार फरक राहिला नव्हता. श्री. पवार यांनी 'समान पद, समान निवृत्ती वेतन' हे सूत्र स्वीकारून सैन्यदलातील त्यावेळपर्यंतची नाराजी दूर केली. श्री. यांनी सैन्यदलामध्ये महिलांना अकरा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. महिलांना तोपर्यंत सैन्यदलात प्रवेशच नव्हता. त्यांच्या क्षमतेविषयी शंका घेतल्या जात असत. स्त्रियांमधील क्षमतेवर पूर्ण विश्वास असणाऱ्या श्री. पवार यांनी सैन्यदलातील पारंपरिक मानसिकता मोडून सैन्यदलाची दारं महिलांसाठी खुली करून दिली. आज तीनही सैन्यदलांमध्ये आपल्याला महिलांच्या तुकड्या दिसताहेत, त्या त्यांच्यामुळेच.

संरक्षणखर्चात भरघोस वाढ करताना संरक्षणावरील अनाठायी खर्च वाचवण्याची भूमिकाही त्यांनी घेतली होती. भारत आणि चीन यांच्यातील उत्तर सीमेवर दोन्ही बाजूंनी सैन्याच्या कायमस्वरूपी तुकड्या तैनात होत्या. चीनच्या बाजूने पठार तर आपल्या बाजूने मात्र हिमालयाच्या उंचीवर ही सीमा असल्याने आपल्या सैन्याला हिमालयाच्या उंचीवरील बिकट परिस्थितीत पहारा ठेवावा लागे. या सैन्यासाठी आवश्यक गोष्टी हिमालयाच्या पायथ्यापासून वर पुरवणाऱ्यावर अफाट खर्च होत असे. चीनशी मित्रत्वाची बोलणी करून दोन्ही देशांनी दोन्ही बाजूंनी आपापले सैन्य मागे घ्यावं, असा करार संरक्षणमंत्री शरद पवार यांनी पुढाकार घेऊन घडवून आणला.

रशियाचं विघटन झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका वरचढ होणार, हे उघड होतं. आपली जास्तकरून मैत्री रशियाशी होती. त्या धोरणात बदल करण्याची गरज होती. श्री. पवार यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करून अमेरिकन नौदलाबरोबर भारतीय नौदलाच्या सामूहिक कवायती आयोजित करण्याचा धाडसी निर्णय घेतला. भारतीय भूदलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची अमेरिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चासत्रं आयोजित केली. संरक्षणमंत्री या नात्याने श्री. पवार या चर्चासत्रांना पूर्णवेळ हजर राहत. त्याचा परिणाम भारतीय सैन्यातील अधिकाऱ्यांच्या गांभीर्यावर होत असे.

अभ्यासाची नवी क्षेत्रं, बदलत्या काळातील नवे विषय आणि नवे भूप्रदेश पादाक्रांत करण्याची शरद पवार यांना मुळातून आवड आहे. त्यामुळे संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी चीन आणि पाकिस्तान यांच्या सीमेवरील सियाचेन या अत्यंत दुर्गम भागाला भेट देऊन तिथल्या सैनिकांशी चर्चा केली. शून्याच्या खाली दहा ते वीस अंश तापमान आणि समुद्रसपाटीपासून बावीस हजार फूट उंचीवर असलेल्या त्या प्रदेशात प्रत्यक्ष जाणाऱ्या मोजक्या संरक्षणमंत्र्यांपैकी ते एक होते.

त्याकाळी आसाममध्ये उल्फा या अतिरेकी संघटनेच्या देशविरोधी कारवाया वाढल्या होत्या. त्यांना पायबंद घालणं आवश्यक होतं. 'उल्फा'नं अनेक अधिकारी आणि नागरिकांचं अपहरण करून त्यांना ओलीस ठेवलं होतं. श्री. पवार यांच्या नेतृत्वाखालील सैन्यदलानं तिथे कारवाई करून सर्व ओलिसांची सुटका केली. अतिरेक्यांकडून सर्व दारूगोळा आणि शस्त्रसाठे जप्त करून त्यांचं कंबरडे मोडलं. 'उल्फा'ने त्यामुळे अगतिक होऊन आपली चळवळ मागे घेतली आणि केंद्र सरकारशी वाटाघाटी सुरू केल्या. आज काश्मिरमध्ये दिसणारी परिस्थिती त्यावेळीही होती. पण, लष्कराला योग्य आणि स्पष्ट धोरणात्मक सूचना असल्याने लष्कराने तिथल्या अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी अत्यंत संवेदनशीलपणे हाताळली. त्या काळात त्यामुळेच काश्मिरमध्ये अतिरेक्यांच्या कारवायांना बहुतांश आळा बसला होता. तिथल्या स्थानिक रहिवाशांच्या लष्कराबाबत तक्रारी नव्हत्या.

# दोन हात भूकंपाशी... | २९

दहा दिवस पाहुणा म्हणून आलेल्या गणरायाचं विसर्जन करून महाराष्ट्रातली भक्त मंडळी मध्यरात्रीनंतर झोपेच्या स्वाधीन होत असतानाच ३० सप्टेंबर १९९३ रोजी पहाटे भूमंडळ हादरलं. 'न भूतो' असा निसर्गाचा प्रकोप झाला. लातूर जिल्ह्यातील किल्लारी गावाजवळ केंद्रबिंदू असलेल्या भूकंपाने त्या भागात होत्याचं नव्हतं केलं.

मुख्यमंत्री शरद पवार यांच्याकडे त्यावेळी गृहखात्याचाही कारभार होता. विसर्जन मिरवणुका शांततेनं पार पडताहेत ना, कुठे काही गडबड-गोंधळ तर नाही ना, याची माहिती घेत ते जागेच होते. बहुतेक सगळ्या मिरवणुका सुरळीतपणे संपत आल्याचा निरोप आला तेव्हा ते झोपायला गेले. पहाटेचे साडेतीन वाजले होते. डोळा लागतो न लागतो तोच त्यांचा पलंग हादरला. खिडक्यांची तावदानं थडथडू लागली. नक्कीच भूकंप! चौकशी केली, तेव्हा भूकंपाचं केंद्र लातूर असल्याचं त्यांना सांगण्यात आलं. लातूरला फोन लावायचा प्रयत्न केला, पण प्रशासनातल्या जिल्हा प्रमुखांपैकी कोणाचाच फोन लागेना. काहीतरी अघटित घडल्याचा संशय त्यांना तिथेच आला. लातूरला फोन लावण्याचा आणखी प्रयत्न करण्याऐवजी त्यांनी मुंबईतल्याच आपल्या सगळ्या स्वीय साहाय्यकांना आणि सचिवांना उठवलं. सकाळी ७ वाजता विमान तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या. बरोबर ७ वाजून ४० मिनिटांनी ते लातूरला पोहोचले. तिथून गाडीनं थेट किल्लारी. गावंच्या गावं झोपेतच गाडली गेली होती. निसर्गाने अंधारात कशाकशाचा घास घेतला, ते सूर्योदयानंतर नुकतंच कुठे दिसू लागलं होतं. कल्पनेपलिकडचं, महाभयंकर चित्र होतं ते.

महाराष्ट्राने यापूर्वी कधीही न बघितलेल्या निसर्गाच्या कोपाला तोंड द्यायचं होतं. मुख्यमंत्री शरद पवार यांनी त्या क्षणापासूनच कामाला सुरुवात केली. प्रसंगावधान आणि तत्काळ निर्णय घेण्याची क्षमता पुरेपूर असल्याने ३० सप्टेंबर १९९३ च्या सकाळी साडेआठ वाजल्यापासूनच मदत आणि पुनर्वसनकार्याला जी गती मिळाली, ती त्यानंतर कित्येक महिने कायम

होती. ९ हजार ७७४ जण मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. १५ हजार ५६५ जण जखमी तर ३० हजार घरं पूर्णपणे जमीनदोस्त झाली होती. ११ हजार १४० घरांची पडझड झाली होती. हजारो गुरंढोरं मृत्युमुखी पडली होती. सगळी सरकारी कार्यालयं उद्ध्वस्त झाली होती. त्यात मुसळधार पाऊस. या पावसाने अडथळ्यांमध्ये आणखी भर पडली होती.

श्री. पवार स्वत: तिथे तळ ठोकून बसले. सुमारे तीन महिने त्यांनी आपलं कार्यालय सोलापूरच्या सर्किट हाऊसमध्येच हलवलं होतं. तिथून ते दररोज लातूर–उस्मानाबादच्या भूकंपग्रस्त परिसरात जात होते. कामाची वाटणी आणि विभागणी काटेकोरपणे केली होती. युरोप खंडातलं डॉक्टरांचं पथक जेव्हा या भूकंपग्रस्त भागात येऊन काम करू लागलं, तेव्हा त्यांचे प्रवक्ते श्री. हॅन्स ज्यूसन आपला अनुभव सांगताना म्हणाले, 'आम्ही जिथे जातो, तिथे अचानक आलेल्या आपत्तीने अत्यंत गोंधळाची परिस्थिती असते. नियोजनाचा अभाव असतो. सर्वत्र रोगराई पसरलेली असते. पण, इथे मात्र तशी परिस्थिती नव्हती. याचं सर्व श्रेय महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री शरद पवार यांचंच आहे.'

पूर्वानुभव किंवा मदत–पुनर्वसन कामाचं कोणतंही औपचारिक प्रशिक्षण नसूनही श्री. पवार यांनी या काळात केलेल्या कामामुळे त्यांना या क्षेत्रातले तज्ज्ञ म्हणून मान्यताच मिळाली. केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार असताना २००१ मध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी श्री. पवार हे विरोधी पक्षात असूनही त्यांना राष्ट्रीय आपत्ती निवारण समितीचं उपाध्यक्षपद स्वीकारण्याची गळ घातली. पुढे गुजरातसह देशात अनेक ठिकाणी आलेल्या आपत्तीवेळी या समितीनं दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि उभ्या केलेल्या यंत्रणांमुळे मदतकार्य सुकर झालं. आज आपत्तीव्यवस्थापन हा सर्वच पातळ्यांवर महत्त्वाचा आणि जागरुकतेचा विषय झाला आहे, तो त्यामुळे.

# अकराऐवजी बारा! ३०

**बा**बरी मशीद उद्ध्वस्त झाल्यानंतर देशभर उसळलेल्या दंगलींविषयी तुम्हाला माहिती असेलच. त्यावेळी मुंबईतही बराच काळ दंगल सुरू होती. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे इथलं जनजीवन विस्कळीत झालं की, त्याचे पडसाद जगभर उमटतात. देशाच्या प्रतिमेच्या दृष्टीनं ती काही चांगली गोष्ट नसते. त्यामुळे, मुंबईत घडणारी कोणतीही दुर्घटना कमीत कमी दुष्परिणाम करणारी राहावी, या दृष्टीनेच केंद्रीय सत्ताधारीही प्रयत्न करत असतात. मुंबईतली दंगल लवकर आटोक्यात येत नाही हे लक्षात आल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव यांनी ज्येष्ठ मंत्र्यांची दिल्लीत बैठक बोलावली. बराच विचारविनिमय झाल्यानंतर श्री. शरद पवार यांनी महाराष्ट्रात जाऊन मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी घेतली आणि काही उपाययोजना केल्या तरच मुंबईतली दंगल आटोक्यात येईल, असं सगळ्यांचं मत पडलं. प्रश्न देशाच्या प्रतिमेचा होता. त्यामुळे, श्री. शरद पवार यांनी ते मत स्वीकारलं. केंद्रीय मंत्रीपद सोडून ते पुन्हा महाराष्ट्रात आले, मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली. कायदा-सुव्यवस्थेच्यादृष्टीने आढावा घेऊन झटपट आवश्यक ते निर्णय घ्यायला सुरुवात केली. पण, दंगलीसारख्या गोष्टी केवळ प्रशासकीय निर्णयांनी आटोक्यात येत नाहीत. सामाजिक संवादासाठी नेतृत्वाने प्रत्यक्ष प्रयत्न करण्याची गरज असते. हे ओळखून शरद पवार यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्या दिवसापासून वेगवेगळ्या वस्त्यांना भेटी देणं आणि तिथे बैठका घेण्याचा धडक कार्यक्रम सुरू केला. त्याला चांगलं यशही येऊ लागलं.

त्याच काळात एके दिवशी सकाळी मंत्रालयात सहाव्या मजल्यावर मुख्यमंत्र्यांच्या दालनात बसून काम करत असताना दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्यांना अचानक स्फोटाचा मोठा आवाज ऐकू आला. आवाज इतका दणदणीत होता की, त्याने खिडक्यांच्या काचा तडकल्या. काय घडलं, हे बघण्यासाठी त्यांनी खिडकीबाहेर डोकावून पाहिलं तेव्हा कोपऱ्यावरच्या 'एअर इंडिया बिल्डिंग'खालून लोकांची पळापळ सुरू होती.

काय घडलं असावं याचा अंदाज घेत असतानाच तसेच आणखीही आवाज ऐकू आले. पोलिसांच्या वायरलेसवरून माहिती घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा मुंबईत ठिकठिकाणी बॉम्बस्फोट झाल्याची माहिती येत होती. एकूण ११ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले होते. सगळी वर्दळीची ठिकाणं होती. व्यापारी भाग, बँका आणि महत्त्वाच्या कार्यालयांच्या परिसरात बॉम्बस्फोट झाले होते. बॉम्बस्फोटामागचा उद्देश हिंदू-मुस्लिमांमध्ये तणाव निर्माण करण्याचा स्पष्टपणे दिसत होता. बॉम्बस्फोट इतके शक्तिशाली होते की, त्यामागे पूर्वनियोजन असणार हे उघड दिसत होतं. असे बॉम्ब बनवण्यासाठी फार मोठ्या तयारीची गरज असते. दहशतवादी संघटना आणि त्यांचे हस्तक गट शेजारच्या कोणत्यातरी देशातून मदत मिळाल्याशिवाय हे करणं शक्य नव्हतं.

दहशतवादी गटाने बॉम्बस्फोटासाठी निवडलेला दिवस शुक्रवारचा होता. तारीख १२ मार्च १९९३. वेळ दुपारची. बॉम्बस्फोटामागचा उद्देश सफल होऊ नये यासाठी तातडीनं हालचाली करण्याची गरज होती. राज्याचा प्रमुख म्हणून श्री. पवार यांनी तातडीने टी.व्ही. आणि रेडिओवरून लोकांना विश्वासात घेण्याचा, त्यांना शांततेचं आवाहन करण्याचा निर्णय घेतला. हे आवाहन करताना त्यांनी प्रसंगावधान राखून, बॉम्बस्फोट जिथे झाले, त्या ठिकाणांची माहिती देताना मशिद बंदरलाही बॉम्बस्फोट झाल्याचं सांगून टाकलं. त्यामुळे, हिंदू आणि मुस्लिम यांची घरं असलेल्या सर्वच ठिकाणी बॉम्बस्फोट झाले आहेत, कुठल्या एकाच धर्माच्या वस्तीमध्ये नाहीत, असा संदेश गेला. गैरसमज पसरवणाऱ्यांना त्यामुळे काहीसा पायबंद बसला. परिस्थिती आणखी चिघळली नाही.

बॉम्बस्फोटाचा हेतू साध्य होऊ द्यायचा नसेल तर दोन गोष्टी करणं आवश्यक होतं. समाजामध्ये शांतता कायम राहणं आणि मुंबईचं जनजीवन शक्य तितक्या लवकर सुरळीत होणं. श्री. पवार यांनी दोन दिवस केलेल्या अथक प्रयत्नांती या दोन्ही गोष्टी साध्य झाल्या. पुढे दंगलीची चौकशी करायला नेमलेल्या श्रीकृष्ण आयोगाकडून श्री. पवार यांना बोलावलं गेलं आणि '११ ऐवजी १२ बॉम्बस्फोट झाले असं का सांगितलं,' अशी विचारणा केली गेली. श्री. पवार यांनी त्याक्षणी केलेल्या त्या युक्तीमागील आपली भावना आणि सद्‌हेतू सांगितला तेव्हा आयोगाचं समाधान तर झालंच, उलट, आयोगाने या प्रसंगावधानाचं कौतुक केलं! समयसूचकतेनं केलेल्या एका छोट्याशा गोष्टीमुळे मुंबईला पुन्हा एका वणव्यापासून वाचवलं.

# स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा ३१

शरद पवार यांच्या व्यक्तिमत्त्वावर दोन महिलांचा मोठा प्रभाव आहे. त्यांच्या मातोश्री शारदाबाई पवार आणि दुसऱ्या, ब्रिटनच्या माजी पंतप्रधान मार्गारेट थॅचर. पैकी आई त्यांचं दैवत. संधी मिळाली तर महिला परिस्थिती अधिक समर्थपणे हाताळतात आणि कर्तृत्व गाजवतात, यावर शरद पवार यांचा गाढ विश्वास आहे. ज्या ज्या देशांनी महिलांना बंधनात ठेवलं, त्यांच्या कार्यकर्तृत्वावर मर्यादा घातल्या तेच देश आज मागास देश म्हणून ओळखले जातात. उलट, ज्या देशांनी या निम्म्या लोकसंख्येला बरोबरीन संधी दिली, ते देश मात्र जगात प्रगत झालेले दिसतात. भारतानेही आपल्या देशातील महिलांना योग्य संधी दिल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही, या विश्वासानेच शरद पवार यांनी देशात पहिल्यांदा, महाराष्ट्रात महिला धोरण आखलं. त्याची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी होईल अशी व्यवस्थाही उभी केली.

१९७५ हे साल जागतिक महिलावर्ष म्हणून जाहीर झालं होतं. महिलांच्या वेगवेगळ्या प्रश्नांसंबंधी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायासंबंधी त्या निमित्ताने जगभर चर्चा सुरू होती. जागतिक बँकेनही त्यावेळी लिंगभेदाच्या संदर्भात एक अहवाल प्रकाशित केला होता आणि त्यात महिलांच्या भारतातील दुःस्थितीवर प्रकाश टाकला होता. राष्ट्रीय गुन्हे संशोधन संस्थेने त्याच सुमाराला आपले अहवाल प्रकाशित करायला सुरुवात केली होती. बलात्कार, हुंडाबळी, विनयभंग आदी गुन्ह्यांची त्यातली आकडेवारी हादरवून टाकणारी होती. राज्यकर्ता म्हणून ही परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी आपलीच आहे, असं मानणाऱ्यांपैकी शरद पवार त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. महिलांविषयीच्या अन्याय सामाजिक आणि कौटुंबिक समजुतींना धक्का देणारं धोरण तयार करायचं, तर त्यासाठी वातावरणनिर्मिती करण्याची गरज होती. महिला धोरणाची आखणी आणि त्यासाठीची प्राथमिक तयारी करण्याचा निर्धार त्यांनी त्यासाठीच केला.

महिला धोरणाबाबतचा आपला निग्रह स्पष्ट करण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री असताना त्यांच्याकडच्या महत्त्वाच्या गृहखात्याची जबाबदारी अन्य सहकाऱ्यांवर सोपवली आणि समाजकल्याण खातं स्वत:कडे घेतलं. त्यातून महिला आणि बालकल्याण हे विभाग वेगळे करून त्याचं स्वतंत्र खातं निर्माण केलं. महिला धोरणाच्या आखणीमध्ये राज्यातील महिला कार्यकर्त्यांना सामावून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या १०० महिला कार्यकर्त्यांबरोबर तब्बल २१ बैठका घेतल्या. यातल्या प्रत्येक बैठकीला मुख्यमंत्री म्हणून ते स्वतः हजर राहिले. धोरणाचा मसुदा तयार झाल्यानंतर त्यात कायदेशीर उणीव राहू नये म्हणून प्रख्यात कायदेतज्ज्ञांची मदत घेतली. महाराष्ट्राच्या विधीमंडळात प्रदीर्घ चर्चा होऊन धोरणाला मान्यता दिली गेली. सुरुवातीला 'महिला कल्याण' ही संकल्पना घेऊन सुरू झालेला विचार 'महिला विकासा'पर्यंत पोहोचला आणि त्याचदृष्टीने पुढची अंमलबजावणीही झाली.

महिला धोरणामुळे राज्यात सर्व स्तरांवर महिलांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने विचार केला गेला. निर्णयप्रक्रियेत त्यांना सामावून घेण्यासाठी आवश्यक ते बदल केले गेले. पंचायत संस्था आणि नगरपालिकांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद केली गेली. पुढे ती ५० टक्क्यांपर्यंत वाढली. महिला आणि बालविकासासाठी जिल्हा परिषद पातळीवर वैधानिक समिती निर्माण केली गेली. त्या समितीचं अध्यक्षपद महिलेकडेच राहील, अशी तरतूद केली गेली. राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रात राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. असा आयोग नेमणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरलं. महिला धोरणाच्या अंमलबजावणीमुळे महाराष्ट्रात स्त्रियांच्या सामाजिक सहभागात, त्यांच्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनात आणि विविध क्षेत्रांतील महिलांच्या आत्मविश्वासपूर्ण वर्तनात मोठाच फरक झाला. एका अर्थाने हा राज्यातील स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा नवा जाहीरनामाच लिहिला गेला.

# ‘अयोध्ये’चा तोडगा

# ३२

विसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वामध्ये देशाचं प्राक्तन बदलणाऱ्या दोन मोठ्या राजकीय मोहिमा झाल्या. पहिली, खलिस्तानची फुटीरतावादी चळवळ आणि दुसरी, देशात सांप्रदायिक फूट पाडणारं अयोध्या रामजन्मभूमी आंदोलन. संपूर्ण देश ज्यानं ढवळून निघाला, किंबहुना देशासमोर अत्यंत अवघड पेचप्रसंग निर्माण केले, अशा या दोन्ही प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी श्री. शरद पवार यांनाच त्या त्या वेळच्या पंतप्रधानांकडून साकडं घातलं गेलं होतं. श्री. पवार यांना त्यासाठीचे अधिकार दिले होते आणि प्रश्न सोडवण्यासाठी मध्यम मार्ग काढण्याची विनंती करण्यात आली होती. आपल्यावर ती जबाबदारी आहे की नाही किंवा राजकीयदृष्ट्या आपण त्याच्याशी संबंधित आहोत की नाही, याचा विचार न करता श्री. पवार यांनी देशासमोरील प्रश्न सोडवण्याला प्राधान्य देऊन दोन्ही प्रश्नांत सन्मान्य तोडगा निघेल, अशी पार्श्वभूमी तयार केली. अलिकडे प्रकाशित झालेल्या या दोन्ही विषयांबाबतच्या पुस्तकांत श्री. पवार यांच्या कामगिरीची नोंद ठळकपणाने नोंदवण्यात आली आहे.

१९८९च्या रामजन्मभूमी आंदोलनाने संपूर्ण देशात प्रचंड तणाव आणि अविश्वासाचं वातावरण तयार झालं होतं. काही वेळेला प्रश्न इतके गुंतागुंतीचे आणि जटील होऊन जातात, की ते सोडवण्यापेक्षा काळाच्या अधीन करण्याचा पर्याय स्वीकारला जातो. रामजन्मभूमीचा प्रश्न अशा पद्धतीने पुढे ढकलत नेला तर तो देशाच्या एकात्मतेच्या मुळावर घाला घालेल, अशी भीती तत्कालीन पंतप्रधान चंद्रशेखर यांना वाटत होती. जमेल त्या पद्धतीनं, मिळेल तो मार्ग काढून हा प्रश्न सोडवला पाहिजे, असं त्यांचं पक्कं मत होतं. चंद्रशेखर यांच्या काळात देशाची राजकीय परिस्थिती अतिशय अस्थिर आणि आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली होती. अशा नाजूक परिस्थितीत अयोध्येचा प्रश्न सोडवण्याला अन्य पंतप्रधानाने अग्रक्रम दिला असता की नाही, याबाबत शंकाच आहे. कारण, ती मोठी जोखीम होती. पण, प्रश्नांचं योग्य भान असलेल्या चंद्रशेखर यांना त्या

प्रश्नाची धग आणि परिणाम स्पष्ट दिसत होते. देश आणि समाजहित यालाच प्राधान्य असणाऱ्या त्या नेत्याने त्यामुळेच हा प्रश्न सोडवण्याला अग्रक्रम दिला होता. त्यासाठी त्यांनी श्री. पवार आणि भारतीय जनता पक्षाचे नेते भैरोसिंह शेखावत यांची निवड केली होती. श्री. पवार यांनी 'रामजन्मभूमी न्यासा'च्या नेत्यांशी तर शेखावत यांनी 'बाबरी मशीद कृती समिती'च्या नेत्यांशी बोलणी करावी, असं चंद्रशेखर यांनी सुचवलं होतं.

रामजन्मभूमी आंदोलनाची सूत्रं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषद यांच्याकडेच होती. श्री. मोरेश्वर पिंगळे या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ नेत्याचा रामजन्मभूमी आंदोलनाची रणनीती ठरवण्यामध्ये महत्त्वाचा सहभाग होता. त्यामुळे पिंगळे यांच्याशी होणाऱ्या चर्चेला खूप महत्त्व होतं. श्री. पवार यांनी त्यांच्यापासूनच चर्चेला सुरुवात केली. चर्चेची पहिली फेरी झाल्यानंतर थेट नागपूरला जाऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला, रेशीमबागेला भेट दिली. तिथेही जबाबदार नेत्यांशी चर्चा करून त्यांना 'बाबरी मशीद कृती समिती'बरोबर एकत्रित चर्चेसाठी तयार केलं. दुसऱ्या बाजूला शेखावत यांनीही 'बाबरी मशीद कृती समिती'च्या नेत्यांबरोबर संवाद वाढवला. कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांचीही रामजन्मभूमी आंदोलनाच्या नेत्यांबरोबर एकत्रित बसून चर्चा करायची तयारी झाली होती. शेखावत यांच्याकडेच दोन्ही बाजूच्या नेत्यांना एकत्रितपणे स्नेहभोजनाला आमंत्रित केलं गेलं होतं. तिथे दोन्ही बाजूचे नेते आलेही होते. संपूर्ण देशामध्ये ज्या प्रश्नावरून वातावरण पेटलं होतं, त्याच प्रश्नात समोरासमोर उभ्या ठाकलेल्या नेत्यांनी भोजनासाठी एकत्रित येणं ही मोठी गोष्ट होती.

अयोध्येतल्या वादग्रस्त जागेवर एकाच ठिकाणी राममंदिर आणि बाबरी मशिदीची उभारणी करावी, दोन्ही बाजूंच्या धार्मिक भावना जपण्यासाठी स्वतंत्र प्रवेशद्वारं असावीत, या अंतिम तोडग्यापर्यंत दोन्ही बाजू आल्या होत्या. दुराग्रह बाजूला ठेवून दोन्ही बाजूचे नेते खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करू लागले होते. मतैक्य होत असतानाच दुर्दैवाने चंद्रशेखर यांचं सरकार कोसळलं. ते सरकार आणखी चार-सहा महिने टिकलं असतं तर या ज्वलंत प्रश्नावर समाधानकारक तोडगा निघाला असता देशातलं राजकीय-धार्मिक तणावाचं वातावरण खूप बदललं असतं. कदाचित देशाची आणि आशिया खंडाची राजकीय वाटचाल एका वेगळ्या दिशेने सुरू झाली असती. अयोध्या रथयात्रेचे 'हिरो' लालकृष्ण अडवाणी

यांनीही आपल्या आत्मचरित्रात चंद्रशेखर सरकार हा प्रश्न सोडवण्यासाठी योग्य दिशेने पावलं टाकत होतं, असं कबूल केलं आहे!

श्री. पवार यांनी 'खलिस्तानी चळवळी'च्या प्रश्नात केलेल्या मध्यस्थीने तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी आणि अकाली दलाचे नेते हरचरणसिंग लोंगोवाल यांच्यात यशस्वी करार झाला आणि देशासमोरचं फुटीरतेचं मोठं आव्हान संपुष्टात आलं. अयोध्येच्या प्रश्नात श्री. पवार यांनी यशस्वी शिष्टाई केली. पण ती पूर्णत्वाला जाण्यापूर्वीच दुर्दैवानं तेव्हाचं केंद्रातलं सरकार कोसळलं. त्यामुळे, त्यासाठीच्या प्रयत्नांना खीळ बसली. अन्यथा, देशासमोरचं हेही जटील आव्हान तेव्हाच संपुष्टात आलं असतं.

# ...आणि त्या सापडल्या

# ३३

गोष्ट १९९६ मधली. महाराष्ट्रातल्या अंगणवाडी कर्मचारी महिला मोर्चासाठी दिल्लीला गेल्या होत्या. मोर्चा झाला, की दिल्ली फिरायची असं त्यांनी आधीच ठरवलं होतं. अहमदनगर जिल्ह्यातल्या संगमनेरच्या महिलांनी त्यासाठी चार बस ठरवल्या होत्या. दिवसभराचं 'दिल्ली दर्शन' करून संध्याकाळी उशिरा तीन बस परत आल्या. एक बस आलीच नाही. रात्री ११-११.३० वाजेपर्यंत महिलांनी दम धरला. मग मात्र त्यांचा धीर सुटला. नेत्यांनी जवळचं निजामुद्दीन पोलीस स्टेशन गाठलं. तिथे तक्रार दिली. पण, वेगाने काही घडतंय असं दिसेना. ५२ महिला, त्यात काही तरुण मुलीही असल्यानं बाकीच्या महिला चांगल्याच घाबरल्या होत्या. रात्री १२-१२.३० वाजता त्यांनी दिल्लीतले पत्रकार नितीन वैद्य यांना फोन करून मदत करण्याची विनंती केली.

पहाटेपर्यंत प्रयत्न सुरू होते. काय करावं ते कुणालाच सुचत नव्हतं. अशावेळी पुन्हा एकदा वैद्य यांच्याशी संपर्क करण्याशिवाय पर्याय नव्हता. पहाटे ५-५.१५ वाजता पुन्हा वैद्य यांना फोन केला गेला. परिस्थितीचं गांभीर्य त्यांच्याही लक्षात आलं. इतक्या पहाटे उठवणार तरी कुणाला? तेव्हा काही आजच्यासारखे मोबाईल नव्हते. संबंधित मंत्री किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलायचं म्हटलं तरी ऑपरेटर त्यांच्यापर्यंत फोन देईलच याची काही शाश्वती नव्हती. काय करावं, असा विचार करत असतानाच वैद्य यांना श्री. शरद पवार यांना फोन करायचं सुचलं.

श्री. पवार तेव्हा महाराष्ट्रात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते होते. काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीसाठी ते आदल्या दिवशी दिल्लीत आले होते. सकाळी लवकर विमानानं मुंबईला परत जाणार होते. वैद्य यांना त्यांचा हा कार्यक्रम माहीत होता. त्यांनी श्री. पवार जिथे उतरले होते, तिथे फोन लावला. फोन श्री. पवार यांनीच उचलला. त्यांनी अडचण समजावून घेतली. महिला महाराष्ट्रातल्या आहेत म्हटल्यावर त्यांचीही काळजी वाढली. 'काय करता येईल ते बघतो', असं सांगून त्यांनी फोन ठेवला.

सकाळी ७ वाजण्याच्या सुमाराला वैद्य यांना श्री. पवार यांचाच फोन आला. श्री. पवार निजामुद्दीन पोलीस स्टेशनमध्ये होते! तपासाची चक्रं वेगानं फिरली होती. महिलांचा तपास लागला होता. खुद्द श्री. पवारच काळजीने पोलीस स्टेशनला पोहोचल्याने महिलाही हरखून गेल्या होत्या!

झालं असं होतं, वैद्य यांच्याकडून माहिती मिळाल्यानंतर श्री. पवार यांनी दिल्लीचे पोलीस आयुक्त निखिलकुमार यांच्याशी संपर्क साधला होता. त्यांना घटनेचं गांभीर्य समजावून सांगितलं. निखिलकुमार यांनी आदेश दिले. दिल्लीच्या सर्व हद्दीवर नाकाबंदी करण्यात आली. दिल्लीच्या आजूबाजूच्या सगळ्या पोलीस स्टेशनना तपासाचे आदेश दिले गेले. पोलीसांना त्यातच हरिद्वारला ही बस सापडली. तिथल्या पोलीस आयुक्तांनी बस होती, तिथे प्रत्यक्ष जाऊन खात्री करून घेतली. बसमधील महिलांनी ड्रायव्हरला तयार करून परस्पर हरिद्वार गाठलं होतं! पोलीसांनी बस तपासली, महिला मोजल्या. त्या बरोबर ५२ असल्याचं निश्चित करून घेतलं आणि निखिलकुमार यांना तशी माहिती कळवली. निखिलकुमारांनी श्री. पवार यांना खुशालीचा निरोप दिला. श्री. पवार यांनी तेच श्री. वैद्य यांना फोन करून कळवलं.

पोलीस स्टेशनमध्ये बसून श्री. पवार यांनी स्वतः केलेल्या या सगळ्या प्रयत्नांमुळे श्री. वैद्य यांनाच संकोचल्यासारखं झालं. कारण, घटना समजल्यानंतर श्री. पवार यांनी आपली सकाळची एक भेट आणि नियोजित विमानही या शोधमोहिमेसाठी चुकवलं होतं. महिलांनी परस्पर केलेल्या नियोजनामुळे गोंधळ झाला होता. ‘महिला सापडल्या आहेत पण, त्याची बातमी करू नकोस. मी जे केलं तेही कुठे लिहू नकोस’, असं श्री. पवार यांनी श्री. वैद्य यांना निक्षून सांगितलं. खरं तर, ती चौकटीची बातमी होती. वैद्य यांनी बातमीचा आराखडा मनोमन निश्चितही केला होता. पण श्री. पवार ‘बातमी देऊ नको’ असं सांगत होते. ‘का?’ असा प्रश्न श्री. वैद्य यांना पडला होता. त्याचं उत्तर श्री. पवार यांनीच दिलं, ‘तुझी बातमी होईल. पण, त्या ५२ महिलांचे पती त्यांना आयुष्यात पुन्हा कधीही कुठे जाऊ देणार नाहीत. त्यामुळे, ती चूक करू नकोस!’

श्री. पवार श्रेयाची बातमी किंवा बातमीचं श्रेय यापेक्षा अधिक खोलवर विचार करून महत्त्वाचा धडा देत होते...

# संवेदनशीलतेचं दर्शन

# ३४

साल होतं १९९३. मुंबईतल्या भीषण दंगली नुकत्या कुठे शांत होत होत्या, एवढ्यात धुळे जिल्ह्यातल्या एका भागामध्ये आदिवासी मुलांच्या मृत्यूच्या बातम्या येऊ लागल्या. रोज काही मुलं दगावत होती. एकेदिवशी तर १०-१२ मुलं दगावली. परिस्थितीची भीषणता मुंबईत मुख्यमंत्री शरद पवार यांना जाणवली. त्यांनी त्या भागात प्रत्यक्ष जाण्याचं निश्चित केलं. तिथे पोहोचण्यासाठी मार्ग तपासण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. पण, अधिकारी वेगळाच सल्ला देऊ लागले. जिथे हे मृत्यू घडत होते, त्या आदिवासी पाड्यांवर पोहोचण्यासाठी रस्त्याची कोणतीही सुविधा नव्हती. आदिवासी पाड्यांवरच काय, त्या भागात पोहोचणंच मुश्किल होतं. 'मुख्यमंत्र्यांनी तिथे जाणं योग्य नाही,' असा सल्ला अधिकारी देऊ लागले. पण, श्री. पवार यांचा निर्णय पक्का होता. त्यामुळे, अधिकाऱ्यांना मार्ग काढावा लागला.

संपूर्ण परिसर डोंगरउताराचा असल्यानं त्या पाड्यांजवळ हेलिकॉप्टर उतरवण्याएवढाही समतल भाग उपलब्ध नव्हता. सर्वात जवळचा आणि सोयीचा मार्ग म्हणजे हेलिकॉप्टरनं गुजरातमधल्या बेलियापाडा या गावी जायचं आणि तिथून १२ किलोमीटर पायी जायचं! श्री. पवार यांनी हाच मार्ग निवडला. सुरुपसिंग नाईक, मधुकर पिचड, माणिकराव गावित या सहकाऱ्यांसह श्री. पवार बेलियापाड्याला पोहोचले. तिथून अधिकाऱ्यांना सोबत घेऊन पायी होराफळीला गेले. होराफळी आणि आजूबाजूच्या आणखीही काही पाड्यांची त्यांनी पाहणी केली. संपूर्ण भाग डोंगरउताराचा असल्याने शेती होत नव्हती, दुर्गमता असल्यामुळे रस्ते नव्हते, स्वस्त धान्य दुकान नव्हतं, सरकारची कुठलीही यंत्रणा तिथे धडपणे काम करते आहे, याची खूण दिसत नव्हती. लहान मुलं भयानक अवस्थेत होती. कुपोषित आणि बहुतांश मरणासन्न. ते दृश्य पाहून श्री. पवार यांच्या डोळ्यांत पाणी तरारलं.

'आपण राज्य करतो आहोत, मुख्यमंत्री आहोत आणि राज्यातल्या

एका कोपऱ्यात मुलं मरताहेत, मग राज्य चालवण्यात अर्थ तो काय? इतकी टोकाची उद्विग्नता माझ्या मनात दाटून आली', असं श्री. पवार यांनी त्या भेटीची आठवण सांगताना आपल्या 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रात म्हटलं आहे. ही परिस्थिती बदलायला हवी, असं त्यांच्या मनाने तिथेच घेतलं. त्या दुर्गम भागातूनच त्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांशी संपर्क साधला. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आदिवासींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करण्याचा विचार त्यांनी बोलून दाखवला. अशी तरतूद करायची तर अर्थसंकल्पाच्या रचनेत काही बदल करावा लागला असता, काही आदेश नव्यानं काढावे लागले असते, त्यासाठीची प्रशासकीय सिद्धता करावी लागली असती. अधिकाऱ्यांनी तसं बोलून दाखवलं तेव्हा श्री. पवार यांनी त्यांना, 'इथे माणसं मरत असताना आपण कागदपत्रं आणि औचपारिकतांमध्ये किती वेळ घालवणार?' असा ुलट प्रश्न विचारला. मी मुंबईला येईपर्यंत आवश्यक ती माहिती घेऊन प्रस्ताव तयार करा, असा आदेशच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

आदिवासींसाठी झालेल्या या निर्णयानं समाजातल्या सर्वात उपेक्षित घटकाला एकूण अर्थसंकल्पात त्याचा हक्काचा वाटा मिळाला. आदिवासी योजनांच्या आर्थिक तरतुदींमध्ये कपात करणं अशक्य झालं. देशपातळीवर हा निर्णय क्रांतिकारक ठरला. संपूर्ण देशात तो मार्गदर्शक सूत्र म्हणून नंतर स्वीकारला गेला, अनुकरणीय ठरला.

# नवं हिल स्टेशन | ३५

सुट्टीला कुठे जायचं म्हटलं की आपल्यासमोर पर्याय असतात ते महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा-खंडाळा, सापुतारा, चिखलदरा यांसारखे. पण, तुम्हाला माहिती आहे का, ही सारी पर्यटनस्थळं विकसित झाली, ती इंग्रजांच्या काळात. स्वातंत्र्यानंतर आपण एकही पर्यटनस्थळ विकसित केलं नाही. ब्रिटनमधील 'लेक डिस्ट्रिक्ट'ची सैर करताना शरद पवार यांच्या मनात हा विचार आला. महाराष्ट्रामध्ये सरकारने एखादं पर्यटनस्थळ नव्याने विकसित का करू नये, असा प्रश्न त्यांना पडला. महाराष्ट्रामध्ये नाशिक जिल्ह्यातील कसारा घाटापासून सुरुवात केली तर भंडारदरा, निळवंडे, कुकडी, चासकमान, मुळशी, वरसगाव, पानशेत, भाटघर, निरा-देवघर, धोम, कोयना, वारणा, राधानगरी अशी कोल्हापूरपर्यंत पसरलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगातील ठिकाणं पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीने विकसित केली तर?

मनात हा मुद्दा घोळवत नयनरम्य निसर्गसौंदर्य लाभलेल्या सह्याद्रीच्या परिसराचा विचार त्यांनी सुरू केला. सुरुवात पुणे जिल्ह्यापासून केली. वरसगाव धरण परिसराचा सगळा परिसर त्यांनी नजरेखालून घातला. काही गोष्टींची खात्री करून घेतल्यानंतर वरसगांव आणि नवीन महाबळेश्वर अशा दोन ठिकाणांची शक्यता आजमावून पाहायला संबंधित विभागाला सांगितलं. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींची समितीही नेमली. या समितीच्या 'लेक डिस्ट्रिक्ट'चा दौरा घडवून आणला. ते पाहून आलेल्या समितीने दिलेल्या अहवालाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. बरीच प्रगती झाली. पण, हे काम सरकारकडून होऊ शकेल की नाही, याबाबत शंका निर्माण झाली. त्यातून खासगी विकासकांचा शोध सुरू झाला. अजित गुलाबचंद या उद्योजकाचं नांव डोळ्यासमोर आलं. त्यांनीही प्रकल्पात रस दाखवला. जगभरातील नामवंत वास्तुविशारदांना सहभागी करून घेतलं आणि साधारणत: पाच लाख लोक राहू शकतील, अशा गिरीनगरीच्या उभारणीचा आराखडा नक्की केला गेला. सन २००२ मध्ये प्रत्यक्ष

कामाला सुरुवात झाली आणि २०१० मध्ये पहिला टप्पा पूर्ण झाला. 'लवासा कॉर्पोरेशन कंपनी'नं खरेदी केलेल्या एकूण १२ हजार ८० एकर जमिनीवर पहिल्या टप्प्यात ८० हजार लोक राहू शकतील अशी घरं, हॉटेलं आणि आघाडीची शैक्षणिक संकुलं आज उभी राहिली आहेत.

'लवासा हिल स्टेशन' म्हणून नोंद झालेल्या या परिसरात एकूण अठरा गावांचा समावेश आहे. या परिसरातील ८९ टक्के जमीन वैराण तर उर्वरित जमीन कसण्यासाठी अशक्य अशी होती. आज मात्र तिथे सुट्टीच्या दिवशी साधारण २० ते ३० हजार पर्यटक भेट देतात. लवासा परिसरातील गावांचं अर्थकारणच त्यामुळे बदलून गेलं आहे. गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनीही या प्रकल्पाला भेट दिली होती आणि असंच हिल स्टेशन गुजरातमध्ये डोलेरा इथे विकसित करण्यासाठी अजित गुलाबचंद यांना आमंत्रण दिलं होतं. आज जी स्मार्ट सिटीची चर्चा सुरू आहे, त्याची सुरुवात महाराष्ट्रात 'लवासा'पासूनच झाली आहे.

लवासामध्ये आधुनिक राहणीमान, मनोरंजन, व्यापार, शिक्षण आणि पर्यटन या सर्वच गोष्टींचा बारकाईने विचार केला असल्याचं प्रत्यक्ष पाहिल्यानंतर लक्षात येतं. पर्यावरण टिकवण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करून लाखो झाडं लावण्यात आली आहे. पुण्यासाठी आणि त्या जिल्ह्यातील गावांसाठी आवश्यक असणारं पाणी वापरल्यानंतर मोसे खोऱ्यात राहणारं अतिरिक्त पाणी लवासासाठी वापरलं जाईल, अशी व्यवस्था केली गेली आहे. इथल्या शहराची पाण्याची गरज केवळ ०.०८ टीएमसी एवढीच असणार आहे. 'लवासा'सारखेच आणखी किमान वीस प्रकल्प उभे करता येतील, अशी ठिकाणं महाराष्ट्रात आहेत. ती येत्या काळात विकसित होतीलही.

# दुसऱ्या हरितक्रांतीचे शिल्पकार

# ३६

'शेतमालाला योग्य दर मिळाला पाहिजे', ही अनेक शेतकरी आंदोलनांतून होणारी वर्षानुवर्षांची मागणी. शेतमालाला योग्य भाव मिळाला तर शेतकऱ्यापुढचे अनेक प्रश्न सुटतील, अशी मांडणी शेतकरी आंदोलनांतून होत असतेच. शरद पवार यांनी केंद्रीय कृषिमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर प्राधान्यक्रमाने जे निर्णय घेण्याचं ठरवलं, त्यात शेतमालाच्या हमी किमतीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय होता. महत्त्वाकांक्षी म्हणण्याचं कारण असं की, शेतमालाच्या किमतीचा हमीभाव ठरवणं केवळ कृषिमंत्र्यांच्या हाती नसतं. त्यात पंतप्रधानांसह अर्थमंत्री आणि अन्यही संबंधित खात्याच्या मंत्र्यांची महत्त्वाची भूमिका असते.

उदाहरणार्थ, ज्या शेतमालाच्या हमीभावात वाढ होते, त्या शेतमालाच्या किमती बाजारात वाढतात. त्यातून भाववाढ होते, महागाईचा निर्देशांक वाढतो, चलनवाढ सुरू होते. सरकारचं धोरण त्यामुळे साधारणत: जीवनावश्यक वस्तूंच्या किमती, म्हणजेच शेतमालाच्या किमती न वाढवण्याकडे, त्या स्थिर ठेवण्याकडे असतं. त्यात शेतकऱ्यांचं मात्र खूप नुकसान होतं. कारण, बाजारात अन्य वस्तूंच्या किमती वाढत असतात. त्यामुळे, त्याचा स्वतःचा उत्पादनखर्च वाढत असतो. त्याचा दैनंदिन जगण्याचा खर्चही वाढत जातो. तो जो माल उत्पादित करतो त्याच्याच किमती फक्त वाढत नाहीत. शेतकऱ्याचा दोन्ही बाजूंनी कोंडमारा होतो.

स्वत: शेतकरी म्हणून कष्ट केलेल्या आणि आपल्या जमिनीतला शेतमाल बाजारात नेऊन विकण्याचा प्रयत्न आयुष्याच्या अगदी सुरुवातीलाच केलेल्या श्री. पवार यांना शेतकऱ्याचं हे दुखणं चांगलं माहीत होतं. सुरुवातीच्या काळात त्यांनी त्यासाठी आंदोलनंही केली होती. महाराष्ट्रातील 'शेतकरी दिंडी'त तर ते सामील झाले होतेच. पण, त्यातून उभ्या राहिलेल्या शेतकऱ्यांच्या देशपातळीवरील आंदोलनाचं नेतृत्वही त्यांच्याकडे आलं होतं. राष्ट्रीय पातळीवर राजकारणातलं त्यांचं पहिलं पाऊल शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातूनच पडलं होतं. शेतकऱ्याचं हे

दुखणं दूर करायचं तर सरकारमधल्या अन्य जबाबदार व्यक्तींना भूमिका समजावून सांगणं महत्त्वाचं होतं. हा अंतर्गत संघर्ष अपरिहार्य होता. तो त्यांनी केला. शेतमालाच्या हमीभावात त्यापूर्वीही वाढ व्हायची. पण ती फार तर ५ ते १० रुपये इतकीच असायची. श्री. पवार यांनी गव्हाच्या हमीभावात एकाच वेळी ६० रुपयांनी वाढ केली. त्यापूर्वीच्या १० वर्षांची तुलना केली तर ही वाढ दुपटीपेक्षाही अधिक होती! त्याचा योग्य तो परिणाम झाला. पंजाब, हरियाणा, मध्यप्रदेश आणि पश्चिम-उत्तर प्रदेशातल्या गव्हाच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. तांदूळ, डाळी, कापूस, भुईमूग आदी पिकांच्या हमीभावातही याच पद्धतीने वाढ करण्यात आली.

श्री. पवार केवळ हमीभाव वाढवून थांबले नाहीत. त्यांनी बोनसची कल्पना मांडली आणि ती राबवायला सुरुवातही केली. केंद्र सरकारचं 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (एफसीआय) वेगवेगळ्या बाजारात जाऊन शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करतं. एखाद्या धान्याला व्यापारी शेतकऱ्याला ४०० रुपये देत असेल, तर या महामंडळानं त्यापेक्षा अधिक भाव देऊन धान्याची खरेदी सुरू केली. शेतकऱ्याने साहजिकच जिथे अधिक भाव मिळतो, तिथे आपला माल द्यायला सुरुवात केली. त्यामुळे, 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ला अधिक धान्य मिळू लागलं. श्री. पवार कृषिमंत्री असताना देशातली अन्नधान्याची गोदामं पूर्ण भरलेली होती, याचं हे कारण होतं.

वर्षानुवर्षं सरकारी यंत्रणेमध्ये भिनलेली एखादी कल्पना बदलायची असेल तर त्यासाठी मुळातून प्रयत्न करावे लागतात. शरद पवार यांना याबाबतीत तेच करावं लागलं. शेतकऱ्यांच्या मालाच्या हमीभावात घसघशीत वाढ करायला अर्थ आणि नियोजन खात्याचा विरोध होता. पण, श्री. पवार यांनी तिथे जोरकसपणे शेतकऱ्याची बाजू मांडली 'रास्त भाव ही संकल्पनाच दिशाभूल करणारी आहे. हमीभाव ठरवताना शेतकऱ्याचा उत्पादनखर्च लक्षात घेतला पाहिजे. आपल्या कष्टाला योग्य दाम मिळते आहे, अशी त्याची भावना झाली पाहिजे. त्याशिवाय शेती करण्यातला त्याचा उत्साह आणि मनोधैर्य टिकणार नाही. ते टिकलं नाही तर देशाची धान्याची गरज पूर्ण होणार नाहीच, पण आयात वाढवून आपल्याला मोठं परकीय चलनही खर्च करावं लागेल.' अर्थशास्त्रीय भाषेत मांडलेलं शेतकऱ्याचं हे म्हणणं संबंधितांना पटलं तेव्हाच शेतकऱ्याला चांगला हमीभाव देता आला. देशातली धान्याची गोदामं काठोकाठ भरली!

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या मंत्रीमंडळाच्या शेवटच्या बैठकीत सरकारच्या कामगिरीबाबत अभिनंदनपर ठराव मांडण्यात आला. त्यात कृषिक्षेत्रातील कामगिरीचा उल्लेख विशेषत्वाने करण्यात आला होता. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग या दोघांनीही श्री. पवार यांच्या कृषिखात्यातील कर्तबगारीचं वेळोवेळी तोंड भरुन कौतुक केलं. राष्ट्रपती झाल्यानंतर श्री.मुखर्जी कार्यक्रमानिमित्त बारामतीला आले होते, त्यावेळी ते म्हणाले, ''२००४ साली 'संपुआ' सरकारमध्ये श्री. पवार यांनी सहभागी व्हावं म्हणून मी जेव्हा त्यांना भेटायला गेलो, तेव्हा ते संरक्षण, परराष्ट्र, गृह किंवा अर्थ यांपैकी एखाद्या खात्याचं मंत्रिपद मागतील, असं मला वाटत होतं. त्यांनी कृषिखातं मागितल्यावर मला कमालीचं आश्चर्य वाटलं. स्वतःहून मागून घेतलेल्या कृषिखात्यात निष्ठेने आणि ध्येयाने अविरत काम करून त्यांनी देशाला अन्नधान्याच्या संकटातून बाहेर काढलंच; पण देशात दुसरी हरितक्रांती घडवून आणून शेतकऱ्यांच्या जीवनात अन्नसुरक्षेइतकंच महत्त्व आर्थिक सुरक्षेलाही आहे, हे ठळकपणे अधोरेखित केलं. भारतातल्या 'दुसऱ्या हरितक्रांतीचे शिल्पकार' म्हणून देश आज त्यांच्याकडे गौरवाने पाहतो आहे.''

# सबल शिवारातून सफल परराष्ट्रसंबंध ३७

भारताच्या वाढत्या लोकसंख्येची गरज भागेल एवढं खाद्यान्न या देशात तयार व्हावं, त्यासाठी देशाला परावलंबी राहावं लागता कामा नये, असं स्वप्न शरद पवार यांनी ते राज्याचे कृषिमंत्री असल्यापासून पाहिलं होतं. देशाचं कृषिमंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांनी आपलं हे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. वाढती लोकसंख्या, घटत जाणारं शेतीक्षेत्र, अनियमित पर्जन्यमान, शेतीत भांडवल आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, शेतीवर अवलंबून असणारी मोठी लोकसंख्या असे अनेक प्रश्न यासंदर्भात होते. परंतु, त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न होता तो शेतीक्षेत्राकडे झालेल्या राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षाचा आणि नियोजनातील अभावाचा. सगळ्या प्रश्नांतून मार्ग काढायचा तर शेवटची दोन कारणं ध्यानी घेऊन प्राधान्यानं काम करणं आवश्यक होतं. त्यांनी त्यावरच आपलं लक्ष केंद्रीत केलं.

देशामध्ये पहिली हरितक्रांती झाल्यानंतर शेतीक्षेत्राकडे दुर्लक्षच होत गेलं. १९८४ ते १९८९ चा काळ वगळला तर २००४ पर्यंत कृषिखात्याला पूर्ण ५ वर्षं जबाबदारी सांभाळलेला असा मंत्री मिळाला नव्हता. त्यामुळे, धोरणामध्ये आणि त्याच्या कार्यवाहीमध्येही अक्षम्य धरसोड झाली होती. त्याचा परिणाम कृषिक्षेत्रातील उदासीनतेत झाला होता. देशासमोर मोठं कृषिसंकट उभं राहिलं होतं. १९९६-९७ मध्ये तर कृषिक्षेत्राच्या वाढीचा विकासदर १.९२ टक्के इतक्या नीचांकी पातळीवर आला होता. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांना देशाला खाद्यान्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचं स्वप्न साकार करायचं होतं. त्यांनी कृषिखात्याशी संबंधित अन्नप्रक्रिया, पशुपालन, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक कल्याण आणि जलसंधारण ही सर्व खाती एकाच व्यक्तीकडे असावीत असा आग्रह धरला. हा आग्रह मान्य केला गेला. कृषिखात्याबरोबरच ही सर्व खाती श्री. पवार यांच्याकडेच सोपवली गेली. परिणामी, कृषिविभागाशी संबंधित सर्व निर्णय एकत्रितपणे घेतले जाऊ लागले.

शेतीक्षेत्र स्वयंपूर्ण करायचं तर या क्षेत्रातील संशोधनाला प्राधान्य देणं आणि त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणं आवश्यक होतं. या क्षेत्रासाठी देशात सुरुवातीला काही संशोधनसंस्था स्थापन केल्या गेल्या होत्या. मात्र, पुरेशा निर्णयस्वातंत्र्याअभावी त्या निष्प्रभ झाल्या होत्या. या संस्थांना त्यांच्या संशोधनाच्या दृष्टीने योग्य ते स्वातंत्र्य आणि वातावरण निर्माण करून देणं आवश्यक होतं. तसे निर्णय सुरुवातीलाच घेतले गेले. बदलत्या काळानुसार शेतीतंत्रात सुधारणा करण्यासाठी, तसंच शेतकऱ्यांमध्ये नवे दृष्टिकोन रुजवण्यासाठी काही संशोधनसंस्थांची स्वतंत्रपणे स्थापना करणं आवश्यक होतं. काही कीटक शेतीसाठी शेतकऱ्यांचे मित्र असतात. त्यावरच्या संशोधन आणि अभ्यासासाठी याच विचारातून 'नॅशनल ब्युरो ऑफ ॲग्रीकल्चरली इम्पॉर्टंट इन्सेक्ट्स' या संस्थेची स्थापना केली गेली. शेतीसाठी काम करणाऱ्या संस्था आणि शेतकरी यांच्यातील दुवा भक्कम होण्यासाठी संस्थात्मक रचना उभी करणं आवश्यक होतं. त्यासाठी कृषिविद्यापीठं, नव्या संशोधन संस्था, संशोधन प्रकल्प, कृषिविज्ञान केंद्र असं जाळं विस्तारलं गेलं. देशातलं पहिलं कृषिविकास केंद्र १९७४ मध्ये स्थापन झालं होतं. त्यानंतरच्या २८ वर्षांत केंद्रांची संख्या २९० पर्यंत पोहोचली होती. शरद पवार यांच्या १० वर्षांच्या कृषिमंत्रीपदाच्या काळात त्यात तब्बल ३४० केंद्रांची भर पडली.

पंजाब आणि हरियाणा ही राज्यं गहू आणि तांदळाच्या उत्पादनात आघाडीवर होती. या पिकांना अधिक पाण्याची आवश्यकता असल्याने दोन्ही राज्यांत भूगर्भातील पाण्याचा मोठा उपसा होत होता. खरं तर आसाम, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, छत्तीसगड या राज्यांत पाण्याची उपलब्धता चांगली आहे. त्या पाण्याचा उपयोग करून देशाची तांदळाची गरज तिथूनच भागवावी, या हेतूने 'ब्रिंगिंग ग्रीन रिव्होल्युशन टू इस्टर्न इंडिया' धोरण आखलं गेलं. ते इतकं यशस्वी झालं की, या राज्यांनी देशाची तांदळाची गरज भागवायला सुरुवात केलीच शिवाय, निर्यातीसाठीही मोठ्या प्रमाणावर तांदूळ उपलब्ध करुन दिला. जगातला सर्वाधिक तांदूळ निर्यात करणारा देश म्हणून भारत ओळखला जाऊ लागला.

पंजाब आणि हरियाणाच्या बरोबरीने मध्यप्रदेश मोठ्या प्रमाणावर गहू पिकवू लागला. नुसता संख्येनेच नाही, तर गुणवत्तेनेही. त्यामुळे, भारत 'गहू निर्यातदार' देश झाला. आज आपण गव्हाच्या उत्पादनात जगातले दुसऱ्या क्रमांकाचे निर्यातदार आहोत! तांदूळउत्पादनाचं केंद्र पंजाब आणि

हरियाणातून देशाच्या पूर्वभागात सरकल्याने तिथल्या पाण्याचा उपयोग डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनासाठी होऊ लागला. कापूस आणि साखरेच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी कापूस आणि ऊस या दोन्ही पिकांच्या नव्या जाती विकसित केल्या गेल्या. महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशमध्ये कापसाचं उत्पादन इतकं वाढलं की, आपण कापसाच्या निर्यातीतून जगात दुसऱ्या क्रमांकावर जाऊन पोहोचलो. साखरेच्या बाबतीतही आता ब्राझीलपाठोपाठ जगात आपला नंबर आहे.

शेतमालाच्या उत्पादनवाढीतील या बदलांचा परिणाम आपल्या देशाची प्रतिमा उजळण्यात तर झालाच, त्याहीपेक्षा तो परराष्ट्र संबंधांमध्ये झाला. जे देश अन्नधान्याच्या गरजेपोटी अन्नपुरवठादार देशांच्या नको त्या अटी स्वीकारत होते, त्यांची त्यातून सुटका झाली. या देशांनी भारताकडून अन्नधान्याची आयात करायला सुरुवात केली. निर्यातीच्या या संधीनं आपल्या देशाला अनेक उपयुक्त करार करून घेता आले. शेतीतून सुरू झालेली क्रांती परराष्ट्र धोरणापर्यंत पोहोचली! परराष्ट्राशी संबंधित देशाच्या सर्वांगीण व्यवहाराला तिने हातभार लावला.

# कर्जाच्या फासातून बळीराजाची सुटका | ३८

गरज असेल तेव्हा भांडवल उपलब्ध नसणं ही शेतकऱ्याची मोठी अडचण असते. पतपुरवठा करणाऱ्या संस्थांनी शेतकऱ्याला शक्य तितका पतपुरवठा करावा, यासाठी सरकार वेळोवेळी धोरण जाहीर करत असतं. बँकांना त्यासाठीचं उद्दिष्टही ठरवून देतं. तरीही शेतकऱ्याची गरज भागतेच, असं नाही. शिवाय, भारतीय शेती ही लहरी हवामानावर तर बाजार शेतकऱ्याच्या नियंत्रणाबाहेर असल्यानं घेतलेल्या कर्जाची परतफेड करणंही शेतकऱ्याच्या दृष्टीने मोठं अडचणीचं असतं. त्यातून शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा वाढत जातो. निसर्गाचं वरदान लाभतं तेव्हा शेतकऱ्याला नेमकं भांडवल उपलब्ध होत नाही, त्यामुळे त्याच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. निसर्ग साथ देतो तेव्हा त्याचा लाभ घेता येत नाही आणि जुनं कर्ज फेडता येत नाही. शेतकरी अशा कात्रीत सापडतो, तेव्हा सरकारने मदत करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो.

केंद्र सरकारमध्ये कृषि मंत्रीपदाची जबाबदारी घेतल्यानंतर शरद पवार यांनी याही प्रश्नातून शेतकऱ्याची सोडवणूक करण्याचा निर्धार केला. बी-बियाणं, खतं, शेतीची अवजारं यासाठी शेतकऱ्याला दर हंगामाला भांडवलाची गरज असते. हे भांडवल पुरेशा प्रमाणात उपलब्ध झालं तर त्याला कष्टाची जोड देऊन शेतकरी त्यातून संपत्तीची निर्मिती करतो. श्री. पवार यांनी कृषि विभागाचा प्राथमिक आढावा घेतला तेव्हाच त्यांना देशातला ६४ टक्के शेतकरी कर्जाच्या विळख्यात असल्याचं लक्षात आलं. या कर्जाची परतफेड करणं शेतकऱ्याला केवळ अशक्य होतं. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, कधी निकृष्ट बी-बियाणं तर कधी खताचा अपुरा पुरवठा अशा अनेक कारणांमुळे कर्जात बुडालेला हा शेतकरी मूळ मुद्दल आणि त्यावरील अनेक पट व्याजानं हैराण झालेला होता. त्याला नवं कर्ज उपलब्ध होणं शक्य नव्हतं. त्या अर्थानं त्याची पत संपलेली होती. त्याला नव्यानं पत मिळवून देणं आवश्यक होतं.

कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या या ६४ टक्के शेतकऱ्यांच्या

कर्जाची रक्कम साधारण ६७ हजार कोटीइतकी होती. त्यांच्यावरचा हा बोजा हटवल्याशिवाय शेतकऱ्याची मान मोकळी होणार नव्हती. त्याला पूर्ण क्षमतेने शेतीतून काही पिकवणं शक्य नव्हतं. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता या सगळ्या परिस्थितीचा परिणाम शेतीतील गुंतवणूक थांबण्यात झाला होता. शेतीक्षेत्राच्या गतीला खीळ बसली होती. श्री. पवार यांनी सरकारमधील सर्व घटकांची समजूत काढून शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं. ३ कोटी ६९ लाख शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ झाला. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि केरळ या राज्यांतील ज्या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं प्रमाण मोठं होतं, त्या ३१ जिल्ह्यांसाठी १९ हजार ९१० कोटी रुपयांचं 'पुनर्वसन पॅकेज' जाहीर करण्यात आलं. एकाच फटक्यात संपूर्ण देशातील शेतकऱ्यांचं एकूण १ लाख ४० हजार कोटी रुपयांचं कर्ज माफ करण्यात आलं. त्यामुळे २००४ ते २०११ या काळात अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या पतपुरवठ्यात चौपट वाढ झाली. अन्नधान्याचं विक्रमी उत्पादन झालं. २००८ मध्ये आलेल्या जागतिक मंदीचा फटका त्यामुळेच भारताला बसला नाही.

कर्जमाफी झाली, तरी तेवढ्याने प्रश्न सुटणार नव्हता. शेतकऱ्याला नवं कर्ज किती टक्के दराने मिळेल, हाही महत्त्वाचा मुद्दा होता. शेतीकर्जावर असलेला १२ टक्के व्याजदर खाली आणण्याची गरज होती. त्यासाठी बरेच प्रयंत्न करून अखेर तो १२ वरून १० वर, १० वरून ८ वर, ८ वरून ६ वर आणि ६ वरून ४ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात श्री. पवार यांना यश आलं. त्यासाठी ५ ते ६ वर्षं विविध पातळ्यांवर संघर्ष करावा लागला. केंद्राने व्याजदर खाली आणल्यानंतर राज्यांनी आपला वाटा उचलून हा व्याजदर आणखी खाली आणावा, यासाठीही श्री. पवार आग्रही होते. वेगवेगळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी त्यासाठी ते सतत चर्चा करत होते. त्याला कर्नाटक राज्याने सर्वप्रथम प्रतिसाद दिला. त्याचं केरळ, तामिळनाडू, महाराष्ट्र, पंजाब, हरयाणा अशा अनेक राज्यांनी अनुकरण केलं. देशातील शेतीक्षेत्रात उत्साहाचं, चैतन्याचं वातावरण पसरायला त्यामुळे मदत झाली. शेतकऱ्याला प्रोत्साहन मिळालं. त्यानं देशाला आपल्या कष्टानं भरभरून अन्नधान्य पिकवून दिलं.




राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, उपराष्ट्रपती मोहम्मद हमीद अन्सारी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत दिल्लीच्या विज्ञान भवनात श्री. शरद पवार यांचा अमृत महोत्सवी सत्कार झाला. या सोहळ्याला खासदार सुप्रिया सुळे, पंजाबचे मुख्यमंत्री पंजाबसिंग बादल, माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी, अर्थमंत्री अरुण जेटली, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते गुलाब नबी आझाद, काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे नेते खासदार मुलायमसिंग यादव, जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला, लोकसभेच्या सभापती सुमित्रा महाजन, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, सौ. प्रतिभा पवार, काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सिताराम येचुरी, राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, केंद्रीय नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू, राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि खासदार प्रफुल्ल पटेल उपस्थित होते.

# सुवर्णसंधी गमावली | ३९

या शतकाच्या प्रारंभी आपल्या देशात कृषिक्षेत्रातील एका मोठ्या वादाला तोंड फुटलं होतं. जीएम (जेनेटिकली मॉडिफाइड) बियाणी वापरायची की नाही, असा तो वाद होता. पिकांच्या जनुकांमध्ये बदल करून, त्यातले दोष दूर करून तयार केलेलं नवं वाण म्हणजे 'जीएम क्रॉप'. जेनेटिक इंजिनीअरिंग तंत्राच्या साहाय्याने पिकातील डीएनएमध्ये आवश्यक ते बदल करून मुळात नसलेल्या गुणांसह नवी जात तयार करण्याचं हे तंत्रज्ञान. कीड, रोगराई आणि हवामानातल्या बदलाला तोंड देईल, अशी जात निर्माण करण्यासाठी हे तंत्र म्हणजे वरदान आहे.

जगातलं पहिलं जीएम तंबाखूचं झाड १९८२ मध्ये तयार केलं गेलं. २००२ मध्ये आपल्याकडे 'बीटी कॉटन बियाणं' आणलं गेलं. या बियाण्यामुळे शेतकऱ्यांना परावलंबी केलं जातं, अशी टीका मोठ्या प्रमाणावर केली गेली. जगभर यासंदर्भात दोन मतप्रवाह आहेत. प्रगत देश जीएम बियाण्यांच्या वापराला विरोध करतात, पण प्रत्यक्षात मात्र स्वत: त्याचा वापर करतात. भारतामध्ये बीटी कॉटन बियाण्यावरून मोठाच वाद झाला. जीएम तंत्रज्ञानाच्या उपयोगितेबद्दल अनेक शंका उपस्थित केल्या गेल्या. शास्त्रज्ञांच्या मतापेक्षाही इतरांची मतं महत्त्वाची मानली गेली. त्यातून मार्ग काढण्यासाठी खाद्यान्नाशिवाय अन्य पिकांमध्ये हे तंत्र आधी वापरून बघावं, असा निर्णय झाला. कापसामध्ये हे तंत्रज्ञान सर्वप्रथम वापरलं गेलं.

कापसाच्या पिकाला बोंडअळीचा मोठा त्रास होतो, हे आपल्याला माहिती आहे. ही अळी बोंडाच्या आतला भाग कुरतडून खाते आणि मोठं नुकसान करते. कापसाच्या जीएम बियाणात मात्र झाड जसजसं मोठं होत जातं, तसतसं द्रव्य त्या झाडामध्ये पसरत जातं. बोंडामध्ये जेव्हा अळी येते, तेव्हा या द्रव्यामुळे ती नष्ट होते आणि पीक वाचतं. तथाकथित पर्यावरणवादी आणि स्वयंसेवी संस्थांनी प्रसारमाध्यमातून या बियाणाविरुद्ध मोठा आवाज उठवला. पण, कापूस उत्पादक शेतकऱ्यानं मात्र आपलं हित

पाहिलं. मोठ्या प्रमाणावर बियाणाची खरेदी केली. शेतकऱ्याची अळीची भीती दूर झाली; त्याला उत्पादनाची हमी मिळाली. या बियाणामुळे शेतकऱ्याचा एकरी उत्पादनखर्च चार हजार रुपयांनी कमी झाला. आपल्याकडे आज कापसाचं ९४ टक्के उत्पादन जीएम बियाणाच्या माध्यमातूनच होतं. या बियाणामुळे देशातील कापूसउत्पादनात भरघोस वाढ झाली आहे. कापसाच्या उत्पादनात आपण जगात दुसऱ्या क्रमांकावर आहोत.

खाद्यान्नासाठी मात्र या प्रकारच्या बियाणाच्या वापराला आपल्याकडे आजही परवानगी नाही. या बियाणाविरोधात काहीजण सर्वोच्च न्यायालयात गेले तेव्हा न्यायालयाने कापूस सोडून अन्य कोणत्याही पिकासाठी हे बियाणं वापरू नये, असा आदेश दिला. बियाणं वापरण्याच्या मनाईपर्यंत ठीक होतं, पण न्यायालयाने या बियाण्याच्या संशोधनालाही बंदी घातली. भारतीय शास्त्रज्ञांनी जीएम तंत्रज्ञानामध्ये चांगली प्रगती केली होती. पण, न्यायालयाच्या निर्णयामुळे ते सर्व संशोधन शास्त्रज्ञांना अर्धवट सोडून द्यावं लागलं. या बियाणातून तयार करण्यात आलेली रोपंदेखील नष्ट करावी लागली. जगात कृषिक्षेत्रात निर्विवादपणे नंबर एक होण्याची क्षमता आपण त्यातून गमावली, असं कृषितज्ज्ञांचं मत आहे.

# विकासप्रक्रियेला गती अन्नप्रक्रियेने

# ४०

देशात गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित झालेल्या उद्योगक्षेत्रांमध्ये अन्नप्रक्रिया क्षेत्राचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीची (जीडीपी) क्षमता, रोजगाराच्या संधी आणि निर्यात या तीनही अंगांनी या क्षेत्राला देशाच्या दृष्टीने खूप महत्त्व आहे. २००४ ते १२ या सात वर्षांत या क्षेत्राचा वार्षिक सरासरी विकासदर ८.६ टक्के होता. कृषिक्षेत्राशी संबंधित असलेल्या क्षेत्राचा हा विकासदर कौतुकास्पद होता. कारण याच सात वर्षांत कृषिक्षेत्राचा वार्षिक सरासरी विकासदर ४ टक्के होता. कृषिउत्पादनांची नासाडी रोखण्यासाठी या क्षेत्राचा उपयोग होणार असल्याने अन्नप्रक्रिया उद्योगाच्या विकासामध्ये शेतकरी, प्रक्रिया उद्योजक आणि ग्राहक या तिघांचंही हित सामावलेलं आहे.

अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये २०११-१२ या वर्षांपर्यंत १७.७७ लाख लोकांना रोजगाराची संधी मिळाली होती. या विभागाची जबाबदारी श्री. शरद पवार यांच्याकडे असताना २००४ ते २०१२ या सात वर्षांच्या कालावधीत अन्नप्रक्रिया उद्योगात रोजगाराच्या संधी सरासरी ४.०९ दराने वाढत गेल्या होत्या. भांडवली गुंतवणुकीचा विचार केला तर याच काळात या उद्योगांमध्ये १९.७२ टक्क्यांनी वाढ झाली. अन्नप्रक्रिया उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी श्री. पवार यांच्याकडून वेगवेगळ्या उपाययोजना आखल्या जात असताना या क्षेत्राच्या निर्यातीमध्ये वार्षिक सरासरी २२.३ टक्क्यांनी वाढ झाली. आपल्या एकूण निर्यातीमध्ये या क्षेत्राने या काळामध्ये आपला वाटा अडीच टक्क्यांनी वाढवला. अन्नप्रक्रिया उद्योगाने याच काळात थेट परकीय गुंतवणूकही आकर्षित केली. २००० ते १२ या काळातील ११७ दशलक्ष अमेरिकन डॉलरची परकीय गुंतवणूक २०१३च्या डिसेंबर महिन्यापर्यंत ३.४६२ अब्ज अमेरिकन डॉलरची झाली होती.

हवामानाची, जमिनीची आणि पर्यावरणाची विविधता असलेल्या भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर, विविध प्रकारची कृषिउत्पादनं होऊ शकतात. या उत्पादनांच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीमध्ये यश मिळवल्यानंतर त्यावरील प्रक्रिया हा महत्त्वाचा टप्पा ठरतो. श्री. पवार यांच्या नेतृत्वाखाली

कृषि आणि अन्नप्रक्रिया उद्योग विभागाने त्यामुळेच या क्षेत्राच्या विकासासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करण्याचं ठरवलं होतं. त्याचाच भाग म्हणून देशामध्ये 'फूड पार्क' आणि 'मेगा फूड पार्क'ची उभारणी करण्याचं धोरण आखलं गेलं. केंद्रसरकारने आखलेल्या धोरणामध्ये अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्याची योजना होती. त्यानुसार २०८.५४४ कोटी रुपये खर्चाचे एकूण ५६ फूडपार्क उभारण्याचं उद्दीष्ट होतं. त्याअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या ४ हजार १५० भूखंडांपैकी २ हजार २१० भूखंडांचं वितरण २०१३ पर्यंत झालंही होतं.

सन २००८ मध्ये केंद्र सरकारने 'मेगा फूड पार्क'ची घोषणा केली. विशिष्ट कृषिउत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना एकाच ठिकाणी सामायिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची कल्पना त्यामध्ये होती. अशा पार्कमुळे ज्या भागामध्ये जी कृषिउत्पादनं मुबलक प्रमाणात होतात, त्याच भागामध्ये त्या उत्पादनावर प्रक्रिया होऊ शकते. त्यामुळे हाताळणीमध्ये होणारी कृषिउत्पादनांची नासाडी वाचते. कृषिउत्पादनांबरोबरच कोंबडी, प्राण्यांचं मांस, दूध तसंच मासे आदींची नासाडीही या प्रकारच्या प्रकल्पांमुळे कमी होऊ शकते. या प्रकल्पांसाठी केंद्रसरकारनं प्रकल्पखर्चाच्या ५० ते ७५ टक्के सवलत देऊ केली आहे.

'फूड पार्क' आणि 'मेगा फूड पार्क' यांबरोबरच शीतगृहांची साखळी उभारण्यालाही शरद पवार यांच्या काळात महत्त्व दिलं गेलं. अकराव्या आणि बाराव्या वित्तयोजनेमध्ये त्यासाठी मोठी तरतूद केली गेली. अकराव्या वित्तयोजनेमध्ये ७९ तर बाराव्या वित्तयोजनेमध्ये ७५ शीतगृहांना मंजुरी देण्यात आली. प्रत्यक्षात १२२ प्रकल्पांना अन्नप्रक्रिया उद्योगाने मदत केली. त्यातून फेब्रुवारी २०१४ पर्यंत १.९१ लाख मेट्रिक टन साठवणूक क्षमतेच्या शीतगृहाची तर प्रतिदिन ७९.०६ लाख लिटर क्षमतेच्या दुधाच्या साठवणुकीची सोय झाली.

अत्याधुनिक कत्तलखाने उभारण्यालाही याच काळात प्रोत्साहन दिलं गेलं. त्यामुळे चांगल्या प्रकारचं मांसोत्पादन आणि मांसनिर्यात शक्य झालं. फळं, भाजीपाला, मांस, अंडी, मासे आणि दूध अशा नाशवंत मालाचं नुकसान टाळण्यासाठी अन्नप्रक्रिया उद्योगांच्या आधुनिकीकरणाकडेही लक्ष दिलं गेलं. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाची नासाडी टळली पण, त्याचं मूल्यवर्धनही झालं. त्याचा फायदा उत्पादकांबरोबरच बाजारपेठेला, ग्राहकाला आणि निर्यातीच्या माध्यमातून परकीय चलन मिळवण्यासाठी देशालाही झाला.

# सहकारात सुधारणा | ४१

स्वातंत्र्यानंतर राज्यपद्धती म्हणून जसा आपण लोकशाहीचा स्वीकार केला, त्याचपद्धतीने सर्वसामान्य माणसाचा सहभाग असलेल्या आर्थिक रचनेचा शोधही सुरू केला होता. 'सहकारा'च्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेचा जन्म त्यातून झाला. देशाच्या मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणामध्ये बसेल, सर्वसामान्य माणूस जिथे मालक असेल आणि त्यातून त्याच्या लाभाचा प्राधान्याने विचार केला जाईल, अशा 'सहकार व्यवस्थे'ला सर्वाधिक सुपीक भूमी महाराष्ट्रात मिळाली. अनेक ध्येयवादी नेत्यांनी सहकाराची चळवळ रुजवली, वाढवली आणि त्यातून आपल्या परिसराचा विकास केला. ज्याला बाजारात पत नव्हती अशा समाजातील खालच्या थरातील व्यक्तीला सहकारानं पत मिळवून दिली. सहकारी संस्थांच्या माध्यमातून ठिकठिकाणी सामान्य माणसाला अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आणलं.

१९९० नंतर देशाने मुक्त अर्थव्यवस्थेचं धोरण स्वीकारलं. या धोरणाचा फायदा मोठ्या प्रमाणावर खाजगी क्षेत्राला होऊ लागला. देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असलेल्या सहकार क्षेत्रालाही त्याचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. त्यादृष्टीने १९९० पासून अनेक समित्या नेमल्या गेल्या. त्यांनी सुधारणा सुचवल्या. मात्र, देशपातळीवर त्या प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. आंध्रप्रदेश सरकारने १९९५ मध्ये 'म्युच्युअली एडेड को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट' अमलात आणला. त्यापाठोपाठ बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, ओरिसा, उत्तराखंड या राज्यांनी तशाच प्रकारचा कायदा केला. केंद्र सरकारने २००२ मध्ये सहकारक्षेत्रासाठी 'राष्ट्रीय धोरण' जाहीर केलं. सहकारी चळवळीमध्ये असलेला विभागीय असमतोल कमी करणं, सहकारासंबंधी प्रशिक्षण देणं, सभासदांना साक्षर करणं, सहकारामध्ये व्यावसायिकता आणणं या उद्देशांचा त्यात समावेश होता. या सर्व गोष्टी प्रत्यक्षात आणायच्या, तर त्यासाठी देशपातळीवर सहकारासंबंधी एक समान धोरण आणि कायदा असण्याची गरज होती. ती गरज ९७व्या

घटनादुरुस्तीने पूर्ण केली.

स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षं उलटून गेली तरी देशाच्या राज्यघटनेमध्ये 'सहकारा'चा समावेश झाला नव्हता. घटनेच्या भाग ४, अनुच्छेद ४३ मध्ये राज्यासंबंधी असलेल्या धोरणांच्या निदेशक तत्त्वांमध्ये (Directive Principle for State Policy) वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर कुटिरोद्योगांचं संवर्धन करण्यासाठी राज्यांना अधिकार देणारा उल्लेख आहे. दुसरा उल्लेख सातव्या अनुसूचीतील दुसऱ्या सूचीमध्ये ३२व्या क्रमांकाच्या राज्य सूचीमधील विषयात आहे. पण, तो पुरेसा स्पष्ट नाही. सहकाराला घटनात्मक दर्जा देण्याचा प्रयत्न २००४ मध्ये शरद पवार केंद्रीय मंत्री असताना झाला. २००४ मध्ये त्यांनी शिवाजीराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करून सहकाराला घटनात्मक दर्जा मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल टाकलं. या समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे श्री. पवार यांनीच घटनात्मक दुरुस्तीचं विधेयक मांडून सहकाराला घटनात्मक दर्जा दिला. एवढंच नव्हे, सहकारी संस्था स्थापन करण्याच्या हक्कांसाठी कलम १९(१)(सी) मध्ये 'को-ऑपरेटिव्ह' या शब्दाचा समावेश करून सहकारक्षेत्राबद्दल जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला.

विधेयक मांडताना श्री. पवार यांनी केलेलं प्रास्ताविक आणि चर्चेला दिलेलं उत्तर सहकार क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं होतं. सामान्य सभासदाचा सहकारी संस्थेतील सहभाग हा केवळ भांडवल गुंतवणुकीपुरताच मर्यादित नाही, तर संस्थेच्या प्रत्यक्ष व्यवसायात त्याचा सहभाग असणं हे फार महत्त्वाचं तत्त्व त्यातून त्यांनी स्पष्ट केलं. सहकाराच्या निकोप वाढीसाठी काही बाबतींत नियंत्रण आणि नियमनाची गरज होती, ती गरजही या विधेयकानं पूर्ण केली. सहकाराच्या माध्यमातून सुरू झालेल्या केंद्रीकरणाची कोंडी फोडली आणि सहकाराचा आत्मा असलेल्या विकेंद्रीकरणाची काळजी घेतली. 'विना सहकार-नाही उद्धार' ही घोषणा त्यामुळेच सामान्य माणसाच्या दृष्टीने खरी ठरली.

# क्रिकेटच्या मैदानात | ४२

२००१ साली शरद पवार मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष झाले. त्यापूर्वी ते गरवारे क्लब हाऊसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. 'शरद पवार आणि क्रिकेट' ही चर्चा प्रत्यक्षात २००१ पासून सुरु झाली असली तरी हे नातं खूप जुनं आहे. म्हणजे, गरवारे क्लब हाऊसचं अध्यक्ष झाल्यापासूनचं नाही; त्याही पूर्वीचं. त्यांच्या विवाहापासूनचं. भारताचे लेगस्पिनर सदू शिंदे यांची मुलगी प्रतिभा हिच्याशी १ ऑगस्ट १९६७ रोजी त्यांचा विवाह झाला, तेव्हापासूनच हे नातं घट्ट जुळलं असल्याचं क्रिकेटविश्वात गमतीने सांगितलं जातं.

शरद पवार यांचं क्रीडाप्रेम आपल्याला माहीत आहेच. कबड्डी, खो-खो, कुस्ती अशा देशी खेळांसाठी त्यांनी ३०-३५ वर्षं विविध माध्यमातून काम केल्यानंतर नव्या शतकामध्ये क्रिकेटच्या मैदानात प्रत्यक्ष प्रवेश केला. २००१ ते २०११ अशी तब्बल १० वर्षं ते मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होते. २०११ मध्ये ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यानंतर २०१३ पासून आजतागायत ते मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आहेत.

राज्याचे क्रीडाराज्यमंत्री असताना त्यांनी मुंबईत वानखेडे स्टेडियमच्या उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने आयोजित केलं जाणारं देशातलं हे सर्वात महत्त्वाचं स्टेडियम आहे. पूर्वीच्या ब्रेबॉर्न स्टेडियमच्या मर्यादा ओलांडून वानखेडे स्टेडियमनेच मुंबईला क्रिकेटच्या आंतरराष्ट्रीय नकाशावर आजपर्यंत कायम ठेवलं आहे. बदलतं क्रिकेट आणि नव तंत्रज्ञानानुसार वाढलेल्या गरजांचा विचार करून त्यांनीच २०११ मध्ये वानखेडे स्टेडियमचं आधुनिकीकरण घडवलं. अनेकांनी त्यात कोलदांडा घालण्याचा प्रयत्नही केला. पण शरद पवार यांनी त्यांच्या नेहमीच्या निर्धाराने हे काम पूर्ण केलं. २०११ मध्ये आपल्या देशात झालेल्या एकदिवसीय 'वर्ल्ड कप'च्या अंतिम सामन्याचं आयोजन त्यामुळेच वानखेडे स्टेडियमवर शक्य झालं. भारताने तो

अंतिम सामना आणि वर्ल्ड कप जिंकला!

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या घटनेनुसार खरं तर कोणालाही आठ वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्षपदी राहता येत नाही. पण, श्री. पवार यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनसाठी केलेल्या अद्वितीय कामाचा विचार करून असोसिएशनच्या सर्व सभसादांनी २०१० मध्ये श्री. पवार यांच्यासाठी आठ वर्षांची अट घटनेतून काढून टाकली आणि अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा त्यांच्यावरच सोपवली. मुंबई क्रिकेट असोसिएशन आणि गरवारे क्लब यांच्यात अनेक वर्षं उभा दावा होता. वर्षानुवर्षांचा हा वाद श्री.पवार यांनी अध्यक्षपदी आल्यानंतर मिटवून टाकला. त्यांच्याच काळात असोसिएशन आर्थिकदृष्ट्या सबल आणि खेळासाठी आवश्यक त्या सुविधांनी समृद्ध झाली. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या 'रिक्रिएशन सेंटर'ची उभारणी, असोसिएशनच्या वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील क्रीडासंकुलामध्ये 'इनडोअर ॲकेडमी' आणि कांदिवली येथे नव्या जिमखान्याची उभारणी श्री. पवार यांच्याच काळात झाली. त्यांनी नवोदित गरजू क्रिकेटपटूंसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. मुंबई क्रिकेट असोसिएशनशी संलग्न असणाऱ्या क्लबना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या संचित निधीची व्यवस्था त्यांच्यामुळेच झाली. वृद्ध क्रिकेटपटूंना मासिक निवृत्ती वेतन सुरू करण्याचा निर्णय तर क्रांतिकारक ठरला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या नियमावलीमध्ये जे खेळाडू पात्र ठरत नाहीत, अशा खेळाडूंना ही निवृत्तवेतन योजना लाभ देते. वयाच्या ५५व्या वर्षी दरमहा दहा हजार रुपयांनी सुरू होणारं निवृत्तीवेतन वयाच्या ७०व्या वर्षी वीस हजार रुपयांपर्यंत पोहोचतं.

क्रिकेटशी संबंधित निर्णय क्रिकेटपटूंनी घ्यावेत आणि खेळासाठी सुविधा निर्माण करण्याचं काम संघटकांनी करावं- श्री. पवार यांच्या मनात अशी स्पष्ट विभागणी असल्यानें खेळ आणि खेळासंबंधीच्या निर्णयामध्ये ते खेळाबाहेरील व्यक्तींना लुडबूड करू देत नाहीत. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी आल्याआल्याच त्यांनी नामवंत माजी खेळाडूंची 'क्रिकेट सुधार समिती' स्थापन केली. क्रिकेट प्रशिक्षकांची, खेळाडूंची निवड करण्याचे सर्व अधिकार त्या समितीला देऊन टाकले.

सन २००५ ते २००८ या तीन वर्षांसाठी त्यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाली. महिलांना सर्व क्षेत्रांत पुरेशी संधी मिळाली पाहिजे, हा आपला आग्रह त्यांनी क्रिकेटमध्येही कायम ठेवला. २००६ मध्ये 'महिला क्रिकेट'लाही भारतीय क्रिकेट नियामक

मंडळाच्या छत्राखाली आणलं. कसोटी क्रिकेटपटू, एकदिवसीय सामन्यात खेळलेले वृद्ध क्रिकेटपटू, निवृत्त कसोटी पंच आणि रणजी करंडक खेळलेल्या निवृत्त क्रिकेटपटूंसाठीही त्यांनी मासिक निवृत्तीवेतन सुरू केलं. निवृत्त कसोटी क्रिकेटपटू आणि निवृत्त कसोटी पंच यांचं निधन झालं तर त्यांच्या पत्नीलाही निवृत्तीवेतन मिळेल, अशी महत्त्वाची तरतूद आणि आर्थिक व्यवस्था त्यात आहे.

देशातील विविध राज्यांत असलेल्या क्रिकेट स्टेडियमचं आधुनिकीकरण किंवा त्यामध्ये नव्या सुविधा निर्माण करण्यासाठी दिलं जाणारं अनुदान श्री. पवार यांनी ४ कोटी रुपयांवरून थेट ५० कोटी रुपयांवर नेलं. २००८ मध्ये त्यांनी 'इंडियन प्रिमिअर लीग' या क्रीडाप्रेमींमध्ये लोकप्रिय ठरलेल्या आणखी एका स्पर्धेची सुरुवात केली. २०१० ते २०१२ या काळात ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीचे अध्यक्ष निवडले गेले. याच काळात २०११ मध्ये भारतामध्ये 'वर्ल्डकप'चं आयोजन केलं गेलं. त्यात भारत विजेता ठरला.

# आत्मविश्वासाचं पॅकेज

# ४३

कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं लोण इतरत्रही पसरू लागलं होतं. २००५ मध्ये ६०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. सन २००० पासूनच्या आत्महत्यांची एकूण संख्या अधिकृतरीत्या १ हजार ६०० वर पोहोचली होती. या आत्महत्यांबाबत संपूर्ण देशात एका बाजूला काळजी तर दुसऱ्या बाजूला क्षोभ व्यक्त होत होता. डिसेंबर २००५ मध्ये महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूरला झालेल्या अधिवेशनाचा मुख्य विषय 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' हाच होता. राज्य सरकारने अमरावती विभागातील अकोला, अमरावती, वाशिम, बुलडाणा आणि यवतमाळ; तसंच नागपूर विभागातील वर्धा या सहा जिल्ह्यांसाठी १ हजार ७५ कोटींचं विशेष पॅकेज मंजूर केल्याची घोषणा केली होती. पण, विधिमंडळाच्या सदस्यांचं समाधान तेवढ्यानं होत नव्हतं. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणं केवळ राज्यसरकारशी संबंधित नाहीत, केंद्रसरकारशी संबंधित विषयांचाही त्यात समावेश आहे. त्यामुळे, या भागाचा पंतप्रधानांनी दौरा करावा आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी अधिवेशनात होत होती.

पॅकेज जाहीर करूनही लोकप्रतिनिधींचं समाधान होत नाही हे पाहून राज्य सरकारने अखेर दौऱ्यासाठी पंतप्रधानांना विनंती करण्याचं मान्य केलं. श्री. शरद पवार त्यावेळी कृषिमंत्री होते. ३० जून आणि १ जुलै २००६ असे दोन दिवस पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग आणि श्री. पवार यांनी विदर्भाचा दौरा केला. ज्या गावातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या, त्यातल्या काही गावांना दोघांनीही भेटी दिल्या. डॉ. मनमोहनसिंग यांनी शेतकऱ्यांचं म्हणणं समजावून घेतलं, त्यांना काही प्रश्न विचारले. शेतकरी आणि पंतप्रधान यांच्यातील त्या थेट चर्चेत मध्यस्थ म्हणून श्री.पवार यांनी भूमिका बजावली. गावांना भेटी दिल्यानंतर पंतप्रधानांनी १ जुलै २००६ रोजी नागपूरच्या राजभवनामध्ये केंद्र आणि राज्यातले संबंधित विभागाचे मंत्री तसंच योजना आयोगाचे सदस्य आणि अधिकाऱ्यांसह

बैठक घेतली. परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. तिथेच 'विदर्भ पॅकेज' जाहीर करण्याचा निर्णय झाला.

साधारण ३ हजार कोटी रुपयांच्या या पॅकेजमध्ये शेतीकर्जाच्या व्याजमाफीसाठी ७१२ कोटी, शेतीकर्जाच्या ३ ते ५ वर्षं मुदतीच्या पुनर्रचनेसाठी १ हजार २९६ कोटी, सूक्ष्म सिंचनव्यवस्थेसाठी ७८ कोटी, लघु, मध्यम आणि मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी २ हजार १७७ कोटी, जलसंधारण योजनांसाठी २४० कोटी, राष्ट्रीय फलोत्पादन योजनेच्या अंमलबजावणीसाठी अनुदान म्हणून २२५ कोटी, शेतकऱ्यांना पशुपालनासाठी १३५ कोटी आणि कापसाच्या नव्या सुधारित बियाण्यांसाठी १८० कोटी रुपयांची तरतूद होती. या पॅकेजला राज्य सरकारच्या १ हजार ७५ कोटी रुपयांच्या पॅकेजची जोड होती. श्री. पवार यांनी महाराष्ट्राचे नेते आणि केंद्रातील कृषिमंत्री म्हणून हे सारं जुळवून आणलं होतं.

शेतकऱ्याला कर्जमुक्त करणं एवढंच या पॅकेजचं उद्दिष्ट नव्हतं. मदत देऊन शेतकऱ्याला परावलंबी किंवा उपकृत करण्याचा हेतू त्यामागे नव्हता. पॅकेजमधील आर्थिक तरतुदी आपण बारकाईनं पाहिल्या तर शेतीला नवसंजीवनी देण्याचा, शेतकऱ्याभोवतीचा कर्जाचा विळखा दूर करून शेतकऱ्याला शेतीसाठी, नव्यानं उभं राहण्यासाठी बळ देण्याचा या पॅकेजचा उद्देश होता, असं स्पष्टपणे जाणवतं. शेतकऱ्याला जर हे बळ मिळालं आणि तो नव्या उत्साहानं उत्पादक झाला तर तो आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत येईलच, शिवाय एकूण देशाची अर्थव्यवस्थाही सुधारेल, असा विचार त्यामागे होता. त्यामुळे, अनुत्पादक बाबींसाठी सवलती आणि मदत देण्यापेक्षा त्याला उत्पादनासाठी प्रोत्साहित करणं, स्वतःच्या पायावर उभं करून त्याला गमावलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवून देणं हे या पॅकेजचं मूळ उद्दिष्ट होतं. डॉ. मनमोहनसिंग आणि श्री. पवार या दोघांचाही दृष्टिकोन समान असल्यामुळे अशा प्रकारच्या पॅकेजची आखणी होऊ शकली. हेच पॅकेज नंतर कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि केरळमधल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांनाही लागू करण्याचा निर्णय झाला. महाराष्ट्रातल्या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये या पॅकेजची भरघोस मदत झाली.

# 'देवभूमी'ला नवसंजीवनी

# ४४

पर्यावरणासंबंधी आपण बोलतो खूप, वाचतोही खूप. पर्यावरणाचं आणि आपल्या जगण्याचं नातं काय हे अनेक वरवरच्या गोष्टीतून आपल्याला कळतही असतं. पण, पर्यावरणाच्या व्यवस्थापनाकडे नीट लक्ष दिलं नाही, तर एखाद्या प्रदेशातलं जीवन कसं उध्वस्त होतं, हे आपण प्रत्यक्ष पाहिलेलं नसतं. पर्यावरणाची हानी म्हणजे दुष्काळ किंवा पर्यावरणाची हानी म्हणजे कधीतरी येणारा महापूर हेच महाराष्ट्राला माहित आहे. पण, केरळसारख्या निसर्गसौंदर्याने संपन्न असलेल्या राज्यालाही पर्यावरणाच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष केल्याने कसा धडा मिळाला ते सांगितलं तर आपल्याला पर्यावरणाचं महत्त्व खऱ्या अर्थाने कळेल.

केरळ हे देशाच्या दक्षिण टोकाकडचं राज्य. पाऊस भरपूर. समुद्र किनाऱ्याने संपन्न. पण, याच केरळमधल्या कुट्टनाड प्रदेशाला पाण्याच्या समस्येने हैराण केलं. इतकं की, तिथे लोकांना जगणं असह्य झालं, शेती उध्वस्त झाली, मासेमारी संकटात आली, नारळाचं-केळीचं उत्पादन घटलं, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू झाल्या. पर्यावरण असंतुलनाने देशातल्या अनेक भागांचा प्रवास वेगवेगळ्या प्रकारच्या समस्यांकडे सुरू असताना कुट्टनाडच्या वाट्याला जे भोग आले, ते लक्षात घेऊन तातडीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याची गरज होती. खरंतर, प्रश्न एकूणच पर्यावरणाशी संबंधित असल्याने तो पर्यावरण मंत्रालय हाताळेल, असं म्हणून दुर्लक्ष करणं शक्य होतं. पण, पर्यावरण संतुलन ढासळलं तर पहिला बळी त्या प्रदेशातल्या जैवविविधतेचा जातो. ही जैवविविधता नष्ट झाली तर त्याचा परिणाम थेट शेतीवर होतो, हे शाश्वत सत्य आहे. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी म्हणूनच कुट्टनाडची जबाबदारी आपली मानली आणि त्या प्रदेशाच्या पर्यावरण, संवर्धन-सुरक्षेसाठी डॉ. स्वामीनाथन् यांच्या नेतृत्त्वाखाली एका अभ्यासगटाची नियुक्ती केली. त्यांनी केलेल्या शिफारशी स्वीकारल्या. कुट्टनाडच्या पुनरुज्जीवनासाठी तब्बल १ हजार ८०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला.

कुट्टनाड म्हणजे अलप्पुझा, कोट्टयम आणि पथनामथिट्टा या तीन जिल्ह्यांचा मिळून बनलेला प्रदेश. अलप्पुझा जिल्ह्याचा ५७ टक्के, कोट्टयम जिल्ह्याचा ३० टक्के आणि पथनामथिट्टा जिल्ह्याचा १३ टक्के भाग कुट्टनाड प्रदेशात येतो. भरपूर पावसाचा, पाणथळ जमीन असलेला, निसर्गसंपन्न आणि तरीही कमालीचं दारिद्र्य असलेला हा भाग. समुद्रसपाटीपासून २ मीटर खोल असलेल्या या भागात भातशेती, नारळ आणि केळी ही मुख्य पीकं. केरळमधील सर्वाधिक घनदाट लोकवस्ती याच भागात. ८० टक्के लोक शेतीवर अवलंबून. पण, अल्पभूधारक शेतकरी ९५ टक्के. ३ टक्के शेतकऱ्यांची जमीन एक हेक्टरपेक्षा कमी. उर्वरीत ९७ टक्क्यांची ०.४ हेक्टरपेक्षाही कमी. त्यामुळे, अनेक ठिकणी सामुहित शेतीच्या प्रयोगाला सुरूवात झालेली. अल्पभूधारक शेतकरी, भूमीहिन शेतमजूर आणि मच्छिमारांचं उत्पन्नाचं साधन म्हणजे या पाणथळ जमीनीतला भात आणि मत्स्यतळ्यातले मासे. एकेकाळी याचंही उत्पन्न खूप होतं. कुट्टनाड प्रदेश भाताचं आगर म्हणून ओळखला जात होता. तळ्यातील मोठी कोळंबी अर्थव्यवस्थेला हातभार लावत होती. पण, गेल्या काही वर्षांत हे सुखासीन चित्र झपाट्याने बदलत गेलं.

समुद्राचं पाणी शिरल्याने जमीनीतले क्षार वाढत गेले. त्यामुळे, भाताच्या उत्पादनात घट होत गेली. नद्यांचे महापूर आणि समुद्राची भरती यांना नियंत्रित करणारा वेंबनाड नावाचा मोठा जलाशय हळूहळू आक्रसू लागला. भरत गेलेल्या गाळाने त्याची क्षमता ७८ टक्के कमी झाली. पाण्यावर पसरलेल्या जलपर्णी आणि विविध प्रकारच्या वनस्पतींनी सूर्यप्रकाश थेट पाण्यामध्ये उतरण्याला अडथळा निर्माण केला. परिणामी, माशांचं उत्पादन घटलं, माशांची वाढ खुंटली. या जलाशयाभोवती अतिक्रमणं वाढत चालली. बांधकामाबरोबरच भातशेतीही जलाशयाचं क्षेत्र कमी करु लागली. या जलाशयामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असत. त्यांच्या बेबंद वागण्याने आणि जलाशयाच्या किनाऱ्याची धूप होणार नाही, याची काळजी न घेतल्याने जलाशयाच्या कडा ढासळू लागल्या.

जलाशय आक्रसू लागल्याने भरतीचं पाणी इतर भागात शिरू लागलं. सुमारे १२ हजार हेक्टर शेतीचं त्यामुळे नुकसान झालं. मुळातच पाऊस जास्त असल्याने आणि आता भरतीचं पाणीही घुसू लागल्याने शेतात पाणी राहण्याचं आणि किंवा ते वाहत राहाण्याचं प्रमाण वाढू लागलं. शेतजमिनीतले सेंद्रीय घटक आणि खतं वाहून जाऊ लागली. शेतजमिनीच्या नुकसानीत आणखी भर पडली. या सगळ्याचा परिणाम

उत्पादन खर्च वाढण्यात झाला, उत्पन्न कमी आणि नुकसान जास्त होत गेल्याने शेतकरी कर्जबाजारी झाले.

पर्यावरणाच्या या नुकसानीने या भागात आढळणाऱ्या माशांच्या २३ जाती नष्ट झाल्या. स्थलांतरीत होऊन येणाऱ्या १३ जातींच्या माशांनी आपलं स्थलांतर थांबवलं. पक्षांच्या ३३ टक्के जातींचं अपरिमित नुकसान झालं. मोठे पक्षी कमी झाल्यामुळे सरपटणारे प्राणी वाढले. उंदीर, घुशींनी हैदोस घातला. जलजन्य रोग आणि उंदीर, घुशींमुळे फैलावणाऱ्या साथींनी कुट्टनाड प्रदेशातील जनतेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाले. त्याचाही खर्च वाढला. शेतीबरोबर बदक पालनासारख्या जोडधंद्यावरही विपरीत परिणाम झाला.

विकासाच्या नव्या निकषांनुसार परिसरात मोठ्या प्रमाणावर रस्तेबांधणी झाली. पण, ही रस्तेबांधणीही पर्यावरणाचा विचार न करता झाल्याने अनेक ठिकाणी मातीचे चुकीचे भराव पडले, रस्ते झाले. त्यामुळे, पाण्याचे प्रवाह खंडित झाले. १९६७ मध्ये ६० हजार ९२१ हेक्टरवर असलेली भातशेती २००३ मध्ये ३७ हजार ६२४ हेक्टरवर आली. केरळच्या एकूण भातशेतीपैकी ३७ टक्के भातशेती कुट्टनाड प्रदेशात होती. २००३ मध्ये तिचं प्रमाण १८ टक्क्यांवर आलं.

पर्यावरणाचा हा ऱ्हास रोखण्यासाठी आणि तिथल्या जनजीवनाला बळ देण्यासाठी श्री.पवार यांनी विशेष योजना मंजूर केली. केंद्रीय कृषि खात्यामार्फत राबविल्या गेलेल्या या योजनेतून पूर व्यवस्थापन, शेतातील अतिरिक्त पाणी आणि भरतीच्या क्षारयुक्त पाण्याच्या निचऱ्यासाठी नाल्यांचं जाळं, अस्तित्वात असलेल्या नाल्यांचं रुंदीकरण-खोलीकरण, घरांतील सांडपाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त योजना, याशिवाय भातशेतीसाठी चांगल्या दर्जाच्या बियाणांचं वाटप, नारळाच्या झाडावर आलेल्या रोगावर उपाययोजना, नवीन, चांगल्या जातीच्या रोपांचं वाटप, भातशेती आणि समुद्राचं पाणी यामध्ये अडथळा म्हणून खारफुटीच्या जंगलाची निर्मिती आदी उपाययोजनांचा समावेश आहे.

योजना मंजूर झाल्यापासून अनेक उपाययोजना प्रत्यक्षात आल्या. शेतीचं नुकसान कमी होत गेलं. भाताचं उत्पादन वाढत गेलं. समुद्राच्या भरतीपासून तिथल्या गावांना, शेतीला संरक्षण मिळालं. पर्यावरण सुधारू लागलं. वेळीच जागं होऊन केलेल्या या उपाययोजनामुळे तिथल्या जगण्याला पुन्हा उभारी आली.

# औषधनीती ४५

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची काम करण्याची एक विशिष्ट पद्धत होती. कोणत्याही विषयाचा निर्णय आपल्या मंत्रिमंडळामध्ये सखोल आणि साधकबाधक चर्चा होऊनच घेतला जावा, यासाठी त्यांनी मंत्रिगटांची रचना स्वीकारली होती. ज्या विषयांमध्ये देशात किंवा जगभर वेगवेगळे मतप्रवाह आहेत, त्या विषयांबाबत निर्णय घेताना तो अचूक असावा, असा निर्णय घेताना प्रशासनातील जाणकार किंवा त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेता यावी यासाठी या मंत्रिगटांची स्थापना खास करून केली जात असे. डॉ. मनमोहनसिंग यांच्या काळात असे पन्नासपेक्षा अधिक मंत्रिगट कार्यरत होते. त्यातल्या बहुसंख्य मंत्रिगटांचं अध्यक्षपद मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री प्रणब मुखर्जी आणि शरद पवार यांच्याकडे असे. 'या मंत्रिगटांमुळे प्रशासनाची गुणवत्ता उंचावली आणि धोरण निश्चितीमध्ये अधिक प्रागतिकता, वास्तवता आली. मंत्रिमंडळाच्या नेहमीच्या बैठकांमध्ये केवळ चर्चा करून होणाऱ्या निर्णयांपेक्षा कितीतरी अधिक परिपूर्ण निर्णय या व्यवस्थेमुळे शक्य झाले', असं श्री. पवार यांचं मत आहे.

औषध धोरणासंबंधीच्या मंत्रिगटाचं प्रमुखपद डॉ. मनमोहनसिंग यांनी श्री. पवार यांच्याकडे सोपवलं होतं. जागतिकीकरणानंतर औषधनिर्माण क्षेत्रासंबंधी दिशादर्शक धोरण आखण्याची गरज होती. भारतीय औषध कंपन्यांची जागतिक बाजारपेठेत विश्वासार्हता निर्माण करण्याची आणि विस्तारण्याची क्षमता होती. किंबहुना अनेक मोठ्या देशांतील जेनरिक औषधांची गरज भारतातील औषध कंपन्याच भागवत होत्या. त्यामध्ये परकीय गुंतवणूक झाली असती तर आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचं स्थान अधिक भक्कम झालं असतं. भारतातही या क्षेत्रातील संशोधनाला चालना देण्याची गरज होती. सर्वांगीण स्वतंत्र औषध धोरण ठरविण्यासाठी नेमलेल्या मंत्रीगटापुढे हे महत्त्वाचे विषय होते.

याशिवाय आपल्या देशासाठी औषध धोरण ठरवताना औषधाच्या किमती, त्यांचा दर्जा, उत्पादकांचं हित आणि संशोधनाच्या शक्यता या

महत्त्वाच्या बाबींवर विचार करणं आवश्यक होतं. औषधाच्या किमतीबाबत स्वयंसेवी संस्था आणि माध्यमं अतिशय संवेदनशील होती. औषधांच्या संशोधनामध्ये वाढ करायची तर तो संशोधनखर्च औषधांच्या उत्पादन किमतीमध्ये समाविष्ट करण्याची परवानगी देणं आवश्यक होतं. मात्र त्याला ग्राहकहितासाठी लढणाऱ्या स्वयंसेवी गटांचा तीव्र विरोध होता. त्यातून मार्ग काढण्याचं अवघड काम मंत्रिगटाचे प्रमुख म्हणून श्री. पवार यांनाच करावं लागलं. औषधाच्या संदर्भातील संशोधन आणि त्या व्यवसायाला असलेल्या विस्ताराच्या संधी डोळ्यासमोर ठेवून मंत्रिगटानं निर्णय घेतले आणि सरकारनं ते अमलातही आणले. त्याचा फायदा भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्यासाठी झाला.

# दुधाचा महापूर | ४६

पुराणातल्या सगळ्या गोष्टींमध्ये कुठे ना कुठे पशुधनाचा उल्लेख असतोच. पशुधनाच्या बाबतीत भारत पुराणकाळापासून संपन्न होता. पुढच्या काळात या पशुधनाकडे नीट लक्ष न दिल्याने, वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवताना पशुधनाच्या बाबतीत हवं तेवढं शास्त्रीय संशोधन न झाल्याने भारत पशुधनाच्या बाबतीत कंगाल होत चालला. आपल्या दुधाच्या गरजा पुरेशा भागत नव्हत्या. त्यामुळे, दूध, अंडी आणि तत्सम पदार्थांचं खाण्याचं दरडोई प्रमाण खूप कमी होतं. कृषिखात्याबरोबरच पशुपालन खात्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर शरद पवार यांनी आपल्या खात्याचा आढावा घ्यायला यादृष्टीने सुरुवात केली आणि पशुपालन तसंच त्यापासून मिळणाऱ्या उत्पादनांच्या वाढीच्या बाबतीत कृतिआराखडा तयार केला.

२०१३ मध्ये राष्ट्रीय पशुधन विकास धोरण तयार केलं गेलं. दुधाचं उत्पादन आणि जनावरांची उत्पादकता वाढवण्यासाठी दूधउत्पादक उद्योजकता विकास योजना, सकस आणि शुद्ध दुधाच्या उत्पादनासाठी पायाभूत सुविधांच्या क्षमतेत वाढ, राष्ट्रीय दुग्धोत्पादन व गोवंश विकास आराखडा असे विविध कार्यक्रम आखून या क्षेत्राच्या विकासाला मोठीच गती दिली. मध्यम आणि अल्पभूधारक तसंच भूमिहीन ग्रामीण शेतमजुरांना या योजनांचा खूप लाभ झाला. या काळात देशात विविध प्रकारचं पशुधन असलेल्या घरांची संख्या सत्तर दशलक्षपर्यंत पोहोचली. सहकारी दूधसंकलन संस्थांचं जाळंही या काळात चांगलं विस्तारलं. २०१२-१३ अखेर देशातील गावपातळीवरच्या दूधसंकलन संस्थांची संख्या १ लाख ५५ हजार ६३४ वर गेली. या संस्थांनी १५.११५ दशलक्ष दूधउत्पादक सदस्यांकडून दूधसंकलन केलं. आधीच्या ९ वर्षांच्या तुलनेत ही वाढ ४७ हजार ६० दूधसंकलन संस्था आणि ३.१२१ दशलक्ष दूधउत्पादक एवढी अधिक आहे. पशुपालन, दुग्धोत्पादन आणि मत्स्यपालन या क्षेत्राचा या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा होता. सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) या क्षेत्राचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत गेला.

गायी-म्हशींच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी उत्तम प्रजोत्पादन

आवश्यक असतं. त्यासाठी कृत्रिम रेतन पद्धतीच्या प्रचार आणि प्रसाराचा कार्यक्रम प्रथम हाती घेतला गेला. पशुपालकांना उत्तम वळूंचे रेतन उपलब्ध व्हावे यासाठी देशात ४९ 'रेतन बँकां'ना त्यांच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी १५६ कोटी रुपये उपलब्ध करून दिले गेले. त्याचा परिणाम म्हणून कृत्रिम रेतनासाठीच्या डोसनिर्मितीमध्ये दरवर्षी ४१ दशलक्षावरून ७७ दशलक्ष डोसपर्यंत वाढ झाली. गायींच्या गर्भार राहण्याचं प्रमाण २००४ ते १३ या काळात २० टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर गेलं. कृत्रिम रेतनाची सुविधा देणाऱ्या २७ हजार ६४६ खासगी केंद्रांची देशात उभारणी केली गेली. शेळीच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी काश्मीर, हिमाचलप्रदेश, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये याच पद्धतीच्या अत्याधुनिक सुविधांची केंद्रं उभारली गेली. जनावरांच्या चांगल्या प्रतीच्या चाऱ्यांच्या जाती निवडून त्यांचा प्रसार केला गेला. चाऱ्याच्या चांगल्या जातींच्या संशोधनावर भर दिला गेला.

२००४ ते २०१३ या दहा वर्षांच्या काळात देशात दुधाचा अक्षरश: महापूर आला. याच काळात देशातील काही भाग दुष्काळाच्या सलग वर्षांनी हैराण झाला होता. उत्तरेत आणि दक्षिणेत अनेक राज्यांमध्ये अतिवृष्टी झाली, वादळं आली. या सगळ्या नैसर्गिक आपत्तींची झळ पशुधनाला बसली. अनेक ठिकाणी पशुधनाचा विध्वंस झाला. तरीही याच काळात भारतातील दुधाचं वार्षिक उत्पादन ४० दशलक्ष टनांनी वाढलं. अमेरिकेत याच काळात दुधाचं वार्षिक उत्पादन १३ दशलक्ष टनांनी, चीनमध्ये २३ दशलक्ष टनांनी, न्यूझीलंडमध्ये ५ दशलक्ष टनांनी तर युरोपीय देशांमध्ये ते ०.४ दशलक्ष टनांनी वाढलं होतं. जगातल्या प्रगत आणि पशुधनाबाबतीत अग्रेसर असलेल्या देशांमधील हे आकडे पाहिले की, भारताच्या या काळातील प्रगतीचं महत्त्व लक्षात येतं.

सन २००४-०५ मध्ये भारतात दुधाचं वार्षिक उत्पादन ९२.५० दशलक्ष टन होतं. ते २०१२-१३ मध्ये १३२.४३ दशलक्ष टन झालं. ही वाढ तब्बल ४३.१ टक्के आहे. उत्पादनात वाढ झाल्याने दुधाची देशातील दरडोई उपलब्धता वाढली. २००३-०४ मध्ये ती प्रतिदिन २२५ ग्रॅम होती. २०११-१२ मध्ये ती प्रतिदिन २९० ग्रॅम झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या सुधारलेल्या या प्रतिमेचा उपयोग झाला. देशातील नागरिकांच्या, विशेषत: लहान मुलांच्या सकस आहारात त्यामुळे चांगली वाढ झाली. त्याचा मुलांच्या संगोपनावर, आरोग्यावर सकारात्मक परिणाम झाला.

# मासोळी लकाकली | ४७

भारताला तब्बल ७ हजार ५१७ किलोमीटरचा लांबलचक समुद्रकिनारा लाभला आहे. देशाच्या तीनही बाजूंनी समुद्र आहे. त्यामुळे, खरं तर देशाकडे सागरसंपत्तीची अमाप क्षमता आहे. पण, त्याकडे कधी गांभीर्याने पाहिलं गेलं नाही. शरद पवार यांनी २००४ मध्ये केंद्र सरकारच्या मत्स्यव्यवसाय विकास खात्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर विभागाच्या धोरण आणि कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल केला. त्याचा परिणाम म्हणून आज भारत मत्स्योत्पादनामध्ये जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील एकूण मत्स्योत्पादनाच्या ५.४ टक्के मत्स्योत्पादन भारताचं आहे.

२००४-०५ मध्ये देशाचं मत्स्योत्पादन ६ दशलक्ष टन होतं. २०१२-१३ मध्ये ते ९.०४ दशलक्ष टनावर पोहोचलं. ही वाढ तब्बल ४३ टक्के झाली. मत्स्योत्पादनात वाढ झाल्यामुळे त्याच्या निर्यातीतही भरीव वाढ झाली. नऊ वर्षांत ही निर्यात सहा दशलक्ष टनावरून ९.२८ दशलक्ष टनांवर गेली. सन २००४-०५ पासून देशात १ लाख ५५ हजार ३७२ हेक्टरवर मत्स्यतळी विकसित केली गेली. त्याचा फायदा तब्बल २ लाख ४३ हजार मच्छीमार आणि मत्स्योत्पादकांचा झाला.

मत्स्योत्पादनाच्या वाढीसाठी उत्तम मत्स्यबीजाची गरज असते. मत्स्यव्यवसाय विकास विभागाने आपल्या मत्स्योत्पादन वाढीच्या कार्यक्रमाची सुरुवातच तिथून केली. २००४ ते २०१३ या काळात देशातील उपलब्ध मत्स्यबीज २० हजार ७९० दशलक्ष फ्रायवरून (मत्स्यबीजाचं मापक) ३४ हजार ९२२ दशलक्ष फ्रायवर पोहोचलं. ही वाढ तब्बल ६७ टक्के होती.

मत्स्योत्पादन वाढीच्या कार्यक्रमामध्ये मच्छिमारांच्या सुविधा आणि त्यांची सुरक्षा यालाही अर्थातच महत्त्व होतं. सरकारने त्यांच्या प्रश्नांकडे, सुविधांकडे आणि सुरक्षेकडे प्राधान्याने लक्ष दिलं. ४३ लाख २५ हजार ६९२ मच्छिमारांना अपघात विम्याचं संरक्षण दिलं गेलं. त्यांच्या विम्याच्या रकमेत एक लाखावरून दोन लाखांपर्यंत वाढ करण्यात आली.

मच्छिमारांसाठी ७४ हजार ४६८ घरं बांधण्यात आली. १ लाख ६८ हजार ६४२ मत्स्योत्पादकांना मत्स्यतळ्यांसाठी जागेची निवड, त्यांचं बांधकाम आणि पुढील हाताळणीचं प्रशिक्षण दिलं गेलं. एकूण ५९ ठिकाणी मच्छिमारांच्या सोयीसाठी छोट्या बंदरांची उभारणी करण्यात आली. १५ हजार ४४० पारंपरिक मच्छिमार नौकांचं यांत्रिकीकरण करण्यात आलं. पाच हजार नव्या नौका पुरवण्यात आल्या.

या सर्व प्रयत्नांचा परिणाम निश्चितच देशाच्या मत्स्योत्पादनाच्या वाढीत झाला. भारत आज जगात चीनखालोखाल मत्स्योत्पादन करणारा सर्वात मोठा देश ठरला आहे.

# अंडी आणि कोंबडी

# ४८

कुक्कुटपालन हा जसा स्वतंत्र व्यवसाय आहे, तसाच तो शेतकऱ्याला शेती किंवा पशुपालन करताना सहजपणे उत्पन्नाची जोड देणारा व्यवसाय आहे. भारतीय शेतकऱ्याला सक्षम करण्यासाठी शेतीच्या जोडधंद्याच्या यादीत कुक्कुटपालनाला महत्त्व देण्यात आलं आहे. अंडी आणि मांस अशा दोन्ही हेतूंनी हे कुक्कुटपालन सहजपणे होऊ शकतं.

दहाव्या आणि अकराव्या वित्तयोजनेत कुक्कुटपालनासाठी अनुक्रमे ७ हजार ८१५ आणि ४ हजार ९७६ लक्ष रुपये उपलब्ध करून देण्यात आले. त्यातून अनुक्रमे १६० आणि ४६ राज्य कुक्कुटपालन प्रकल्पांचं सक्षमीकरण झालं. २००९–१० पासून कुक्कुटपालन विकास योजना राबवण्यात आली. व्यावसायिक कुक्कुटपालन आणि परसातील कुक्कुटपालन या दोन्हींसाठी ही योजना आखण्यात आली होती. परसातील कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी अकराव्या वित्तयोजनेतून ६,७३८ लाख रुपये खर्च करण्यात आले. शरद पवार यांच्या कार्यकाळातील अखेरच्या पाच वर्षांत दारिद्र्यरेषेखालील लाभार्थींसाठी याच योजनेतून ६.१३ लाख रुपये उपलब्ध करून देण्यात आले. ओडिशा आणि सिक्कीम या दोन राज्यांमध्ये 'पोल्ट्री इस्टेट्स' उभारण्यात आल्या. कुक्कुटपालनातील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी २०११–१२ मध्ये 'कुक्कुटपालन प्रकल्पनिधी'ची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. त्यातून देशभरात २ हजार ६६६ कुक्कुटपालन प्रकल्पांना मदत केली गेली.

देशामध्ये असणाऱ्या मांसाहारींची अन्नाची गरज भागवण्यासाठी मत्स्योत्पादन, कुक्कुटपालन आणि पशुपालन या तीनही गोष्टींना महत्त्व आहे. त्यामुळे, या क्षेत्राच्या आधुनिकीकरण आणि वाढीसाठी उत्पादकांच्या संघटना स्थापन करणं, त्यांच्यासाठी प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करणं, आदर्श प्रकल्पांना भेटी आयोजित करणं, तसंच त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रदर्शनं आणि मेळे आयोजित करणं यासारख्या उपक्रमांवर भर देण्यात आला. त्यातून निर्माण झालेल्या

उत्पादनांनी देशातील जनतेच्या आहारातील प्रथिनांची गरज मोठ्या प्रमाणावर भागवली गेली. मुबलक आणि परवडणाऱ्या किमतीत उत्पादनं उपलब्ध झाल्यामुळे लोकांच्या आहारात त्याचा सहजपणे समावेश झाला. आहारातील उष्मांकांची गरज त्यामुळे भागवली गेली. या तीनही क्षेत्रांमध्ये झालेल्या उत्पादनवाढीमुळे तसंच उत्पादनाच्या गुणवत्तावाढीमुळे देशाच्या अन्नसुरक्षेला मोठा हातभार लागला.

अंड्यांमधील प्रथिनं आणि अंड्यांचं सकस आहारातील महत्त्व लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी केंद्रीय दुग्धोत्पादन, पशुपालन आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाने पहिल्यांदाच ११ ऑक्टोबर २०१३ रोजी 'जागतिक अंडे दिन' (वर्ल्ड एग डे) साजरा केला. त्यानिमित्तानं 'एग व्हेंडिग मशीन'चा प्रयोग चंदीगढ येथील केंद्रीय कुक्कुटपालन विकास संस्थेत केला गेला. अंडी, कोंबडी तसंच खाद्यान्नासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या प्राण्यांचं आरोग्य खाणाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचं असतं. त्यामुळे मांसाहारासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या प्राण्यांच्या आरोग्याची 'विशेष जागृती मोहीम' विभागानं राबवली. देशाच्या उत्तर-पश्चिम विभागात वराहपालन तसंच काही ठिकाणी होणाऱ्या ससेपालनासाठीही याच प्रकारच्या अनेक योजना राबवल्या गेल्या.

# बालकामगारांची मुक्तता | ४९

जरी कामाच्या कारखान्यात काम करणाऱ्या एका लहान मुलाची काहीतरी चूक झाली. शिक्षा म्हणून त्याच्या मालकाने त्याला चटके दिले. अंगावर गरम तेल ओतलं! त्या लहान मुलाचा त्यात मृत्यू झाला. वृत्तपत्रामध्ये बातम्या आल्या. बालमजुरांसाठी काम करणाऱ्या 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांचं लक्ष या घटनेकडे गेलं. संस्थेने तोपर्यंत मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये सर्वेक्षण करून साडेचार हजार बालमजुरांची नोंद केली होती. बालमजुरांचं हे अस्तित्व मानायला राज्य सरकार तयार नव्हतं. मालकाने अत्याचार केल्याने बालमजूराचा मृत्यू झाल्याने बालमजुरीच्या प्रश्नाचं गांभीर्य अचानक वाढलं. श्री. शरद पवार तेव्हा केंद्रात मंत्री होते. पण, योगायोगाने त्यावेळी मुंबईतच होते. 'प्रथम'च्या कार्यकर्त्यांनी त्यांना गाठलं आणि प्रश्न समजावून सांगितला. श्री. पवार यांनी तिथल्या तिथे तेव्हाचे उपमुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री आर.आर. पाटील यांना फोन केला. त्यांना भेटीला बोलावून घेतलं. मुंबईतील बालमजुरी आणि बालमजुरीच्या प्रश्नाचे कंगोरे त्यांना समजावून सांगितले. पाटील यांनीही ते मनावर घेतलं. अधिकाऱ्यांना आदेश दिले.

चक्रं फिरू लागली. पोलीसांची धाडसत्रं सुरू झाली. धारावीत पहिल्याच धाडीमध्ये पोलीसांच्या हाती साडेचारशे बालमजूर लागले. सरकारी यंत्रणेला प्रश्न समजावून सांगण्याची आता गरज राहिली नाही. केवळ जेवण-खाण्यावर, पगाराविना कंत्राटदारांनी आणलेल्या गरिबांच्या मुलांची त्या नरकयातनेतून आणि शोषणातून मुक्ती करण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणांनी स्वीकारली. गृहमंत्री पाटील प्रत्येक कारवाईचा आढावा घेत होते. काही ठिकाणी स्वतः जात होते. पोलीसांनी बालमजूर म्हणून पकडले तरी त्या मुलांचं पुढे काय? असा प्रश्न होता. एक तर त्यांना घरी पोहोचवणं आवश्यक होतं, आणि ज्यांच्या बाबतीत ते शक्य नव्हतं, त्यांना बालसुधारगृहात ठेवून त्यांचं शिक्षण पूर्ण करणं आवश्यक होतं. या दोन्हींसाठी राज्य सरकारचे पैसे खर्च होणार होते. पकडल्या गेलेल्या

मुलांपैकी बहुतांश मुलं बिहार, उत्तरप्रदेश किंवा तत्सम अन्य राज्यांतलीच होती. त्या मुलांसाठी राज्य सरकारने किती पैसे खर्च करायचे? असा प्रश्न विचारला जाऊ लागला होता. श्री. पवार यांची भूमिका ठाम होती. मुलं कुठल्या राज्यातली आहेत, हा प्रश्न नाही. ती सगळी दुर्दैवी मुलं 'आपली', 'भारतीय' आहेत. कोणी त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी घेत नसेल, तर ती आपण घेऊ, अशी भूमिका त्यांनी घेतल्या नंतर राज्य सरकारने तीच भूमिका घेतली.

श्री. पवार एवढ्यावर थांबले नाहीत. त्यांनी बिहारचे नेते लालूप्रसाद यादव यांची आणि मुंबईतल्या कार्यकर्त्यांची भेट घडवून दिली. श्री. यादव यांच्यामार्फत बिहारच्या खासदारांची बैठक घेतली आणि त्यांना बालमजुरीचा हा प्रश्न समजावून सांगितला. त्यामुळे, त्यांचाही या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.

पुढे बालमजुरांच्या सुटकेसाठी राज्य सरकारने 'टास्क फोर्स' स्थापन केला. राज्य सरकारचाही प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. बालमजुरांचा प्रश्न सरकारच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमावर आला. 'पोलीसांनी बालमजूर पकडले' अशा बातम्या प्रसिद्ध व्हायला लागल्यानंतर गृहमंत्री म्हणून पाटील यांनी त्यातही लक्ष घातलं, वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यांचा दृष्टिकोन बदलला. त्यांनरतच्या बातम्यांची शिर्षकं 'बालमजुरांची सुटका' किंवा 'कंत्राटदार, मालकांना पकडले' अशी झाली. बालमजूर मुक्तीची सरकारची एक पद्धत आकाराला आली. हीच पद्धत नंतर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयानेही स्वीकारली. २००५ ते २००७ या अवघ्या दोन वर्षांत मुंबईतून ६० हजार बालमजुरांची मुक्तता झाली!

तीनचार महिन्यांपूर्वी 'प्रथम'ने देशातील रेल्वेस्थानकांवरील अनाथ, निराश्रित मुलांचं सर्वेक्षण केलं. तो प्रश्न घेऊन कार्यकर्ते पुन्हा श्री. पवार यांना भेटले. श्री. पवार यांनी रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांच्याशी लगेच दूरध्वनीवरून चर्चा केली. कार्यकर्ते आणि रेल्वे प्रशासक यांच्यात संवाद सुरू करून दिला. त्यातून या मुलांचे प्रश्न सुटायला मदत होईल. मुंबईत आता जरीकामाच्या कारखान्यामध्ये बालमजूर नाहीत. पूर्वी सिग्नलवर दिसणाऱ्या, देवळांबाहेर भेटणाऱ्या भिकारी लहान मुलांची संख्याही खूप कमी झालेली आहे.

आयुष्यातली सलग पन्नास वर्षं कोणत्या ना कोणत्या कायदेमंडळाचे

सदस्य असलेल्या श्री. पवार यांनी आपली कायदेमंडळातील जबाबदारी कधीच दुय्यम मानली नाही. ते कधीही केवळ 'राजकारणी' राहिले नाहीत. दिल्लीतील निर्भया बलात्कार प्रकरणानंतर बालगुन्हेगारांचं वय १८ वरून १६ वर आणण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाबाबत देशातील काही स्वयंसेवी संस्थांचं मत वेगळं होतं. त्यांनी श्री. पवार यांच्याशी संपर्क साधला. श्री. पवार यांनी आपली अन्य कामं बाजूला ठेवून प्रस्थापित विधेयकाचा मसुदा बारकाईनं वाचला, त्यावर विचारविनिमय केला. राजकारणापलिकडे जाऊन सामाजिक प्रश्नांशी असलेली त्यांची बांधिलकी हा त्यामुळेच विविध क्षेत्रांत सामाजिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने आदराचा भाग आहे.

# नव्या युगाची आस

# ५०

अंगरक्षकांनी झाडलेल्या गोळ्यांनी १९८४ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा दुर्दैवी शेवट झाला. देशाला सुन्न करून टाकणाऱ्या, अवचित घडलेल्या या दुर्घटनेनंतर अनेक घडामोडी वेगानं घडत गेल्या. राजीव गांधी यांची पंतप्रधान म्हणून झालेली निवड हा त्या घडामोडींचा एक भाग होता. राजीव गांधी यांच्या पदरात जनतेनं मतांचा भरभरून कौल टाकला होता. देशाची सूत्रं नव्या पिढीच्या हाती गेली होती. एकविसाव्या शतकाची आव्हानं लक्षात घेऊन राजीव गांधी देशाची दिशा ठरवतील, असं त्यांच्या भाषेवरून लक्षात येऊ लागलं होतं. देशाच्या समस्यांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन अगदी ताजा, पूर्वग्रहरहित होता. संगणकापासून दूरसंचार क्रांतीपर्यंतच्या त्यांच्या अनेक कल्पनांना पारंपरिक विचारसरणीच्या डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही पक्षांकडून विरोध होत होता. पण, काळाची गरज ओळखणाऱ्या श्री. शरद पवार यांना राजीव गांधी यांच्या विचारातली उपयुक्तता दिसत होती. नव्या पिढीच्या आकांक्षा दिसत होत्या. राजीव गांधी यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आमंत्रण दिलं होतंच. त्याचा विचार करून श्री. पवार यांनी त्यांच्याबरोबर काम करण्याचा, पुन्हा काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय केवळ राजकीय नव्हता. देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने नवी वाट शोधण्याचा होता. ग्रामीण भागातून आलेल्या श्री. पवार यांना जी गोष्ट समजली, जो अजेंडा देशासाठी आवश्यक वाटला, तो त्या काळातील उच्चभ्रू, व्यक्तिगत पातळीवर अत्याधुनिक असलेल्या नेत्यांनाही कळत नव्हता, हे आश्चर्यचकीत करणारं होतं.

संगणकक्रांती हीच नव्या युगाची वाट आहे, हे ओळखून श्री. पवार यांनी आपल्या मतदारसंघातही तसे प्रयत्न सुरू केले होते. ग्रामीण, दुर्गम भागातील कोणताही विद्यार्थी संगणक शिक्षणापासून दूर राहू नये, त्यांच्यापर्यंत संगणक शिक्षण पोहोचावं यासाठी बारामतीच्या विद्या प्रतिष्ठाननं संगणक लॅब असणाऱ्या बस खरेदी केल्या होत्या. एका बसमध्ये साधारण २० संगणक, ते चालवण्यासाठी जनरेटर आणि शिकवण्यासाठी

प्रशिक्षक असत. बारामती, भोर, इंदापूर, पुरंदर अशा आजूबाजूच्या परिसरातल्या जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये आठवड्यातून एकदा ही बस जात असे. 'इंटेल' या माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातल्या अमेरिकेतल्या बहुराष्ट्रीय कंपनीचे अध्यक्ष क्रेग बॅरट २०१२ मध्ये हा प्रयोग पाहण्यासाठी स्वतःहून बारामतीत आले होते. बसमधून होत असलेला संगणकप्रसार आणि शिक्षण पाहून प्रभावित झालेल्या बॅरट यांनी तशाच ३५ बस 'विद्या प्रतिष्ठान'ला भेट म्हणून दिल्या. एक रुपया प्रतिदिन नाममात्र शुल्क घेऊन या बस पुढे पुणे जिल्ह्याच्या बरोबरीनंच हरियाणा, आंध्रप्रदेश, केरळ, झारखंड या राज्यांतही प्रशिक्षण देण्यासाठी पोहोचल्या.

पुण्याजवळ असलेल्या हिंजवडी आय.टी. पार्कची माहिती आता आपल्यातल्या प्रत्येकाला आहे. पण असं आय.टी. पार्क पुण्याजवळ वसवून महाराष्ट्राला जगाच्या आय.टी. नकाशावर नेण्याची दृष्टी श्री. पवार यांचीच. मुद्दा केवळ आय.टी. पार्क वसवण्यासाठी केंद्र सरकारकडून परवानगी आणि सवलती घेण्याचा नव्हता, त्यासाठी एखाद्या मोठ्या शहराजवळ आवश्यक तेवढी मोठी जमीन उपलब्ध करून देण्याचा होता, केंद्र सरकारकडून पुणे आणि परिसरासाठी तेवढी जादा बॅण्डविड्थ मिळवण्याचाही होता, स्थानिक महानगरपालिकांकडून आवश्यक त्या करसवलती मिळवून देण्याचा होता. हिंजवडीसाठी तर आणखीही एक प्रश्न होता. आय.टी. पार्कसाठी आवश्यक असलेल्या जमिनीतली काही जमीन एका साखर कारखान्याच्या उभारणीसाठी विकत घेतली गेली होती. त्या साखर कारखानदारांची समजूत काढून ती जमीन मोठ्या कौशल्याने आय.टी. पार्कसाठी उपलब्ध करून द्यावी लागणार होती. राज्यातल्या सहकारी साखर कारखानदारीसाठी श्री. पवार कोणतीही मदत द्यायला तयार असतात, अशी टीका या कारखानदारीचे विरोधक नेहमी करत असतात. पण, 'अधिक महत्त्वाचं काय' याचा योग्य ठिकाणी योग्य निर्णय करून अधिक हिताचा प्रकल्प पुढे नेण्यातलं त्यांचं तारतम्य इथे दिसून येतं. एखादी गोष्ट मनापासून पटली, की ती प्रत्यक्षात आणण्यासाठी मैदानात उतरून अथक प्रयत्न आणि परिश्रम करण्याची श्री. पवार यांची तयारी त्यांच्या विरोधकांच्याही कौतुकाचा विषय आहे ती यामुळेच.

# रचिला पाया संशोधनाचा | ५१

संशोधनाच्या क्षेत्रात भारत मागे आहे, अशी खंत नेहमी बोलून दाखवली जाते. मूलभूत संशोधन होऊ शकेल अशा संस्थांची उभारणी आपल्याकडे अभावानेच आहे. कुठल्याही क्षेत्रात याला अपवाद नाही. केंद्रीय कृषिमंत्रीपदी आल्यानंतर शरद पवार यांनी ज्या गोष्टींना चालना दिली, त्यात कृषिक्षेत्रातील संशोधनाला दिलेली चालना सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण संशोधन, गरजेनुरूप आधुनिकता आणि नवं तंत्रज्ञान आलं नाही तर त्या क्षेत्राची प्रगती होत नाही. अन्य देशातून उसन्या घेतलेल्या तंत्रज्ञानानं तेवढ्यापुरती मर्यादित प्रगती होते पण, त्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास होत नाही. आपण देश म्हणून त्या क्षेत्रात स्वावलंबी होत नाही. कृषिक्षेत्रासंबंधी श्री. पवार यांनी जी उद्दिष्टं ठेवली होती, ती गाठायची तर संशोधनाचं मूलभूत क्षेत्र व्यापक करण्याची आणि त्याला गती देण्याची गरज होती.

कृषिक्षेत्राशी संबंधित संशोधनसंस्था देशात स्थापन झाल्या होत्या परंतु, त्या एखाद्या सरकारी कार्यालयासारखंच चाकोरीबद्ध काम करत होत्या. दुर्लक्षामुळे त्या संस्थांतलं वातावरण आणि शास्त्रज्ञांमध्ये उदासीनता पसरली होती. प्रोत्साहन देऊन त्यांना निश्चित दिशेने कार्यप्रवृत्त करण्याची गरज होती. 'इंडियन काउन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्च' (आयसीएआर) ही कृषिसंबंधित संशोधनासाठी महत्त्वाची संस्था. ५ हजार कृषिशास्त्रज्ञ या संस्थेत काम करत करतात. श्री. पवार यांनी या सर्व शास्त्रज्ञांना त्यांच्या कामात पुरेसं स्वातंत्र्य मिळेल असं पाहिलं. शास्त्रज्ञांची निवड करण्यासाठी असलेल्या 'ॲग्रिकल्चरल सायंटिस्ट रिक्रुटमेंट बोर्ड' या संस्थेमध्ये निवृत्त शास्त्रज्ञांना सहभागी करून घेतलं. तरुण शास्त्रज्ञांची निवड करण्याला प्राधान्य द्यायला सांगितलं. 'आयसीएआर' अंतर्गत काम करणाऱ्या ८० संस्थांना मंत्रालयीन हस्तक्षेपातून मुक्त केलं. संशोधनाला मोठ्या प्रमाणावर निधी लागतो, पण त्याचं महत्त्व अनेकदा लक्षात घेतलं जात नाही. त्यामुळे, या सर्व संस्थांना वर्षाच्या सुरुवातीलाच अंदाजपत्रक तयार करायला सांगण्यात आलं आणि त्याला मान्यता दिली गेल्यानंतर निधी उपलब्ध करून देण्यात कृषिमंत्रालयानं

अजिबात हस्तक्षेप करायचा नाही, असं बजावून सांगण्यात आलं.

संशोधनसंस्थांतून चाललेलं संशोधन योग्य गतीने सुरू राहावं, यासाठी त्याची वरिष्ठ पातळीवरून वेळोवेळी दखल घेतली जाणं महत्त्वाचं असतं, हे ओळखून श्री. पवार यांनी या संस्थांमधल्या शास्त्रज्ञांशी अनौपचारिक संवाद सुरू केला. त्यांनी केलेल्या माहितीपुस्तिका, शोधनिबंध यांची दखल घ्यायला सुरुवात केली. काही प्रयोगांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने आवश्यक सूचनाही केल्या. या सगळ्याचा परिणाम म्हणून सर्व संस्थांना आणि संशोधनालाही गती आली. अन्नप्रक्रिया उद्योगातील संस्थांनाही श्री. पवार यांनी आपल्या १० वर्षांच्या कार्यकाळात याच पद्धतीने सक्षम केलं. तामिळनाडूत तंजावरला असलेल्या 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रॉप प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी' या संस्थेसाठी १०२ कोटी रुपये देऊन त्या संस्थेचं रूपांतर राष्ट्रीय पातळीवरील संस्थेमध्ये करण्यात आलं. संस्थेच्या दर्जावाढीनंतर तिथे बी.टेक., एम.टेक. आणि पीएच.डी. (फूड प्रोसेसिंग इंजिनीअरिंग) करण्याची सोय झाली.

काही नव्या संस्थाही स्थापन केल्या गेल्या. 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी अंत्राप्रेन्युअरशिप अॅण्ड मॅनेजमेंट' ही त्यापैकीच एक. ४८० कोटी रुपये गुंतवून ही संस्था हरियाणातल्या सोनपत जिल्ह्यात कुंडली इथे सुरू केली गेली. २०१२ मध्ये या संस्थेला केंद्र सरकारनं अभिमत विद्यापीठाचा दर्जा बहाल केला.

सन २००९ मध्ये 'इंडियन ग्रेप प्रोसेसिंग बोर्ड'ची स्थापना केली गेली. द्राक्षाच्या उत्पादनात देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्यानं या संस्थेचं मुख्यालय पुण्यातच निश्चित केलं गेलं. देशात द्राक्षापासून केल्या जाणाऱ्या उत्पादनांना या संस्थेने जागतिक पातळीवर नेलं. अन्नप्रक्रिया विभागाने 'नॅशनल मिट अॅण्ड पोल्ट्री प्रोसेसिंग बोर्ड' या स्वायत्त संस्थेची स्थापना केली. मांस आणि कोंबडीजन्य उत्पादनांच्या वाढीसाठी आणि गुणवत्तेतील सुधारणांसाठी ही संस्था काम करते आहे. संशोधनक्षेत्रात उभ्या राहणाऱ्या संस्था आणि तिथे केलं जाणारं संशोधन दीर्घकालीन फायद्याचं ठरतं आहे. अशा संस्था देशाला त्या त्या क्षेत्रात भक्कम पायावर उभं करण्याचं काम करत असतात. श्री. पवार यांच्या १० वर्षांच्या कृषी आणि अन्नप्रक्रिया उद्योगातील या कामगिरीनं देशामध्ये या क्षेत्रातील संशोधनाचा पाया मजबूत केला आहे. त्याचे लाभ देशाला पुढे वर्षानुवर्षं मिळत राहतील.

# प्रशासनाची एकमुखी पसंती

# ५२

लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी आणि प्रशासन ही राज्यकारभाराची दोन अंगं असतात. अनेकदा या दोन अंगांमध्येच संघर्ष असतो. असा संघर्ष असू नये अशी धारणा आधुनिक काळामध्ये वाढत असली, तरीही परस्परसमन्वयाचा अभाव मात्र जागोजागी दिसू लागला आहे. पूर्वीच्या काळी असणारा प्रभुत्वाचा संघर्ष आता प्रामाणिकतेबाबतच्या शंकेमध्ये रूपांतरित झाला आहे. अनेक ठिकाणी अधिकारक्षेत्राच्या आक्रमणावरून लोकप्रतिनिधी आणि प्रशासनामध्ये उभे तट पडल्याचं दिसतं. हे सारे मुद्दे गौण ठरवून अनेक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाचा विश्वास आणि आदर संपादन करून उत्तम राज्यकारभार केला आहे. महाराष्ट्रात आणि देशपातळीवर असा कारभार करणाऱ्यांमध्ये पहिलं नाव घेतलं जातं, ते श्री. शरद पवार यांचं.

लोकप्रतिनिधी म्हणजे केवळ लोकमानस सांभाळणारा आणि निवडणुका जिंकणारा, असा समज असतो. पण जो लोकप्रतिनिधी राज्यकर्ता असतो, त्यानं आपल्यावर असलेल्या जबाबदारीच्या विषयासंबंधीचं ज्ञान मुळापासून अवगत केलं पाहिजे, यावर श्री. पवार यांचा विश्वास आहे. त्यामुळे त्यांच्याबरोबर ज्या अधिकाऱ्यांनी काम केलं, त्या अधिकाऱ्यांना आपल्या विभागाचे मंत्री म्हणून श्री. पवार यांचं ज्ञान कुठेही कमी जाणवलं नाही. त्याचा परिणाम म्हणून श्री. पवार यांच्या प्रत्येक निर्णयामागे माहितीपूर्ण आत्मविश्वास असतो आणि अधिकाऱ्यांनाही त्याबद्दल आदर असतो. केवळ कागदावरून जी माहिती येते, त्या माहितीवर विसंबून श्री.पवार यांनी कधीही आपला निर्णय घेतला नाही. सतत लोकसंपर्क असल्यामुळे आणि विविध भागांमध्ये संचार असल्याने आपल्यासमोर आलेल्या कागदावरच्या मजकुरामागचं वास्तव त्यांना पूर्णपणे माहीत असतं. त्यांची तीव्र आकलनक्षमता त्यांना प्रत्येक निर्णयावेळी उपयोगी ठरते. कोणत्याही निर्णयासाठी त्यांना चालढकल करावी लागत नाही. निर्णय स्पष्टपणे घेता येतो, त्यामुळे प्रशासनाला निश्चित दिशा मिळते

आणि निर्णयाची अंमलबजावणी कशा पद्धतीने करायची आहे, याचंही स्पष्ट मार्गदर्शन मिळतं.

प्रशासकीय अधिकाऱ्याला पूर्ण स्वातंत्र्य देणं हे त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य. त्याचं मत नोंदवण्याची मुभा ते संबंधित अधिकाऱ्याला पूर्णपणाने देतात. आपल्याला अमुक एक निर्णय करायचा आहे म्हणून त्याला सोयीचं होईल, असंच मत अधिकाऱ्यानं नोंदवावं, अशी अपेक्षा ते कधीही करत नाही. उलट, अधिकाऱ्यानं त्याचं मत मोकळेपणानं मांडावं, त्यावर आपल्याला योग्य वाटेल तो निर्णय आपण घेऊ, अशीच त्यांची भूमिका असते. एखाद्या प्रश्नासंबंधी अधिकाऱ्याच्या समजूतीतच काही अडचण आहे, असं लक्षात आलं तर मात्र ते वेगळ्या पद्धतीने त्याची जाणीव करून देतात. अधिकाऱ्यांबरोबर असलेल्या बैठकांतही त्यांचा हाच आग्रह कायम असतो. मुख्यमंत्री असताना अर्थ विभागाच्या सचिवाचा किंवा मुख्य सचिवांचा एखाद्या निर्णयाला विरोध असला, तरी तो विरोध अधिकाऱ्याने केला म्हणून त्यांनी त्याच्याविषयी मनात कधीच आकस ठेवला नाही. अधिकाऱ्याची भूमिका अधिकाऱ्यानं पार पाडली, आता मंत्रिमंडळानं आपला निर्णय घ्यावा, असंच त्यांचं म्हणणं असे. प्रशासकीय अडचण आणि राजकीय गरज लक्षात घेऊन निर्णय घ्यावे लागतात, याची जाणीव त्यांच्या निर्णयामध्ये नेहमी दिसते. आज अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या हा सरकारमधला मोठा वादाचा विषय आहे. श्री. पवार यांनी या बदल्या आणि नेमणुकांबद्दल कधीही टोकाचा आग्रह धरला नाही, असं त्यांच्याबरोबर काम केलेले वरिष्ठ अधिकारी सांगतात. अनेक कंत्राटदार किंवा पुरवठादार राज्यकर्त्यांकडे आपल्या मागण्या घेऊन सतत येत असतात. संबंधांचा लाभ व्हावा, अशी त्यांची अपेक्षा असते. श्री. पवार यांच्याकडून अधिकाऱ्यांना कुणाला कंत्राटं देण्याबाबत किंवा पुरवठ्याची कामं देण्याबाबत किंवा एखाद्यावर विशेष मर्जी दाखवण्याबद्दल कधीही सूचना मिळाली नाही, असं हे अधिकारी आवर्जून सांगतात.

'सरकारी काम अन् सहा महिने थांब' अशी सरकारी कामाबाबत मराठीत म्हण आहे. श्री. पवार मंत्री किंवा मुख्यमंत्री असताना कोणत्याही निर्णयाची फाईल त्यांच्याकडे चोवीस तासांपेक्षा अधिक काळ राहिली नाही. त्यांच्याकडे संध्याकाळी गेलेली फाईल स्वच्छ शेऱ्यासह किंवा निर्णयासह दुसऱ्या दिवशी परत आलेली असे. अनेक मंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडे सचिवांना यासाठी रात्री-अपरात्री, अवेळी जावं लागतं.

ज्यांनी श्री. पवार यांच्याबरोबर काम केलं आहे, त्यांना असा अनुभव कधीही आलेला नाही. फाईलमध्ये असलेल्या नोंदींवरून विषय स्पष्ट होत नसेल किंवा काही गोष्टींचं स्पष्टीकरण आवश्यक असेल, तरच संबंधित सचिवाला बोलावून ते त्यांच्याकडून आवश्यक स्पष्टीकरण घेत असत.

श्री. पवार यांच्या तल्लख स्मरणशक्तीने गेल्या ५० वर्षांत प्रशासनातील अनेकांना अचंबित केलं आहे. एखादी फाईल अनेक खात्यांशी संबंधित असते. त्या त्या खात्याचा प्रशासकीय प्रमुख आणि मंत्र्याचे त्यावर शेरे असतात. श्री. पवार यांना त्या प्रत्येक शेऱ्याची अचूक आठवण असते. चर्चेच्या ओघात कोणी तो संदर्भ विसरला असेल, तर श्री. पवार त्यांना तशी आठवण करून देतात, असा अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अनुभव आहे. कोणताही निर्णय घेताना पूर्वग्रह न ठेवणं हे त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य. महाराष्ट्रात चार वेळा ते मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी घेतलेल्या निर्णयापेक्षा वेगळा निर्णय मध्यंतरीच्या काळात घेतला गेला, तरी त्यांनी त्याबाबत संबंधित अधिकाऱ्याला त्यावरून कधीच दोष दिला नाही, ते मनात ठेवून त्याच्याशी आकसानं कळीवर्तनही केलं नाही. राज्यकारभार ही सतत चालणारी प्रक्रिया असते आणि त्यातील निर्णयांना अनेकजण जबाबदार असतात, याचं पूर्ण भान त्यांच्या अंगी आहे. समोर आलेल्या विषयाबाबत प्रत्येकवेळी त्याच्या गुणवत्तेनुसार विचार करणं आणि स्वतंत्रपणे निर्णय घेणं हे त्यांचं महत्त्वाचं वैशिष्ट्य राहिलं. त्यामुळे प्रशासनानेही त्यांना कधी हातचं राखून सहकार्य केलं नाही. त्यांच्या निर्णयाला प्रशासनाचा पूर्ण पाठिंबा आणि अंमलबजावणीमध्ये उत्तम सहकार्य लाभलं.

वेळेच्या बाबतीत अत्यंत काटेकोर असलेल्या श्री. पवार यांच्यासोबत काम करणाऱ्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वेळेचीही शिस्त पाळावी लागते. आपला दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम ठरवताना प्रत्येक भेटीला किती महत्त्व द्यायचं, किंवा त्यासाठी किती वेळ आवश्यक आहे, याचं त्यांचं गणित पक्कं असतं. त्यामुळे, नियोजित कार्यक्रमामध्ये सहसा कधी गोंधळ उडत नाही, वेळापत्रक विस्कटत नाही. आपल्या एखाद्या निर्णयाचं गांभीर्य काय आहे, हे लक्षात घेऊन त्यासाठी त्यात आपण स्वतः गुंतणं किती आवश्यक आहे, याचा त्यांचा अंदाजही नक्की असतो. जिथे गरज असेल तिथे केवळ मार्गदर्शन आणि आढावा यावर न थांबता ते अंबलबजावणीची सूत्रंही प्रत्यक्ष आपल्या हाती घेतात. केवळ निर्णय घेऊन

त्या निर्णयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी मात्र ते पूर्णपणे दुसऱ्यावर टाकतात, असं चित्र त्यामुळे कधीच दिसत नाही.

अनेकवेळा राजकारणी किंवा धोरणकर्ता हा अधिकाऱ्यांच्या माहितीवर अवलंबून असतो. कधी अधिकाऱ्याकडे अपुरी माहिती असते, तर कधी त्याचं आकलन केवळ प्रशासकीय अंगाने असतं. त्यामुळे, त्यावर अवलंबून राहणाऱ्या धोरणकर्त्यांचे अंदाज चुकतात. श्री. पवार यांच्याबाबतीत तसं कधी घडत नाही. कारण त्यांचं स्वतःचं सर्व पातळ्यांवर आणि सर्वच क्षेत्रांत माहितीसंकलनाचं मजबूत जाळं आहे. त्यातून येणारी माहिती त्यांना निर्णयाच्या परिणामांबाबत तसंच अंमलबजावणीबाबत सजग करत असते. त्यांच्या त्या माहितीचा लाभ अनेकदा प्रशासनालाही होतो. त्यांचं आणि प्रशासनाचं त्यामुळे सतत आदान-प्रदान सुरू राहतं. श्री. पवार यांच्याबरोबर काम करणं म्हणजे अनेक गोष्टी शिकायला मिळणं, अशी भावना त्यांच्याबरोबर काम करणारे मनापासून व्यक्त करतात ते उगीच नाही!

# कमतरता असेल तर ती आमच्यात; व्यवस्थेत किंवा कायदेमंडळात नाही!

महाराष्ट्राच्या विधीमंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक अरुण साधू यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांची दूरदर्शनसाठी मुलाखत घेतली होती. विधीमंडळ आणि त्यांच्या कामकाजाबाबत घेतले जाणारे सर्वसाधारण आक्षेप आणि या व्यवस्थेची उपयुक्तता यावर श्री. पवार यांनी या मुलाखतीत आपली मतं मांडली आहेत–



**अरुण साधू : पवार साहेब, विधीमंडळाची भूमिका राज्यव्यवस्थेला दिशा देण्याची, धोरणं ठरविण्याची असते. आपलं विधीमंडळ ही भूमिका आजच्या व्यवस्थेमध्ये किती जबाबदारीने पार पाडते आहे, असं आपल्याला वाटतं?**

मुख्यमंत्री शरद पवार : विधानसभा ही राज्यातील सर्वसामान्यांच्या आशा-आकांक्षांचं प्रतिक असते. हे व्यासपीठमुळी लोकांच्या आशा-आकांक्षांचं व्यासपीठ आहे. लोकप्रतिनिधी त्याठिकाणी विविध चर्चांमध्ये सहभागी होतात, जनतेचे प्रश्न मांडतात. तिथे धोरणं ठरविली जातात. धोरणामध्ये बदल करण्याच्यासंदर्भात काही सूचना असतील, तर त्या मांडल्या जातात. त्या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून लोकोपयोगी निर्णय होण्यासाठी विधीमंडळाच्या व्यासपीठाचा उपयोग होत असतो. धोरण कितीही चांगलं आणि उदात्त असलं तरी त्याची अंमलबजावणी महत्त्वाची असते. ती नीट होत नसेल, तर त्याला याच व्यासपीठावर वाचा फूटते. त्यामधुन सरकारला दुरुस्ती करण्याच्या संधी प्राप्त होते. गेली २० वर्षे विधीमंडळामध्ये मी अनेक प्रकारच्या प्रश्नांवर चर्चांमध्ये सहभागी झालो, उतरांच्या चर्चा ऐकल्या, भाषणं ऐकली. माझ असं स्वच्छ मत आहे की, प्रश्न सोडविण्यासाठी, दिशा देण्यासाठी या व्यासपीठाचा उत्तम उपयोग होऊ शकतो, हे सर्वमान्य आहे. १९४७ साली आपण स्वतंत्र झालो आणि आजपर्यंत या लोकशाहीवर निष्ठा ठेवणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या अशा ज्या संस्था लोकमाणसांमध्ये रुजल्या आहेत, त्यामध्ये विधीमंडळाचं स्थान आहे. याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

**अरुण साधू : आपण जनमानसातील आशा-आकांक्षाबद्दल बोललात. मला असं विचारायचं आहे की, जनमानसातील समस्या, आकांक्षांचं जे प्रतिबिंब इथे उमटतं ते कितपत सर्वव्यापी असतं? कारण, लोकांचा असा समज-किंवा गैरसमज-असतो की समाजातील सर्वस्तरांचे प्रतिबिंब आपल्या विधीमंडळात उमटतं की नाही? आपल्याला त्याबद्दल काय वाटते?**

शरद पवार : नाही. लोकप्रतिनिधी वेगवेगळ्या विचारांचे, वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे असू शकतात. ते वेगवेगळ्या वर्गांचं प्रतिनिधीत्व करत असतात. त्यामुळे त्यांच्या भूमिका वेगवेगळ्या असू शकतात. जे नागरी परिसरातून आले आहेत, त्यांना नागरी प्रश्नांसंदर्भात अधिक आस्था असते. आदिवासी भागातून आलेले आदिवासींच्या प्रश्नांबाबत आग्रही भूमिका

मांडतात. कोणी दलित वा उपेक्षित समाजाचे असतील तर ते त्यांच्यासंबंधीच्या प्रश्नांबाबत आस्था दाखवतात. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी शेतकरी, शेतमजुरांचे तर कामगार चळवळीतून आलेले बोनससारख्या प्रश्नांबाबत प्रभावी मांडणी करतात. या सगगळ्या मांडणीतून, प्रक्रियेतूनच धोरण ठरत असते. एक उदाहरण देतो. माझ्यासमोर घडलेली गोष्ट. ग्रामीण भागातल्या शेतमजुराच्या जीवनामध्ये स्थैर्य यावं, त्याला रोजगार मिळविण्याचा हक्क असावा, अशी भूमिका सत्ताधारी आणि विरोधी–अशा दोनही बाजुंनी मांडली गेली. सातत्याने होणाऱ्या मांडणीचा हा परिणाम म्हणून राज्यकर्त्या पक्षाला त्याचा विचार करावा लागला, धोरणाला पाठिंबा द्यावा लागला. राज्यकर्त्या पक्षाने धोरणाला पाठिंबा दिल्याने शासनाला भूमिका घ्यावी लागली. त्यातून संपूर्ण देशात पहिल्यांदा रोजगार हमीचा कायदा महाराष्ट्राच्या विधानसभेत जन्माला आला. खेड्यापाड्यातल्या माणसाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे रोजंदारीचा, कष्ट करण्याचा, घाम गाळण्याचा आणि जगण्याचा अधिकार देणारा असा हा कायदा आहे. अशी अनेक उदाहरणं मी पाहिली आहेत, ऐकली आहेत. अनेकवेळा अशा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी मला मिळाली आहे.

सामुदायिक विचारविनीमयातून धोरणं ठरतात आणि त्याचा उपयोग निश्चितच सर्वसामान्य माणसाला होतो. तत्कालीन स्थानिक प्रश्नांना न्याय देण्याची संधीही या व्यासपीठावरून मिळते. कुठे एस.टी. चा अपघात असेल, कुठे कामगारांसंदर्भातील राज्यसरकारचं धोरण असेल, दुष्काळी माणसाला अडचणीतून बाहेर काढण्याचा आग्रह असेल, पिण्याच्या पाण्यासाठी यातना सहन करणाऱ्या गरीबाची व्यवस्था असेल, स्त्रियांवरील अत्याचार असेल, सरकारी कर्मचाऱ्यांचा प्रश्न असेल किंवा दलित–उपेक्षित आदिवासींवर होणारा अत्याचार असेल, या सगळ्या प्रश्नांसंदर्भात हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरतं. आणि प्रभावीपणे मांडलेल्या तिथल्या विचारांना राज्य सरकारलासुद्धा प्रतिसाद द्यावा लागतो. त्यातून धोरणामध्ये परिवर्तन करावं लागतं, अनवधानाने चूका झाल्या असतील तर त्या मान्य करून प्रशासन यंत्रणेमध्ये दुरुस्ती करावी लागते. लोकप्रतिनिधींचा शासन यंत्रणेवर अंकुश राहिला पाहिजे या कारणाने या व्यासपीठाचा उपयोग अतिशय चांगला झालेला मी अनेक वर्ष पहातो आहे. हे आता लोकांनाही उमगलं आहे.

**अरुण साधू : गेल्या २१ वर्षात आपण अनेक वेगवेगळ्या**

**घटना बघितल्या आहेत. विधीमंडळाचे सदस्य पाहिले आहेत. सभापती बघितले आहेत. त्याबद्दल आपण काही बोलाल का?**

शरद पवार : मी पाहिलेल्या सभापतींमध्ये भारदे साहेब होते. बॅ. वानखेडे, शिवराज पाटील आणि आतापर्यंत शरद दिघे. आताचे शंकरराव जगताप, बाळासाहेब देसाई, प्राणलाल व्होरा असे अनेक सभापती मी पाहिले आहेत. पण मला आवर्जुन सांगितलं पाहिजे ते नानासाहेब वानखेडेंबद्दल. दोन्ही बाजुच्या सगळ्या घटकांना त्यांनी सातत्याने विश्वास दिला. सभागृहात वातावरण कितीही तापलं तरी ते एका सेकंदात किंवा एका मिनिटात बदलण्याची किमया त्यांच्याकडे होती. त्यांनी सभागृहातल्या सगळ्या सदस्यांशी उत्तम संबंध ठेवले. नवा मंत्री आला तरी... मला आठवतंय, १९७२ मध्ये आम्ही नवीनच मंत्री झालो. एखादी गोष्ट आमच्याकडून चुकली तर ते त्यासंबंधी नंतर बोलावून सांगायचे. उत्तम भाषण केलं किंवा चांगली तयारी केली असेल तर चिठ्ठी पाठवून अभिनंदन करायचे. ते एकप्रकारे प्रोत्साहन देणारे सभापती होते. त्याकाळच्या विधीमंडळाच्या सदस्यांना आजही त्यांची आठवण आहे. आज ते हयात नाहीत, याचे मला दुःख आहे. परंतु, त्यांची कारकिर्द संस्मरणीय आहे.

उतरांनीही आपापल्यापरिने चांगली कामगिरी केली आहे. सदस्यांबद्दलही सांगता येईल. यशवंतरावजींना (चव्हाण) मी बाहेरुन पाहिलं आहे. एस. एम. जोशी उत्तम संसदपटू होते. मी त्यांनाही पाहिलं आहे. अनेकांना बाहेरून पाहिलं आहे. पण, सदनात आपल्यानंतरच्या सदस्यामध्ये मधुसूदन वैराळे हे सत्ताधारी पक्षाचे अतिशय चांगले संसदपटू होते. दादासाहेब कन्नमवार यांना महाराष्ट्राने न्याय दिला असं वाटत नाही. विशेषत: वृत्तपत्रांनी. पण दादासाहेब अतिशय उत्तम संसदपटू होते. मला आठवतंय, (आचार्य प्र. के.) अत्र्यांनी एकदा अविश्वासाचा ठराव आणल्यानंतर दादासाहेबांनी त्याला जे उत्तर दिलं ते लक्षात रहाण्यासारखं होतं. अशी अनेक मान्यवर मंडळी... उद्धवरावांचा (पाटील) तसंच (रामभाऊ) म्हाळगींचा उल्लेखही करता येईल. सत्ताधारी पक्षातून मधुकरराव चौधरींचा करता येईल. असे अनेकजण आहेत, जे उत्तम संसदपटू होऊन गेले. ते संसदीय कामात लक्ष घालायचे. लोकांच्या प्रश्नांची आस्थापूर्वक दखल घ्यायचे, संसदीय कार्यपद्धतीमध्ये जी पथ्यं पाळायला हवीत त्याचं सतत स्मरण ठेवायचे. वसंतराव नाईक सत्ताधारी पक्षाचे नेते होते. त्यांचं सदनातलं वर्तन अत्यंत सुसंस्कृत असायचं. अशी अनेक माणसं, अनेक

मान्यवर लोकप्रतिनिधी पाहण्याची सुसंधी मला गेल्या २०-२५ वर्षांत आतून आणि बाहेरून मिळाली.

**अरुण साधू : एक शेवटचा प्रश्न. आपल्या सगळ्या बोलण्यातून विधीमंडळांबाबत एक दृढ निष्ठा, मोठा आशावाद दिसतो. पण आपण बाहेरचं वातावरण बघितलं, माध्यम बघितली, मध्यमवर्गीयांमधलं वातावरण बघितलं तर विधानसभा किंवा कायदेमंडळ अपुरी पडतात अशी भावना सर्वत्र आहे. हा निराशाजनक सूर मला तुमच्यामध्ये दिसत नाही. बरं वाटतय. बरोबर आहे का हे?**

शरद पवार : मला स्वत:ला असं वाटतं की, या संसदीय लोकशाहीबद्दल, लोकशाहीपद्धतीबद्दलं नाराजी व्यक्त होते, हे खरं आहे. लोकांचे मुलभूत प्रश्न सुटले नाहीत, तीव्र झाले तर त्यासंदर्भात तक्रार येते. मग विधीमंडळाचा उपयोग कमी पडतोय, अशी भावना व्यक्त केली जाते. मला देशातल्या, महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य जनतेमध्ये एकप्रकारची सुप्त भावना खोलवर रुजलेली दिसते. ही संसदीय पद्धती, या संस्था जनत केल्याच पाहिजेत. या संस्थांपासून, पद्धतीपासून तसूभरही दूर जाण्याचा प्रयत्न केला तर लोक धडा शिकवतात, हे तुम्ही आम्ही पाहिलं आहेच. लोकांना हीच पद्धत मान्य आहे, त्यांनी ती स्वीकारली आहे. जगानेही त्याची वाहवा केली आहे. त्यात काही कमतरता असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न आपल्याला करावा लागेल. जी काही कमतरता असेल तर ती आम्हा लोकांमधील आहे; पद्धतीमध्ये किंवा विधीमंडळाच्या या व्यासपीठात नाही, हे आपण समजून घेतलं पाहिजे.



# सामाजिक अभिसरणाचे उत्तम व्यासपीठ

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा अमृत महोत्सव २०११ मध्ये साजरा झाला. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले गेले होते. त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या स्मृतिग्रंथामध्ये **श्री. शरद पवार** यांनी आपल्या महाराष्ट्र विधिमंडळाबाबतच्या भावना व्यक्त केल्या होत्या –

महाराष्ट्राच्या विधिमंडळात जवळपास सत्तावीस वर्षं काम करण्याची संधी सर्वसामान्य जनतेने मला दिली. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. मला आठवतंय, १९५८ साली एस.एस.सी. झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणाची सुविधा बारामतीस नसल्याने सर्वांना इतरत्र जावं लागे. त्यात

अग्रक्रम पुण्याला असायचा. मीही तसाच पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये दाखल झालो. महाविद्यालयीन शिक्षणासमवेत क्रीडा, नाट्य, विद्यार्थी संघटन व नंतर युवक काँग्रेसच्या कामामध्ये माझं लक्ष गेलं. मी त्यात गुंतलो.

१९५८ साली पुण्यात आलो. पण, तोपर्यंत महाराष्ट्राची राजधानी मुंबई पाहिली नव्हती. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. पुणे जिल्ह्यात शिवनेरी किल्ल्यावर राज्याचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाणसाहेब आले होते. त्या काळात मा. चव्हाणसाहेबांची भाषणं ऐकण्याची संधी म्हणजे मोलाची संधी असायची. पुणे परिसरातील त्यांच्या दौऱ्याप्रसंगी त्यांचे विचार ऐकण्यासाठी आम्हा विद्यार्थीवर्गाची उपस्थिती अगत्यानं असायची. एक दिवस आम्ही तीन-चार मित्रांनी मुंबईला जायचं ठरवलं. माझे वर्गमित्र श्री. धनाजीराव जाधव पुण्याच्या महाविद्यालयात, आमच्या वर्गात येण्यापूर्वी मुंबईत शिकत होते. त्यामुळे ते मुंबईचे माहितगार. ते आमच्याबरोबर होते. धनाजीरावांनी मला विचारलं, मुंबईत काय पहायचं आहे? मी उत्तर दिलं, समुद्र, विमानतळ, ट्राम आणि विधानभवन. समुद्र, विमानतळ, ट्राम पाहून झाल्यावर आम्ही विधानसभेत गेलो. धनाजीराव जाधवांचे वडील शेतकरी कामगार पक्षाचे जुने ज्येष्ठ नेते असल्यानं धनाजीरावांना विधानसभेच्या प्रेक्षक गॅलरीचे आमचे पास काढणं सहज शक्य झालं.

आम्ही विधानसभेच्या प्रेक्षक गॅलरीत गेलो. सभागृहात मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण, विरोधी पक्षाच्या बाजूला एस.एम. जोशी, आचार्य अत्रे आदी मान्यवर पाहण्यास व ऐकण्यास मिळाले. महत्त्वाच्या विषयांवरील चर्चा ऐकण्याची संधी आम्हा मित्रांना मिळाली. माझं संपूर्ण लक्ष चर्चेकडे होतं. मी सहजच एका पायावर दुसरा पाय टाकून चर्चा ऐकू लागलो, तोच प्रेक्षक गॅलरीतील विधिमंडळाचा कर्मचारी माझ्याकडे आला, मला त्याने सांगितलं, पायावर पाय ठेवून बसायला इथे परवानगी नाही. दोन्ही पाय सरळ करून बसायचं. मी पायाची मांडी मोडून, दोन्ही पाय पुढे करून बसलो. सभागृहातील चर्चा रंगली होती. माझं लक्ष त्याकडेच होतं. ती चर्चा ऐकण्याच्या नादात सवयीप्रमाणे बसल्याबसल्या नकळत मी पुन्हा माझा उजवा पाय डाव्या मांडीवर ठेवला. विधानभवनाच्या कर्मचाऱ्यानं ते पाहिलं आणि मला दरडावलं, ‘‘एकदा तुम्हाला सांगितलं, तरी तुम्ही खबरदारी घेत नाही. तुम्ही बाहेर जा.’’ मी विनंती करून माफी मागितली.

पण, तो गृहस्थ काही ऐकेना. मला त्याने प्रेक्षक गॅलरी सोडण्याचे आदेश अत्यंत करड्या आवाजात दिले. मी जागेवरून उठलो. पण, जाता जाता त्याला सांगितलं, आता पुन्हा विधानसभेत येईन, ते प्रेक्षक गॅलरीत बसण्यासाठी नाही; सभागृहात बसण्यासाठीच. तो माझ्याकडे पाहून हसला आणि म्हणाला, ''सभागृहात बसण्यासाठी आला तर आपण कसं बसावं, काय बोलावं यावर माझा अधिकार नाही. पण, आपण आपला शब्द पुरा केला आणि त्यावेळेसला सेवेत असलो, तर आपल्याला सलाम करेन आणि सभागृहाचा रस्ताही दाखवेन.''

सात वर्षांनी, १९६७ साली, मी विधानसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघातून निवडून आलो. पहिल्या दिवशी शपथ घेण्यासाठी सभागृहात प्रवेश करत असतानाच प्रवेशद्वाराजवळ प्रेक्षक गॅलरीतून मला उठवणारा विधानसभेचा तो कर्मचारी उभा होता. त्याने मला ओळखलं आणि सलाम करून 'स्वागत असो' असं म्हणत मला सभागृहाचा रस्ता दाखवला. त्या दिवसापासून सत्तावीस वर्षं सभागृहात जात-येत राहिलो. सभागृह नव्या जागेतही गेलं. पण, माझी सभागृहाची वहिवाट मी दिल्लीच्या लोकसभेत प्रवेश करेपर्यंत कायम राहिली.

महाराष्ट्राच्या सभागृहात विधानसभेचा सभासद म्हणून बसलो. अनेक जणांबरोबर मैत्रीचे संबंध निर्माण झाले. ज्येष्ठ नेते वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतरावदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळांत काम करण्याची संधी मिळाली. मी मुख्यमंत्री असताना माझ्या मंत्रिमंडळात मंत्री असलेले शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे पुढे राज्याचे मुख्यमंत्री झाले. भारत सरकारच्या मंत्रिमंडळात हे तिघेही माझे सहकारी राहिले आहेत. महाराष्ट्राच्या दोन्ही सभागृहांत काही काळ मला विरोधी पक्षनेतेपद सांभाळण्याची संधी मिळाली. विधिमंडळाचा साधा सदस्यही प्रभावीपणे काम करू शकतो आणि राज्यासमोरच्या महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी हातभार लावू शकतो, याची अनेक उदाहरणं मला आठवतात. ज्वारीच्या कणसात दाणा भरला असताना अवेळी पाऊस आला तर ज्वारीचा दाणा काळा पडतो आणि त्या ज्वारीला गिऱ्हाईक मिळत नाही; शेतकरी उद्ध्वस्त होतो. या काळ्या ज्वारीचा प्रश्न विधानसभेत मांडून अशी ज्वारी खरेदी करण्यास सरकारला भाग पाडलं. समाजातील उपेक्षितांना मदत करणं, सन्मानानं जगण्याची संधी देणं यासंदर्भात सभागृहात भूमिका मांडण्याचं काम माझ्याकडून झालं. त्यामध्ये

मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर, मंडल आयोगाची अंमलबजावणी करून ओ.बी.सी. वर्गाला संधी देण्याचं धोरण, समाजातील पन्नास टक्के लोकसंख्या असणाऱ्या महिलांना निर्णयप्रक्रियेत भाग घेण्याच्या अधिकारासाठी पंचायत राज संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्थांमध्ये आरक्षण देण्याचं धोरण, महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल घालवण्यासाठी घटनेच्या ३७१ 'अ' कलमाखाली वैधानिक विकास मंडळाच्या नेमणुकीचं धोरण... अशा विविध परिवर्तनाच्या धोरणांतील माझ्या सहभागाचं विधिमंडळ साक्षीदार आहे.

महाराष्ट्राच्या विधिमंडळात वसंतराव नाईक, शांतिलाल शहा, वि.स. पागे, उध्दवराव पाटील, कृष्णराव धुळूप, रा.सु. गवई, उत्तमराव पाटील, त्र्यं.शि. कारखानीस, डॉ. बापूसाहेब काळदाते, यशवंतराव मोहिते, वसंतरावदादा पाटील, शंकरराव चव्हाण, केशवराव धोंडगे, रा.का. म्हाळगी, जयंतराव टिळक, एन.डी. पाटील, दत्ता पाटील, गणपतराव देशमुख, दत्ता ताम्हाणे, ग.प्र. प्रधान, मृणाल गोरे, दि.बा. पाटील, ग.दि. माडगूळकर, ना.धों. महानोर, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर अशा अनेक मान्यवरांबरोबर मला काम करता आलं. माझ्या व्यक्तिगत जीवनातील हा अनमोल ठेवा आहे.

सभागृहातील पिढीतील बदलही पाहता आले. शंकरराव मोहिते यांना आमदार म्हणून पाहिलं, तसंच विजयसिंह मोहितेंनाही पाहता आलं. अशी अनेक उदाहरणं देता येतील. माझ्याच घरातील दोन पिढ्यांचे प्रतिनिधी मी आणि अजित पवार एकावेळी विधिमंडळात होतो तर आता लोकसभेतही मी आणि माझी मुलगी सौ. सुप्रिया सुळे एकाच सभागृहात बसतो. अशा व्यक्ती, असे प्रसंग, अशा आठवणी सभागृहाशी निगडित आहेत. या सभागृहात अनेक प्रश्नांवर सखोल चर्चा झाल्या, धोरणं ठरली, कायदे झाले, संघर्ष झाले तरीही 'संसदीय लोकशाहीची चौकट' मजबूत करण्याचं कार्य नेहमीच झालं. या सभागृहात १९६७ साली पहिल्यांदा आलो तेव्हा विधिमंडळ सदस्यांना मासिक २५० रुपये वेतन असायचं. अधिवेशनकाळात दैनंदिन भत्ता १५ रुपये असायचा. अधिवेशनकाळात आमदारनिवासात खोलीला भाडं नसायचं पण, गैरअधिवेशन काळात आमदार निवासातल्या खोलीला प्रतिदिनी १८ रुपये भाडं असायचं. सभागृहात सकाळपासून शेवटपर्यंत उपस्थिती चांगली असायची. सभागृह सुरू होण्यापूर्वी आणि सभागृहाचं कामकाज संपल्यावर आमदारांची विधिमंडळ ग्रंथालयात

उपस्थिती लक्षणीय असायची.

या सभागृहाचा अमृतमहोत्सव होत आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून याच सभागृहात वयाच्या पंचवीस-सव्विसाव्या वर्षी सदस्य म्हणून आलेल्या, उपमंत्री, राज्यमंत्री, मंत्री, विरोधी पक्षनेत्या अशा अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळणाऱ्या व आजच्या सभासदांपैकी एका सदस्याच्या मातोश्री असलेल्या, आज देशाच्या राष्ट्रपतीपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत असलेल्या सौ. प्रतिभाताई पाटील यांची उपस्थिती हा मणिकांचन योग आहे.

# मा. श्री. शरद पवार यांची कारकीर्द

| | |
|---|---|
| १९६७ | • सदस्य, महाराष्ट्र विधानसभा<br>• सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती<br>• चिटणीस, काँग्रेस विधीमंडळ पक्ष |
| १९७२-७४ | गृह, अन्न, नागरीपुरवठा, पुनर्वसन, प्रसिद्धी, क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |
| १९७४-७८ | शिक्षण, कृषि, उद्योग, गृह, कामगार आणि युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य |
| १९७८-८०<br>१९८८-९१<br>आणि<br>१९९३-९५ | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (एकूण चार वेळा) |
| १९८१-८६ | विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र राज्य |
| १९८२-८७ | अध्यक्ष, काँग्रेस (एस) |
| १९८४ | आठव्या लोकसभेवर निवड<br>(मात्र मार्च १९८५ मध्ये राजीनामा) |
| १९९१ | सदस्य, लोकसभा (दुसऱ्यांदा) |
| १९९१-९३ | संरक्षणमंत्री, भारत सरकार |
| १९९३-९५ | सदस्य, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य |
| १९९५-९६ | विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य |
| १९९६ | सदस्य, लोकसभा (तिसऱ्यांदा) |

| | |
|---|---|
| १९९६–९७ | सदस्य, संसदीय समिती (विज्ञान–तंत्रज्ञान, वन आणि पर्यावरण) |
| १९९८ | • सदस्य, लोकसभा (चौथ्यांदा)<br>• विरोधी पक्षनेता, लोकसभा |
| १९९८–९९ | सदस्य, संसदीय समिती (सामान्य प्रयोजन, परराष्ट्र व्यवहार आणि परराष्ट्र व्यवहार उपसमिती, मनुष्यबळ विकास मंत्रालयाची सल्लागार समिती) |
| १९९९ | • सदस्य, लोकसभा (पाचव्यांदा)<br>• नेता, राष्ट्रवादी काँग्रेस संसदीय पार्टी, लोकसभा |
| १९९९–२००० | सदस्य, संसदीय समिती (कृषि आणि सामान्य प्रयोजन) |
| २०००–०१ | सदस्य, संसदीय समिती (आचार–विचार समिती) |
| २००१–०४ | • उपाध्यक्ष, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समिती, भारत सरकार<br>• नेता, राष्ट्रवादी काँग्रेस संसदीय पार्टी, लोकसभा |
| २००४ | सदस्य, लोकसभा (सहाव्यांदा) |
| २००४–०९ | • कृषि, ग्राहकहक्क, अन्न व नागरी पुरवठामंत्री, भारत सरकार<br>• उपाध्यक्ष, संसदीय व्यासपीठ (जलसंधारण आणि व्यवस्थापन) |
| २००९ | लोकसभेवर सातव्यांदा निवड |
| ३१ मे २००९ – ते १८ जानेवारी २०११ | कृषि, ग्राहकहक्क, अन्न व नागरी पुरवठामंत्री, भारत सरकार |
| १९ जानेवारी २०११ ते २६ मे २०१४ | कृषि आणि अन्नप्रक्रिया उद्योगमंत्री, भारत सरकार |
| एप्रिल २०१४ | राज्यसभेवर निवड |
| सप्टेंबर २०१४ पासून | • सदस्य, संसदीय समिती (मनुष्यबळ विकास)<br>• सदस्य, संसदीय समिती (संसदीय कामकाज) |
| जानेवारी २०१५ पासून | • सदस्य, संसदीय समिती (सामान्य प्रयोजन) |

| | |
|---|---|
| संस्थात्मक कार्य | अध्यक्ष :<br>१) नेहरु सेंटर, मुंबई<br>२) रयत शिक्षण संस्था, सातारा<br>३) विद्या प्रतिष्ठान, बारामती आणि पुणे<br>४) ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती<br>५) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई<br>६) वसंतदादा शुगर इन्स्टिटट्यूट, पुणे |
| आवडीचे क्षेत्र | शेती, फलोत्पादन, अर्थशास्त्र, सिंचनव्यवस्था, उर्जा, वित्त, क्रीडा इत्यादी |
| क्रीडा क्षेत्रातील सहभाग | अध्यक्ष :<br>१) गरवारे क्लब हाऊस, मुंबई<br>२) महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद<br>३) मुंबई क्रिकेट असोसिएशन<br>४) महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक असोसिएशन |

## मा. श्री. शरद पवार यांच्या विविध क्षेत्रांतील कारकिर्दीविषयी पुढील पुस्तकांमध्ये अधिक माहिती उपलब्ध आहे :

१. लोक माझे सांगाती (राजकीय आत्मकथा) : श्री. शरद पवार, प्रकाशकः राजहंस प्रकाशन, पुणे.
२. ON MY TERMS : Sharad Pawar, Speaking Tiger Publishing Pvt. Ltd., New Delhi.
२. FAST FORWARD : अरुण टिकेकर, रोहन प्रकाशन, पुणे.
३. स्पर्धा काळाशी... वेध भारतातील आर्थिक व सामाजिक संक्रमणाचा : श्री. अरुण टिकेकर, रोहन प्रकाशन, पुणे.
४. लोकनेते शरदराव पवार : ॲड. राम कांडगे, राजश्री प्रकाशन, पुणे.
५. विचारसूत्रे : श्री. पद्मभूषण देशपांडे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
६. दुसरी हरितक्रांती : अमेय प्रकाशन, पुणे.
७. आधारवड (मराठी) / वटवृक्ष (हिंदी) : संकल्पना – डॉ. नरेंद्र बोरलेपवार, प्रकाशक : सोरा मीडिया प्रा. लि., मुंबई.
(पाच भाषांत प्रकाशित – मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी, उर्दू)
८. सुशासन आणि संवाद : लक्ष्मीकांत खाबिया, प्रकाशक : शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे.
९. संसदधुरीण : प्रकाशक : खासदार वंदना चव्हाण, माजी आमदार कमल ढोले–पाटील, पुणे.
१०. धुरंदर : निलेश मगर, पुणे.
११. उद्यमशील : लक्ष्मीकांत खाबिया, प्रकाशक : शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे.
१२. कृतिशील परिवर्तनवादी : संपादक : ॲड. जयदेव गायकवाड, अरुण खोरे, प्रकाशक : विजय जाधव, प्रा. मधुर गायकवाड.
१३. INDUSTRIOUS : लक्ष्मीकांत खाबिया, प्रकाशक : शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे.
१४. फेसबुक पेज लिंक : https://www.facebook.com/Pawarspeaks
१५. ट्विटर अकाउंट : https://twitter.com/Pawarspeaks

**ऋणनिर्देश**

१. मा. शरद काळे.
२. मा. हेमंत टकले.
३. मा. दिलीप वळसे-पाटील.
४. मा. शशिकांत शिंदे.
५. मा. शिवाजीराव देशमुख.
६. मा. अजित निंबाळकर.
७. प्रा. रत्नाकर शेट्टी.
८. मा. विश्वास ठाकूर.

**सहकार्य**

१. श्री. बा.बा. वाघमारे.
२. श्री. रंगनाथ चोरमुले.
३. श्री. जया शेट्टी.
४. श्री. अनिल पाझारे.
५. श्री. सतिश राऊत.
६. श्री. सुनिल रानडे.
७. श्री. नीलेश राऊत.
८. श्री. रविकांत वर्पे.
९. श्री. विद्याधर खंडे.
१०. श्री. सुरेश पाटील.
११. श्री. पराग पाटील.
१२. श्री. संजय बोरगे.

या पुस्तकासाठी ज्यांनी संदर्भ उपलब्ध करून दिले, माहिती दिली त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ दत्ता बाळसराफ
(कार्यक्रम संयोजक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान)

सलग ५० वर्षं देशाच्या कायदेमंडळाचं सदस्य
असणं ही सोपी गोष्ट नाही.
त्यासाठी जनतेचा निःसंशय पाठिंबा तर
लागतोच; शिवाय देशाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये
लक्षणीय योगदानही असावं लागतं.
श्री. शरद पवार यांची ही ५० वर्षांची कारकीर्द
नुसती डोळ्यांखालून घातली तरी
त्यांनी किती विविध क्षेत्रांमध्ये, विविध
स्तरांवर महत्त्वाची भूमिका बजावली हे
लक्षात येतं, त्यासाठीच्या कष्टाची कल्पना येते.



भारताच्या राष्ट्रपतींकडून दिला जाणारा उत्कृष्ट संसद सदस्य पुरस्कार श्री. शरद पवार यांना सन २००३ मध्ये जाहीर झाला. संसद भवनात राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला गेला त्यावेळी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी, लोकसभेचे अध्यक्ष सोमनाथ चटर्जी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई